


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, रविवार २६ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# यापुढे बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊ नका

## माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांना श्याम मानव यांचा सल्ला!



**अमरावती/प्रतिनिधी :** नेहमी वेगवेगळ्या वक्तव्यांनी चर्चेत राहणारे बागेश्वर पीठाधीश्वर धीरेंद्र शास्त्री यांची नुकतीच भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भेट घेतल्याबद्दल अजूनही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सहकुटुंब मध्यप्रदेशातील बागेश्वर धाम येथे भेट दिली. या प्रकरणात आता अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष श्याम मानव यांनी अमरावतीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत भूषण गवई यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

**काय म्हणाले श्याम मानव?**

सरन्यायाधीशासारखे सर्वोच्च पद भूषवूनही भूषण गवई धीरेंद्र शास्त्रींपुढे नतमस्तक होत असतील, तर आता भूषण गवईंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा सांगू नये, असे रोखठोक मत प्रा.श्याम मानव यांनी व्यक्त केले. अंनिसची बुवाबाजी विरोधी प्रबोधन सभा शनिवारी स्थानिक संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात पार पडली. त्यापूर्वी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रपरिषदेत प्रा.श्याम मानव यांनी त्यांची भूमिका मांडली. दरम्यान, जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हे दाखल होउ नये व त्याचा प्रचारप्रसारही होउ नये, अशी सध्या महायुती सरकारची भूमिका असल्याचाही आरोप प्रा.श्याम मानव यांनी केला. जादूटोणा विरोधी कायद्याची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

**मला धक्का बसला आहे**

माजी सरन्यायाधीश भूषण गवई हे



धीरेंद्र शास्त्री यांच्या पाया पडायला गेले होते याचा मला प्रचंड धक्का बसला आहे. भूषण गवई म्हणतात की, मी आंबेडकरी विचारांचा आहे. आंबेडकरी विचारांचे मी दूध प्यायलो आहे, पण ते जर धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडून आशीर्वाद घेत असतील, तर आता तुम्ही यापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव कधीही घ्यायचे नाही. तो अधिकार तुम्ही गमावलेला आहे, असे मानव म्हणाले. धीरेंद्र शास्त्री यांनी अनेकवेळा वादग्रस्त वक्तव्य केली आहेत. कालच त्यांनी नागपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्यांच्या वक्तव्यावर टीका होत आहे.

**तर धीरेंद्र शास्त्री यांना ८० लाखांचे बक्षीस-** धीरेंद्र शास्त्री यांना खरच दिव्य दृष्टी असेल, तर त्यांनी अंनिसचे आव्हान स्वीकारले पाहिजे. ते आव्हान जिंकल्यास त्यांना ८० लाखांचे पारितोषिक देण्यात येईल, असे आव्हानही प्रा.श्याम मानव यांनी दिले. पत्रपरिषदेत अंनिसचे कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, डॉ.बबन बेलसरे, शेखर पाटील, हरीश केदार कुळकर्णी आदी उपस्थित होते.

# हा भोंदू महाराष्ट्रात दिसता कामा नये

## शिवरायांच्या अवमानावरून रोहित पवार आक्रमक; धीरेंद्र शास्त्रींवर बंदीची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज थकले होते आणि त्यांनी राजपाट समर्थांकडे दिला, बागेश्वर धामच्या धीरेंद्र शास्त्रींच्या विधानाचा सर्वस्तरातून निषेध होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या वक्तव्याचा अत्यंत कडक शब्दांत समाचार घेतला असून, या भोंदू बाबावर महाराष्ट्रात कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी त्यांनी केली आहे. रोहित पवार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, हे वक्तव्य केवळ चुकीचे नसून अत्यंत संतापजनक आहे. यापूर्वीही या भोंदूने आणि त्याच्या सहका-यांनी जगद्गुरु संत तुकोबाराय, संत ज्ञानेश्वर माउली आणि आपल्या समृद्ध संत परंपरेबद्दल गरळ ओकली होती. वारंवार अशी विधाने करून छत्रपतींचा इतिहास आणि फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांना गालबोट लावण्याचा, तसेच महापुरुषांचे महत्त्व



कमी करण्याचा हा कोणताही एककलमी कार्यक्रम तर नाही ना? अशी शंका येते.

**सत्ताधा-यांच्या उपस्थितीवर ओढले ताशेरे** -ज्या कार्यक्रमात हे वक्तव्य झाले, तिथे राज्याचे मुख्यमंत्री आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते, यावरून रोहित पवारांनी संताप व्यक्त केला. शिवछत्रपतींचा अवमान होत असताना राज्याचे राज्यकर्ते त्याच मंचावर उपस्थित होते, याचे जास्त दुःख वाटते, असे म्हणत त्यांनी सत्ताधा-यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.रोहित पवार यांनी सरकारला इशारा देताना स्पष्ट केले की, छत्रपती शिवरायांचा अवमान करणा-या धीरेंद्र शास्त्रींवर महाराष्ट्रात तात्काळ बंदी घालण्यात यावी. हा भोंदू यापुढे महाराष्ट्रात दिसता कामा नये, अन्यथा याचे परिणाम सरकारला आणि संबंधित व्यक्तीला महागात पडतील. सरकार यावर कारवाई करेल, असे वाटत नाही. त्यामुळे आता सहन करून दुर्लक्ष करायचे की धडा शिकवायचा, हे शिवप्रेमी जनता आणि महामानवांच्या विचारांवर प्रेम करणा-या सर्वसामान्यांनीच ठरवावे.

# 'शिवाजी महाराज युद्ध लढून थकले अन् रामदास स्वामींना म्हणाले राजपाट सांभाळा'- बागेश्वर बाबांचे वक्तव्य

**नागपूर/प्रतिनिधी :** बागेश्वर धामचे पीठासीन धीरेंद्र कृष्ण शास्त्री तथा बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं आहे. नागपुरात भारतदुर्गा शक्तिस्थळाचा शिलान्यास समारंभ पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सरसंघचालक मोहन भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक संतांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री हे देखील उपस्थित होते. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं. 'भारतीय सनातनी परंपरेत जन्म घेतल्याने आज आणखी गौरव होत आहे. आम्ही धन्य आहोत, ज्या देशात आम्ही जन्म घेतला तिथे मातृ प्रधानता आहे. अशा देशात भारतदुर्गामाता मंदिरचे भूमीपूजन होत आहे', असं बागेश्वर बाबा म्हणाले. यानंतर त्यांनी शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं.

'छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करता करता खूप थकले, म्हणजे त्यांना वाटलं की, आपण थकलो आहोत. ते एक दिवस समर्थ रामदास स्वामींकडे गेले. त्यांनी आपले मुकूट उतारले आणि सांगितलं की, आम्ही खूप युद्ध लढलो. आता कृपा करा की, आम्हाला खूप लढायचं नाही. एक मोठी दया करा, हे मुकूट आपण सांभाळा. हा राजपाट आपण सांभाळा. आपल्या आज्ञेने आम्ही चाललो. आता आमच्याकडून पुढे चाललं जात नाही. आमच्याकडून युद्ध लढलं जात नाही. आम्ही आता खूप थकलो आहोत. आता आम्हाला



आराम हवा. आम्हाला विश्राम हवा आहे. आता आम्ही काही दिवस काही करु इच्छित नाहीत', असं बागेश्वर बाबा म्हणाले. 'शिवरायांच्या म्हणण्यावर स्मितहास्य करत समर्थ रामदास स्वामी भगवान म्हणाले, ठिक आहे, आम्हाला स्वीकार आहे. पण एक गोष्टी आम्ही सांगू इच्छितो, तुम्ही आमचे कोण आहात? ते म्हणाले, आम्ही आपले शिष्य आहोत. मग आम्ही कोण आहोत? तर म्हणाले गुरु आहात. मग शिष्यचं कर्तव्य काय? असा सवाल रामदास स्वामींनी केला. त्यावर जो गुरु आज्ञा देणार त्याचं पालन करण्याचं कर्तव्य शिष्याचं आहे, असं शिवाजी महाराज म्हणाले. समर्थ रामदास स्वामी यांनी मुकूट उचलं आणि शिवाजी महाराजांच्या डोक्यावर ठेवलं आणि म्हणाले, आजपासून माझं राज्य आहे. मी राज्य चालणार. पण आज्ञा तुम्हाला आहे. तुम्हाला संचालन करायचं आहे', असा धक्कादायक दावा बागेश्वर बाबांनी केला.

'ही घटना सांगून मला सांगायचं आहे की, देवाच्या आज्ञेने भारतमाताच्या आज्ञेने आपल्या सगळ्यांचा गौरव आहे की, अशा महापुरुषाने या भूमीवर जन्म घेतला, वर्तमानात ते संघाचे प्रमुख आहेत. पण त्यांनी भारताच्या गौरवाला विश्वपटलावर विस्थापित करण्यासाठी आपलं जीवन दिलं, तन, मन, आयुष्य दिलं. आम्हाला विश्वास आहे की, ज्यादिवशी भारतमाता दुर्गामंदिर बनेल त्यादिवशी भारत शक्ती संपन्न होईल आणि अखंड भारत होईल', असं बागेश्वर बाबा तथा धीरेंद्र शास्त्री म्हणाले.

# आधी फाटलेले शर्ट घालायचे, पण सत्ता येताच १०० कोटींचा बंगला बांधला

## ● स्वाती मालीवाल यांनी केली केजरीवालांवर टिका ●

**मुंबई :** राघव चड्ढा यांनी सहा खासदारांसह आम आदमी पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश करताच देशाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळवळ उडाली. राघव चड्ढा यांच्यासह संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर आप मधील अंतर्गत मतभेद उघड झाल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, या घडामोडीनंतर खासदार स्वाती मालीवाल यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टिका केली. आधी फाटलेलं शर्ट घालायचे, पण सत्ता येताच १०० कोटींचा बंगला बांधला, अशा शब्दांत त्यांनी केजरीवाल यांच्यावर निशाणा साधला. स्वाती मालीवाल म्हणाल्या, 'आज जर कोणी खरंच गद्दार असेल तर ते अरविंद केजरीवाल आहेत. कारण जेव्हा केजरीवाल यांनी आंदोलन सुरू करायचे तेव्हा ते दोन रुपयांचे पेन वापरायचे. फाटलेले शर्ट घालून एका छोटयाश्या गाडीतून फिरायचे यामुळे आम्हांला प्रेरणा मिळायची आणि देशातील जनताही प्रभावित होत असायची. मात्र अरविंद केजरीवाल सत्तेवर येताच त्यांनी लगेच स्वतःसाठी १०० कोटीच्या रुपयांचं घर बांधलं'. या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता असून, आगामी काळात या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोप वाढण्याची चिन्हे आहेत



## अरविंद केजरीवालांचे नवे घर खरंच शीश महल

# चड्ढांचा भाजपा प्रवेशानंतर दुस-याच दिवशी हल्लाबोल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भाजपात प्रवेश केल्याच्या दुस-याच दिवशी खासदार राघव चड्ढा यांनी अरविंद केजरीवाल यांच्या लोधी इस्टेटमधील नवीन घरावरुन 'शीश महल पार्ट २' असा गंभीर आरोप केला आहे. भाजपाने केजरीवाल यांच्या आलिशान घराचे फोटो प्रसिद्ध केले असून, आम आदमी पक्षाने हे फोटो बनावट आणि पिंटरेस्टवरून घेतलेले असल्याचा दावा केला आहे.



दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल लोधी इस्टेटमधील आपल्या नवीन घरात राहायला गेल्यानंतर अवघ्या एका दिवसात वादाला तोंड फुटले आहे. भारतीय जनता पक्ष आणि नुकतेच आप सोडून बाहेर पडलेले खासदार राघव चढ्ढा यांनी केजरीवाल यांच्यावर शीश महल पार्ट २ उभारल्याचा आरोप केला आहे.

आम आदमी पक्षाने या आरोपांना प्रत्युत्तर दिले असून, भाजपाने दाखवलेले फोटो बनावट असल्याचे म्हटले आहे. हे फोटो पिंटेरेस्ट वरून घेतल्याचा दावाही आपने केला आहे.माध्यमांशी बोलताना राज्यसभा खासदार राघव चढ्ढा यांनी असा दावा केला की, शीश महल हेच गेल्या वर्षी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या पराभवाचे कारण ठरले होते. दिल्लीत शीश महल पार्ट टू आला आहे. याचे काही फोटो समोर आले आहेत. दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या पराभवाचे जर एखादे प्रमुख कारण असेल, तर त्यापैकी शीश महल हे एक होते दिल्ली निवडणुका संपून वर्षही उलटले नाही, तोपर्यंत शीश महल पार्ट टू समोर आला आहे. जेव्हा रस्त्यावरील लोक आम आदमी पक्षाच्या उरलेल्या चांगल्या कार्यकर्त्यांना शीश महलबद्दल प्रश्न विचारतील, तेव्हा ते काय उत्तर देतील असा प्रश्न मला पडतो. आम आदमी पक्षाने आत्मपरीक्षण केले पाहिजे, असे राघव चढ्ढा म्हणाले. आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदारांना घेउन भाजपामध्ये प्रवेश केल्याच्या➪(पान २ वर)

# राघव चड्ढांना पक्षांतर नडले; एका झटक्यात गमावले १० लाख फॉलोअर्स

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आम आदमी पार्टी (आप) सोडून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा राघव चड्ढा यांचा निर्णय तरुणांना फारसा रुचलेला दिसत नाही. तरुणाईत प्रचंड लोकप्रियता असलेले राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी भाजप प्रवेशाच्या अवघ्या २४ तासांत १० लाख फालोअर्स गमावले आहेत.



राघव चड्ढा यांनी आपला सोडचिठ्ठी देउन भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे दिल्लीच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे. चड्ढा यांच्यासोबत आपचे आणखी सहा राज्यसभा खासदारही भाजपमध्ये सामील झाले आहेत, ज्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाला मोठे खिंडार पडले आहे. काही आठवड्यांपूर्वीच त्यांची आपच्या राज्यसभा उपनेतेपदावरून हकालपट्टी करण्यात आली होती, तेव्हापासूनच ते भाजपमध्ये जाणार अशी चर्चा होती. मात्र, त्यांचा हा निर्णय त्यांच्या तरुण चाहत्यांना आवडलेला नाही. सोशल मीडियावरील फालोअर्सची संख्या ही लोकप्रियतेचा मापदंड मानली जाते. आकडेवारीनुसार, भाजप प्रवेशानंतर २४ तासांच्या आत चड्ढा यांच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्समध्ये १० लाखांची घट झाली आहे. शुक्रवारी राघव चड्ढा यांचे १४.६ दशलक्ष (१ कोटी ४६ लाख) फालोअर्स होते, जे शनिवारी दुपारी १➪(पान२ वर)

# अखिलेश यादवांचा पुतळा जाळताना स्फोट; भाजपा आमदार अनुपमा भाजल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**उत्तर प्रदेशच्या बहराइचमध्ये भाजपाच्या 'महिला जनआक्रोश मोर्चा' दरम्यान एक धक्कादायक घटना घडली आहे. विरोधकांचा निषेध करत असलेल्या नगरच्या आमदार आणि माजी मंत्री अनुपमा जयस्वाल या सपा प्रमुख अखिलेश यादव यांचा पुतळा जाळत असताना झालेल्या स्फोटात भाजल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी सुमारे २:२० वाजता जिल्हाधिकारी (डीएम) चौकात भाजपा कार्यकर्त्यांची मोठी गर्दी जमली होती. आमदार अनुपमा जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली सपा प्रमुख अखिलेश यादव आणि राहुल गांधी यांच्या पुतळ्याचं दहन केलं जात होतं.आमदारांनी पुतळ्याला आग लावण्यासाठी जशी माचिस पेटवली, तसा पुतळ्याच्या आत अचानक जोरदार स्फोट झाला. भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल राय यांनी सांगितलं की, पुतळ्यामध्ये कदाचित पेट्रोलचं प्रमाण जास्त होतं, ज्यामुळे आगीचा गोळा थेट आमदारांच्या चेह?्यावर आला. आमदारांचं कपाळ आणि केसाला आग लागली होती, जी कार्यकर्त्यांनी लगेचच विझवली आणि त्यांना पोलिसांच्या गाडीतून उपचारासाठी ➪(पान २ वर)

# विदर्भातील सर्वच शहरे तापली, एप्रिल महिन्यातच तापमान ४५ अंशांपलीकडे

**नागपूर/प्रतिनिधी :** सूर्याची वक्रदृष्टी कमी होण्याऐवजी ती वाढतच चालली असून शनिवारी अक्षरशः सूर्य विदर्भावर कोपल्याचे दिसून आले. जागतिक तापमानवाढीत सातत्याने समोर असलेल्या अकोला व अमरावती या जिल्ह्याने तापमानाची पंचेचाळीशी ओलांडली आहे. तर तब्बल चार शहरांमध्ये तापमान ४४ अंशाहून अधिक नोंदवले गेले आहे. दरम्यान, हवामान खात्याने संपूर्ण राज्यातच आणि विशेषकरुन विदर्भात उष्णतेची लाट दोन ते तीन दिवस कायम राहील, असा इशारा दिला आहे. दिवसेंदिवस राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे. राज्यातील तापमानाचा पारा ४५ अंशावर गेला आहे. शनिवारी अकोला व अमरावती या विदर्भातील दोन जिल्ह्यात विक्रमी ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्याचबरोबर राज्यातील



अनेक शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे.तापमानात वाढ झाल्यामुळे अनेक जिल्ह्यातील शाळांच्या वेळामध्ये देखील बदल करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असून उष्णतेमुळे नागरिकांना त्रास होउ शकतो. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात उकाडा अधिक जाणवेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला आहे.

काही दिवसांपासून विदर्भातील तापमानात चांगलीच वाढ होत आहे. दरम्यानच्या काळात काही दिवस अवकाळी पावसाने दिलासा दिला असला तरी तापमान पुन्हा त्याच वेगाने किंबहूना त्याहीपेक्षा अधिक वेगाने वाढले आहे. विदर्भात कायमच सर्वाधिक तापमानाची नोंद केली होती. मात्र, यावेळी एप्रिल महिन्यात तापमानाने ४५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानाची नोंद केली आहे.

अकोला शहरात यापूर्वी २९ एप्रिल २०१९ला ४७.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली होती. तर २०१६, १७, १८, १९, २२ आणि २५ या वर्षात देखील तापमान ४५ अंशाहून अधिक नोंदवले गेले होते. अमरावती शहरात आजतागायत एप्रिल महिन्यात एवढ्या ➪(पान २ वर)

# 15 वर्षीय वैभव सूर्यवंशीनं 36 चेंडूत पेश केला शतकी नजराणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**जयपूरच्या घरच्या मैदानात उत्तुंग फटकेबाजीचा नजराणा पेश करताना वैभव सूर्यवंशीनंसनरायझर्स हैदराबाद विरुद्ध यंदाच्या हंगामातील सर्वात जलद शतक झळकावले. १५ वर्षीय स्फोक बॅटरनं ३६ व्या चेंडूवर षटकारासह शतकाला गवसणी घातली. आयपीएल स्पर्धेतील त्याच्या बॅटमधून आलेले हे दुसरे आणि क्ष्घ्ख्र च्या इतिहासातील तिसरे सर्वात जलद शतक ठरले. सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात वैभवनं ३७ चेंडूत ५ चौकार आणि IPL ➪(पान २ वर)




# नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार - मुख्यमंत्री

**नाशिक /प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या गोदा ते नर्मदा जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य शुभारंभ झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेउन



ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज➪(पान २ वर)

# खुशखबर! यंदा मान्सून लवकर दाखल होणार!

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्टस्ने आज मान्सूनबाबत अहवाल जारी केला. त्यानुसार मे महिन्याच्या अखेरीस मान्सून दक्षिण भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. मान्सून सर्वप्रथम केरळमध्ये दाखल होईल आणि नंतर उत्तर भारताच्या दिशेने पुढे सरकेल. त्याआधी अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सून १८ ते २५ मेदरम्यान दाखल होण्याची शक्यता आहे तर केरळमध्ये २५ मेच्या आसपास दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार यावेळी मान्सून लवकर येण्यामागे अल् निनोची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता कमी असणे हे एक कारण आहे. त्याचबरोबर पॉझिटिव्ह इंडियन ओशन डायपोलमुळेही पाउस लवकर पडण्याची आणि मान्सून लवकर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण देशातील



नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. तसेच नागरिकांना उकाड्यापासून दिलासाही मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, सध्या राज्याच्या काही भागांत अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अनेक भागात वादळी वा-यासह पडलेल्या पावसामुळे घरांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात अडकला आहे तर राज्याच्या काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे नागरिकही त्रस्त आहेत. काही दिवसांपूर्वी भारतीय हवामान विभागाने २०२६ मध्ये भारतात मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तवली होती. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार जून ते सप्टेंबर या दक्षिण-पश्चिम मान्सून हंगामात देशभरात पाउस दीर्घकालीन सरासरीच्या ९० ते ९५ टक्के राहू शकतो. यामुळे काही भागात शेतक-यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## झारखंडमधील बँकेवर दरोडा; ७ कोटींचे सोने, ५ लाख लंपास

**हजारीबाग :** झारखंडमधील हजारीबाग जिल्ह्यात बँक दरोड्याची एक खळबळजनक घटना समोर आली आहे. बरही पोलिस ठाण्याच्या हद्दीतील



हजारीबाग रोडवर असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये चार जण शिरले आणि अवघ्या १० मिनिटांत तब्बल ७ कोटींचं सोनं आणि ५ लाखांची रोकड घेउन ते पसार झाले. पोलिस तपासात असे समोर आले आहे की, हा संपूर्ण कट पूर्वनियोजित होता. दोन जण सुरु वातीला ग्राहक बनून बँकेत आले आणि त्यांनी अकाउंट सुरू करण्याचा बहाणा केला. काही वेळातच त्यांचे इतर दोन साथीदारही बँकेत दाखल झाले. त्यानंतर चौघांनी अचानक शस्त्रं काढून बँक कर्मचा-यांना धमकावण्यास सुरु वात केली. बँकेत शिरताच त्यांनी कर्मचारी आणि उपस्थित ग्राहकांना एका ठिकाणी गोळा केले. शस्त्रांचा धाक दाखवून सर्वांना घाबरवण्यात आले आणि विरोध केल्यास गंभीर परिणाम भोगण्याची धमकी दिली गेली. दहशत निर्माण करण्यासाठी त्यांनी बँक मॅनेजरला मारहाणही केली.

**फिल्मी स्टाईल दरोडा-** प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हा संपूर्ण दरोडा फक्त १० मिनिटांत टाकला गेला. ते दुपारी ३:१९ वाजता बँकेत शिरले आणि ३:२९ वाजेपर्यंत लूट करून बाहेर पडले. कोणाला काही समजण्यापूर्वीच हे दरोडेखोर लॉकरमध्ये ठेवलेले सोने तसेच कॅश काउंटरमधील रोकड घेउन पळाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि संपूर्ण परिसराची नाकेबंदी केली. बँकेतील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

## भंगार गोदामात स्फोट; ४ ठार
### परफ्यूमच्या बाटलीमुळे भडकली आग; २ जण बेपत्ता

**नीमराणा** / वृत्तसंस्था- राजस्थानमधील नीमराणा (कोटपुतळी-बहरोड) येथे बेकायदेशीर भंगार गोदामाला आग लागल्याने ४ लोक जिवंत जळाले. यात दोन लहान मुलेही आहेत. या अपघातात एक महिला गंभीर भाजली आहे. दोन जणांबद्दल माहिती मिळू शकलेली नाही. सर्व मृत व्यक्ती झारखंडचे आहेत. मृतदेहांची ओळख डीएनए चाचणीने होईल.असा दावा केला जात आहे की, परफ्यूमच्या बाटलीतून बाहेर पडलेल्या रसायनाला आग लागल्याने हा अपघात झाला. गोदामात ठेवलेल्या रासायनिक ड्रममध्येही स्फोट झाले. ही घटना शुक्रवारी संध्याकाळी सुमारे ५ वाजताची आहे. एक किलोमीटर दूरपर्यंत आगीच्या ज्वाळा दिसत होत्या. आजूबाजूच्या लोकांनी सांगितले की अनेक तास त्यांच्या घरांवर काळा धूर पसरलेला होता.एक किलोमीटर दूरपर्यंत आगीच्या ज्वाळा दिसत होत्या. आजूबाजूच्या लोकांनी सांगितले की अनेक तास त्यांच्या घरांवर काळा धूर पसरलेला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, गोदाम शेतजमिनीवर बांधलेले आहे. जे भंगारचे काम करणारे करण सिंग, मामन सिंग कोलीला यांचा मुलगा, यांनी भाड्याने घेतले होते. शुक्रवारी संध्याकाळी कामगार भंगारात मिळालेल्या काही परफ्यूमच्या बाटल्या फोडत होते.त्यातून स्पिरिटसारखे ज्वलनशील रसायन बाहेर पडत होते. याच दरम्यान, तिथे भंगार भरण्यासाठी आलेल्या एका पिकअप गाडीच्या चालकाने बिडी पेटवून जळती काडी फेकून दिली. त्यामुळे रसायनाने पेट घेतला.आग विझविल्यानंतर रात्री उशिरापर्यंत गोदामात शोध घेण्यात आला. गोदामात काम करणा-यांनी सांगितले की त्यांचे दोन सहकारी अजूनही सापडले नाहीत.अपघाताच्या वेळी सुमारे ७ महिला, पुरु ष आणि त्यांची मुले उपस्थित होती. भंगारात आग पसरताच सर्वजण इकडे-तिकडे पळू लागले. यापैकी दोन अल्पवयीन आणि एक महिला गोदामाच्या मागील भागात लपले. त्या भागात भंगार नव्हते. त्यांना वाटले की येथे आगीच्या ज्वाळा पोहोचणार नाहीत, पण भीषण आगीमुळे टीनशेडचे खांब वितळून त्यांच्यावर पडले. खाली प्लास्टिक कचरा पेटू लागला. यामुळे ते तिथेच अडकले.

## ऊन्हाचा कहर! पाळण्यात झोपलेली 8 महिन्यांची चिमुकली पुन्हा उठलीच नाही

**लातूर :** वैशाख वणव्यामुळे जीवाची काहिली होत आहे. रणरणत्या उन्हाचा आरोग्यावर परिणाम होत आहे. औसा तालुक्यातील गोंद्री येथील एका ८ महिने ९ दिवसांच्या चिमुकलीचा उष्माघाताने १९ एप्रिल रोजी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आरोग्य विभागास मिळाल्याने शनिवारी चौकशीसाठी तालुका आरोग्य विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. शिया नेताजी गोरे असे मयत ८ महिने ९ दिवसांच्या चिमुकलीचे नाव आहे. मयत चिमुकली ही निलंगा तालुक्यातील तुपडी येथील आहे. तिची आई बाळंतपणासाठी माहेरी गोंद्रीत येथे आली होती. काही दिवसांपासून ही चिमुकली आजारी होती. त्यामुळे खाजगी रु ग्णालयात उपचार सुरु होते. माहेरचे घर पत्र्याचे असल्याने १९ एप्रिल रोजी दुपारच्या वेळी उष्णतेमुळे घरातील पाळण्यात झोपलेली बालिका उठली नाही. उष्माघाताने बालिकेचा मृत्यू झाल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. या घटनेची माहिती मिळताच तालुकास्तरीय आरोग्य पथक शनिवारी गावात दाखल झाले. प्राथमिक माहिती घेण्यात येत आहे. त्या चिमुकलीचा मृत्यू कशामुळे झाला, हे वैद्यकीय अहवालानंतर समजणार आहे, असे तालुका आरोग्य अधिकारी ड?. आर.एस. देवणीकर यांनी सांगितले. तापमानाचा पारा ४० अंशावर पोहोचला आहे. त्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. २० एप्रिल रोजी निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथील लक्ष्मण दादाराव भंडारे (६०) हे शेतात काम करताना अचानक जमिनीवर कोसळून मृत्यूमुखी पडले. आठवडाभरात ही दुसरी घटना घडली आहे.


## हिमायतनगरमध्ये भीषण अपघात; ट्रकची दुचाकीला धडक, १ ठार, १ गंभीर

**हिमायतनगर :** प्रतिनिधी राशन चा माल घेउन जाणा-या आयचर ट दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये शिरपल्ली येथील १ जण जागीच ठार तर अन्य १ गंभीर जखमी झाला. ही घटना तालुक्यातील शिरंजनी रोडवर दि. २५ एप्रिल रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. हिमायतनगर शहरातील शासकीय धान्य गोदामातून मौजे कौठा व एकंबा गावाकडे रेशनचा माल घेउन आयचर ट्रक एमएच २६ एच ७७७६ हा दि. २५ एप्रिल रोजी निघाला होता. याचवेळी शिरपल्ली मार्ग शिरंजनीवरून हिमायतनगर शहरात एमएच २९ एझेड ४५३८ या दुचाकीवरून दोघेजण येत होते. दुपारी एकच्या सुमारास आयचर ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. ही घटना एचपी गॅस एजन्सीच्या गोडाउन समोर घडली. यात दुचाकीवरील गणेश सदाशिव जाधव वय ५५ राहणार शिरपल्ली यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्यासोबत असलेल्या शंकर विठ्ठल वानखेडे वय ४० राहणार शिरपल्ली हे गंभीर जखमी झाले. अपघात एवढा भयंकर होता की आयचर ट्रकच्या समोरील भागात दुचाकी अडकल्याने जाधव यांचा घटनास्थळी मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच हिमायतनगर पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेउन जखमीस हिमायतनगर शहरातील ग्रामीण रु ग्णालयात दाखल केले. यानंतर पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आल्याची माहिती मिळाली. वृत्त लिहीपर्यंत हिमायतनगर पोलीस स्थानकात अपघाता संदर्भात कुठलाही गुन्हा दाखल झालेला नव्हता. गुन्ह्याचे प्रक्रिया सुरू असल्याची माहिती हिमायतनगर पोलिसांनी सांगीतले.

## अंतर्गत वादातून पुन्हा एकाचा खून!

**नांदेड / प्रतिनिधी**



नांदेड शहरात खुनाची मालिका सुरू च आहे. तिहेरी हत्याकांडापासून ५ खुन झाले. यामुळे नांदेड राज्यभरात चर्चेत आले. यानंतर शुक्रवारी मध्यरात्री पुन्हा एका तरूणाच्या खुनाची घटना घडली. अंतर्गत वादातून नवी पावडेवाडी भागात चाकूने भोसकून हा खून करण्यात आला. पोलिसांनी काही दिवसापूर्वीच आर्म ॲक्ट अंतर्गत ताब्यात घेतलेल्या अट्टल गुन्हेगाराने आपल्या मित्रांना सोबत घेउन या तरूणाचा पाठलाग करून खून केला. दरम्यान स्थानिक गुन्हा शाखेने नवे शिलेदार मिळाले आहेत, मात्र अवघ्या २४ तासात गुन्हेगाराने या शिलेदारांना खुनाची सलामी दिली आहे.

# देवस्थान इनाम जमिनींसाठी लवकरच कायदा

## महसूल विभागाचे क्रांतिकारी निर्णय

### नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा महसूल मंत्री

**नागपूर :** पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील देवस्थान इनाम जमिनींसंदर्भातील वाद कायमस्वरूपी सोडवण्यासाठी राज्य सरकार कायदा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूल विभागातील महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील देवस्थान इनाम जमिनींसंदर्भातील वाद कायमस्वरूपी सोडवण्यासाठी राज्य सरकार कायदा करण्याच्या तयारीत आहे.. सुमारे चार लाख हेक्टर जमिनी या देवस्थान इनाम प्रकारातील असून, देवस्थान हक्क व कुळ हक्क याबाबत स्पष्टता आणण्यासाठी कायदा आवश्यक आहे. हा प्रस्तावित कायदा दोन-तीन दिवसांत महसूल विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाणार असून नागरिकांना सूचना व अभिप्राय नोंदवता येणार आहेत. यावर



अंतिम निर्णय जुलै महिन्यातील अधिवेशनात घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सरकारने व्यापक कृती आराखडा (अक्शन प्लॅन) तयार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सर्व पालकमंत्र्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. नागपूर व अमरावती येथे बैठका घेउन जलसाठे मजबूत करणे, पाणी साठवण वाढवणे, अपव्यय टाळणे व काटकसरीने वापर करणे यासंदर्भात विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

दुष्काळी परिस्थितीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, बुलढाणा, हिंगोली तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये जलसाठे कमी असल्याने परिस्थिती गंभीर आहे. यासाठी जिल्हाधिका-यांशी चर्चा करून उपाययोजना आखण्यात आल्या असून जनतेला पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. यासाठी १७-१८ उपाययोजना राबवण्यात येत असून सर्व जिल्हाधिका-यांसाठी स्वतंत्र एसओपी व नियमावली तयार करण्यात आली आहे. जल जीवन मिशन अंतर्गत निधी उपलब्ध असून त्यात कोणतीही अडचण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पश्चिम बंगालमधील मतदानाबाबत प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर मतदान झाले असून त्यांना सत्तेपासून दूर जावे लागेल, असा दावा त्यांनी केला

## शिवरायांचा इतिहास बदलण्याचा भाजपचा कट
### कॉंग्रेसची गुन्हा दाखल करण्याची मागणी

**मुंबई /प्रतिनिधी-** काँग्रेस सरचिटणीस सचिन सावंत यांनी धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांचा भोंदू म्हणून उल्लेख करत त्यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप केला आहे. शिवरायांनी थकून राजपाट रामदास स्वामींकडे दिला असे धादांत खोटे संघाच्या व्यासपीठावरून बोलले जात असल्याचा आरोप सचिन सावंत यांनी केला. बागेश्वर बाबा यांचा नागपुरात एक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात बोलताना बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्या भेटीचा दाखला देत उपरोक्त वादग्रस्त विधान केले. त्यांच्या या विधानावर राजकीय वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेस सरचिटणीस सचिन सावंत यांनीही या प्रकरणी त्यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, भोंदू धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा संघाच्या व्यासपीठावर येतो आणि आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज कोण होते? हे सांगतो! या लोकांना वर्तमान माहीत नाही ते इतिहास सांगणार. शिवरायांनी थकून राजपाट रामदास स्वामींकडे दिला असे धादांत खोटे आणि संघाच्या व्यासपीठावर बोलले जाते. हा महाराजांच्या कर्तृत्वाचा अपमान आहे.

मुळात रामदास स्वामी आणि महाराजांची भेटच झाली का? यावर



प्रश्नचिन्ह आहे. मनुवादी भाजपचा छत्रपती शिवरायांचा इतिहास बदलण्याचा कट आहे आणि तीच भाषा हा बागेश्वर बाबा करत आहे. आणि याला मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री गडकरी, मोहन भागवत थांबवत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेउन राजकारण करणा-या महायुती सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणा-या या बागेश्वर बाबाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा.

**चार मुले काढून एक संघाला द्या**

सचिन सावंत पुढे म्हणाले, या बागेश्वर बाबाने अजून गुण उधळले तो म्हणाला, चार मुले काढून एक संघाला द्या मग इतर तीन मुलांचे संगोपन, शिक्षण कसे करायचे? हे पण सांगा. बरं हे सांगणारा आणि ज्यांच्या व्यासपीठावर हे सांगतोय ते सर्व ब्रह्मचारी! जी गोष्ट करायची ती स्वतःपासून आधी अमलात आणा. महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी आणि अशा लोकांना मान्यता दिल्याबद्दल आता संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी स्वतः महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे ही आमची मागणी आहे.

**देशात भाजपमुळे भोंदूबाबांचे पीक**

भाजपा आणि संघाचे राजकारण पुढे नेण्यासाठी देशात भोंदूबाबांचे पीक भाजपाने आणले आहे. मोदी सरकार देशात आणण्यासाठी काही बाबांचीच मदत घेण्यात आली होती. काळा पैसा येणार, पेट्रोल स्वस्त होणार इत्यादी भाजपाच्या वल्गनांवर जनतेचा विश्वास बसावा यासाठी या बाबांचे योगदान होते. नंतरच्या काळात प्रवचने, कथा, कीर्तने यांच्या नावाखाली समाजात द्वेष पसरविण्याचे पर्यायाने भाजपाचा प्रचार करण्याचे काम काही बाबा, बुवांना देण्यात आले आहे. काही बाबांना राजमान्यता देउन त्यांचे प्रस्थ वाढवण्यासाठी मदत केली जाते.

## भाजपा प्रवेशानंतर हरभजन सिंग यांच्या विरोधात आपचे आंदोलन; घराबाहेर लिहिलं ‘गद्दार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** माजी क्रिकेटपटू आणि राजकारणी हरभजन सिंग यांच्या यांनी आपच्या इतर सहा खासदारांसह पक्षाचा राजीनामा देउन भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. यानंतर दुस-याच दिवशी आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हरभजन सिंग यांच्या घराबाहेर जोरदार आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी त्यांच्या घराच्या भिंतीवर काळ्या रंगाने गद्दार हा शब्द लिहिला. तसेच जालंधरमधील त्यांच्या निवासस्थानाबाहेर अनेक कार्यकर्त्यांनी डोळ्यांवर काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला.माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग सध्या आयपीएलशी संबंधित कामानिमीत्त बाहेर व्यस्त आहेत आणि आंदोलनाच्या वेळी ते त्यांच्या घरी उपस्थित नव्हते असे सांगितले जात आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. राज्यसभा खासदार राघव चढ्ढा यांनी शुक्रवारी १५ वर्षांनंतर पक्ष सोडण्याची घोषणा केली. चड्ढा यांनी इतर खासदारांसह ते भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राज्यसभेतील आपच्या उपनेतेपदावरून त्यांना हटवल्यानंतर काही आठवड्यांतच हे पाउल उचलले आहे. ज्यामुळे आम आदमी पक्षात उभी फूट पडली आहे.राज्यसभा खासदार राघव चढ्ढा, अशोक मित्तल आणि संदीप पाठक यांनी अध्यक्ष नितीन नबीन यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. दुसरीकडे, माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, राजेंद्र गुप्ता आणि विक्रमजीत साहनी हे येत्या काही दिवसात पक्षात प्रवेश करतील असे सांगितले जात आहे.पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पक्षातून बाहेर पडलेल्या सात खासदारांना गद्दार म्हटल्यानंतर असे दुस-याच दिवशी सिंग यांच्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला संबोधित करताना, मान यांनी असा आरोपही केला की भाजपा आप फोडण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्यांनी पंजाबच्या जनतेचा विश्वासघात केला आहे.दरम्यान, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आपच्या सात राज्यसभा खासदारांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया शनिवारपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. राज्यसभेचे सभापती या गटाचे भाजपाच्या संसदीय पक्षात विलीनीकरण करण्यास मान्यता देउ शकतात, कारण यासंदर्भातील सर्व कायदेशीर प्रक्रिया आधीच पूर्ण झाली आहे, असेही सूत्रांनी सांगितले. पंजाबमधील २०२७ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आल्याचे पाहायला मिळत आहे.

## के. कविता यांच्याकडून नव्या राजकीय पक्षाची घोषणा

**हैदराबाद :** भारत राष्ट्र समितीच्या (बीआरएस) माजी नेत्या के. कविता यांनी शनिवारी तेलंगणा राष्ट्र सेना (टीआरएस) या आपल्या नव्या राजकीय



पक्षाची स्थापना केली. बीआरएसपासून विभक्त झाल्यानंतर जवळपास सात महिन्यांनी त्यांनी हा पक्ष स्थापन केला आहे. हैदराबादमधील पक्षाच्या लॉंचिंग कार्यक्रमात के. कविता यांनी आपल्या पक्षाचे नाव तेलंगणा राष्ट्र सेना (टीआरएस) असल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे, त्यांचे वडील आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी यापूर्वी तेलंगणा राष्ट्र समिती या पक्षाची स्थापना केली होती, ज्याचं नाव त्यांनी नंतर बदलून भारत राष्ट्र समिती (बीआरएस) असे केले होते.

**अजेंडा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठीः** आज सकाळी के. कविता यांनी तेलंगणासाठी स्वतंत्र राज्याच्या निर्मितीसाठी १९६९ च्या आंदोलनात प्राण गमावलेल्यांना हैदराबादमधील गन पार्क येथील अमराविरु ला स्तूपावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यानंतर के. कविता यांनी राज्यात एक नवीन प्रादेशिक राजकीय शक्ती स्थापन करण्याची योजना जाहीर केली.त्यांनी यावर जोर दिला की, ही शक्ती राज्याच्या आकांक्षा आणि अपूर्ण राहिलेल्या अजेंड्यावर लक्ष केंद्रित करेल. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना के. कविता यांनी सांगितले की, त्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना बीआरएसमधून काढून टाकण्यात आलं होतं आणि त्यांनी स्वेच्छेने पक्ष सोडला नव्हता. त्या म्हणाल्या, तेलंगणाच्या प्रादेशिक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी बीआरएस पक्षाची स्थापना झाली होती, परंतु त्यांनी पक्षाचं नाव, त्याचं कार्य आणि पक्षाचा मूळ आत्माच बदलला, ज्यामुळे लोकांसोबतचा त्यांचा संपर्क तुटला. जेव्हा एखादा पक्ष आपल्या मूळ मुद्यांपासून भरकटतो, तेव्हा तो टिकू शकत नाही. तेलंगणाचा अपूर्ण राहिलेला अजेंडा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्याला एका प्रादेशिक पक्षाची गरज आहे आणि तो पक्ष आमचा असणार आहे.

## शिंदे भक्तअसल्यामुळेच खरात प्रकरण ऊघडकीस!
### अंनिसचे श्याम मानव यांच्याकडून फडणवीसांवर थेट आरोप

नागपूर : खरात यांच्याकडे अनेक राजकीय लोक जात होते. एकनाथ शिंदे हे खरातचे भक्तअसल्यामुळे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांनी प्रकरण उघडकीस येउ दिले, असा आरोप अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक श्याम मानव यांनी फडणवीसांवर लावला. जर फ़डणवीसांचे दोन-तीन निकटवर्तीय खरातचे भक्त असते तर हे प्रकरण पुढे आले असते का, असा सवालही मानव यांनी उपस्थित केला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने शुक्रवारी झाशी राणी चौकातील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनात श्याम मानव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. बुवा तेथे बाया खरातसारख्या बाबाला स्त्रीया का फसतात? या विषयावर त्यांनी संबोधित केले. खरात प्रकरणात नाशिक पोलिसांनी स्तुत्य कार्य केले आहे. गृहमंत्री फडणवीस यांनी सूट दिल्यामुळेच पोलीस हे करू शकले. गृहमंत्री म्हणून योग्य भूमिका निभावल्यामुळे त्यांचे अभिनंदन मानायला हवे, असे मानव म्हणाले. मात्र फडणवीस यांचे

नागपूरमध्ये २०२३ साली झालेल्या बागेश्वर बाबाच्या कार्यक्रमाचा दाखला त्यांनी दिला. नागपूरमध्ये दिव्य दरबार कार्यक्रमात बागे□र बाबा यांनी चमत्काराचा दावा केला. याबाबत पोलिसांना सर्व पुराव्यानिशी माहिती दिल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही.



तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तर अंधश्रद्धा विरोधी कायदा सारखा कुठला कायदा अस्तित्वातच नाही, असे थेट सांगितले. कायदा तयार करण्यात सक्रिय सहभाग असणा-याला कायदाच अस्तित्वात नाही असे सांगणा-या आयपीएस अधिका-याना काय अभ्यास केला असेल, असे श्याम मानव म्हणाले. त्यांचे बास जर बागेष्वर बाबाच्या कार्यक्रमात हजेरी लावत असतील तर पोलिसही कारवाई करणार तरी कसे, असा प्रश्न उपस्थित करत फडणवीसांच्या काळात पोलीस घाबरट झाले असल्याचा आरोप श्याम मानव यांनी केला.

खरातच्या जाळ्यात फसणा-या स्त्रीया यासाठी दोषी नसून समाजाने लहानपणापासून दिलेले संस्कार, शोषणाची मानसिकता हे कारणीभूत आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, प्रा.शरद पाटील यांच्यासह मोठ्या प्रमाणात मान्यवर उपस्थित होते.२०१३ मध्ये अंधश्रद्धा विरोधी कायदा तयार झाला, यानंतर २०१४ साली फडणवीस मुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. मात्र त्यांच्या काळात हा कायदा कमकुवत करण्यात आला. याचा प्रसार होउ दिला गेला नाही, आर्थिक तरतुदीसाठी मंत्रालयाच्या फे-या मारल्या, मात्र कधीही मदत मिळाली नाही.

अंनिसच्या कामामुळे आज विदर्भात चमत्कार दाखविणारा एकही बाबा नाही. सरकारच्या मदतीने प्रबोधनाचे हे काम महाराष्ट्रभर सुरू राहिले असते तर आज खरातसारखे बाबा फोफावले नसते. त्यामुळे खरातसारखे बाबा पुढे येण्यासाठी फडणवीसच दोषी आहेत, असा आरोप मानव यांनी लावला.

## भाजपा आमदाराची नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** चार पूर्णवेळ सदस्य नीती आयोगात नियुक्त करण्यात आले. अशोक कुमार लाहिरी यांनी आज (२५ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मोदींनी लाहिरी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर एक फोटो एक्सवर पोस्ट केला. त्यात त्यांनी अशोक लाहिरी व इतर चार पूर्णवेळ सदस्यांचे अभिनंदन केले. अर्थतज्ज्ञ के.व्ही. राजू, एम्सचे संचालक एम. श्रीनिवास, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव अभय करंदीकर आणि आयआयएसइआर भोपाळचे संचालक गोवर्धन दास या चौघांची नीती आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती झाली. व्ही. के. प?ल, व्ही. के. सारस्वत, रमेश चंद आणि अरविंद वीरमणी या चार सदस्यांचा कार्यकाळ समाप्त झाला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ट्विटमध्ये मंत्रिमंडळाचे माजी सचिव राजीव गाबा यांचा देखील उल्लेख केला आहे. राजीव गाबा यांची मागील वर्षी नीती आयोगाच्या पूर्णवेळ सदस्य पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना सदस्य पदावर कायम ठेवण्यात आले आहे. अशोक कुमार लाहिरी हे माजी मुख्य आर्थिक सल्लागार तसेच १५ व्या वित्त आयोगाचे सदस्य आहेत. नीती आयोगाच्या उपाध्यक्षा सुमन बेरी यांच्याकडून ते कार्यभार स्वीकारतील. सुमन बेरी पुढच्या महिन्यात निवृत्त होणार आहेत.नीती आयोगाच्या विद्यमान उपाध्यक्षा सुमन बेरी या अर्थतज्ज्ञ आणि



प्रशासकीय संशोधक आहेत. तर अशोक कुमार लाहिरी यांच्याकडे प्रशासकीय अनुभव आहे. त्यांनी निवडणुकांशी संबंधित कामकाज सांभाळले आहे. ते सध्या पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे आमदारही आहेत. त्यामुळे अर्थतज्ज्ञ असलेले अशोक लाहिरी हे नीती आयोगाच्या यापूर्वी नियुक्त झालेल्या इतर उपाध्यक्षांपेक्षा वेगळे ठरतात.

बागेश्वर बाबांच्या विधानावर फडणवीसांची मोठी प्रतिक्रिया; शिवराय आणि आरएसएसबाबत मांडली भूमिका!

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना पश्चिम बंगाल मधील भाजपाचे आमदार अशोक कुमार लाहिरी यांची नीती आयोगाच्या उपाध्यक्ष पदावर नेमणूक करण्यात आली आहे. नीती आयोग सध्या अनेक क्षेत्रात मोठे बदल घडवून आणत आहे. अर्थतज्ज्ञ असलेले लाहिरी हे केंद्र, राज्य तसेच स्थानिक पातळीवरील प्रशासकीय यंत्रणांमध्ये उत्तम ताळमेळ साधू शकतात. नीती आयोगाचे कामकाज तळागाळात पोहोचवण्यासाठी त्यांचा अनुभव उपयोगी पडू शकतो. दरम्यान, नीती आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्त झालेले गोवर्धन दास हे देखील पश्चिम बंगालचे आहेत.

अशोक कुमार लाहिरींकडे कोणता अ**नुभव?** केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून अशोक कुमार लाहिरी यांनी काम केले आहे. ऑक्टोबर २००२ ते जून २००७ दरम्यान तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी तसेच तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारचे ते मुख्य आर्थिक सल्लागार होते. त्यांनी पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट सरकारचा विरोध केला. पश्चिम बंगाल मध्ये व्यवसायांचे पुनरूत्थान होणे अत्यावश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. भारताच्या दोन पंतप्रधानांचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून काम करण्याचा अनुभव अशोक कुमार लाहिरी यांच्याकडे आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि वर्ल्ड बँकेत केले काम**

अशोक कुमार लाहिरी यांनी अर्थ मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार म्हणूनही काम केले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (क्ष्क़) मध्ये त्यांनी वरिष्ठ अर्थतज्ज्ञ, तर वर्ल्ड बँकेत त्यांनी सल्लागार म्हणून काम पाहिले. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड प?लिसीमध्ये त्यांनी संचालक पद सांभाळले होते. तसेच ते १५ व्या वित्त आयोगाचे सदस्यही राहिले आहेत. बंधन बँकेत त्यांनी गैर कार्यकारी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले. एशियन डेव्हलपमेंट बँकेतून ते कार्यकारी संचालक पदावरून जून २०१३ मध्ये निवृत्त झाले. अशोक कुमार लाहिरी यांनी त्यांच्या इंडिया इन सर्च ऑफ ग्लोरी या पुस्तकात लोकशाहीतील विकासाविषयी लिहिले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळपास सात दशके भारतात आर्थिक सामाजिक विकास मंदावला होता, असे लाहिरी यांनी पुस्तकात लिहिले आहे. भारतीय लोकशाही व्यवस्था वृद्धिंगत होत गेली. लोकांचे उत्पन्न वाढत गेल्याने, गरिबीत घट झाल्याने, साक्षरता वाढल्याने आणि शहरीकरण झाल्याने विकास होतो, विकासाची गती वाढवण्यासाठी या गोष्टी करणे महत्वाचे आहे, असे लाहिरी यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे.

**निवडणुकांपूर्वी सुरू केल्या जाणा-या सरकारी योजनांवर टीका**

सरकारकडून निवडणुकांपूर्वी सुरू केल्या जाणा-या योजनांवर लाहिरी यांनी परखड टीका केली होती. या योजनांचा अर्थसंकल्पावर विपरीत परिणाम होतो, असे ते म्हणाले होते. आर्थिक शिस्त मोडल्यास काही राज्यांवर संकट येउ शकते, असा इशारा त्यांनी दिला होता. मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी राज्यांकडून जनहिताच्या प्रकल्पांवर फारच कमी गुंतवणूक केली जात आहे, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत, असेही अशोक कुमार लाहिरी म्हणाले होते. पश्चिम बंगालमध्ये सध्या विधानसभेची निवडणूक सुरू असून पहिल्या टप्प्यातील मतदान २३ एप्रिल रोजी पार पडले आहे. दुस-या टप्प्यातील मतदान २९ एप्रिल रोजी होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होतील.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलढाणा

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com

mail : jmakola.thakur@gmail.com

■ रविवार २६ एप्रिल २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४


## शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांची विद्याभारती शाळेच्या धमाल उन्हाळी शिबिरास सदिच्छा भेट



■ प्रतिनिधी | वाशीम ■

येथील विद्याभारती शाळेत सुरू असलेल्या उन्हाळी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. संजय ससाणे यांनी शिबिरास सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह अधिक वाढला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. संजय ससाणे, सुंदर हस्ताक्षर तज्ञ पी. पी. चोपडे, शाळेचे उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी प्रशासन अधिकारी, नगर परिषद वाशिम, संचालक सुमित मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतीच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कीर्ती कुलकर्णी यांनी करत शिबिराच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शिक्षणाधिकारी मा. संजय ससाणे यांनी शिबिरातील विविध उपक्रमांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना उन्हाळी शिबिराचा योग्य उपयोग करून आपले कौशल्य विकसित करण्याचे आवाहन केले. 'अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि सहकार्याची भावना विकसित होते,' असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

शाळेच्या वतीने आयोजित या उन्हाळी शिबिरामध्ये चित्रकला, हस्तकला, खेळ, योग, नृत्य, कराटे, गीतगायन, बालसंस्कार, रांगोळी आणि झुंबा डान्स अशा विविध शैक्षणिक व कौशल्य विकासात्मक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून आपली कला आणि कौशल्य सादर केली. यावेळी शाळेचे उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे तथा शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा आदर करून जीवनात यशस्वी होण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन निमके यांनी केले, तर आभार प्रदर्शन पद्मिनी खराटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन डावलून विश्वस्ताच्या नातेवाईकांना बेकायदेशीर नोकरीवर लावण्याचा प्रयत्न

### अवैध नौकर भरतीत इ मा व बहूजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालकांची भूमिका संशयाच्या घेऱ्यात



■ प्रतिनिधी | वाशीम ■

मानोरा तालुक्यातील वादग्रस्त निवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेच्या वस्तीगृहात पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्याचे सहाय्यक संचालक आणि प्रादेशिक संचालक यांच्या लेखी चौकशीमध्ये अनेकदा सिद्ध झाले असताना देखील संबंधित संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष यांच्या सुनेला महिला अधीक्षिका म्हणून बेकायदेशीर पदस्थापना देण्याच्या प्रस्तावाला जिल्हा सहाय्यक संचालक कार्यालयाने प्रादेशिक उपसंचालक कार्यालया कडे पाठविण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, वाशिम यांच्या कार्यालयातून २८ ऑक्टोंबर २०२४ रोजी जारी करण्यात आला आहे. या पत्रानुसार कु. मोनालीसा देवानंद राठोड या वादग्रस्त संस्थेच्या अध्यक्षांच्या सुनेला निवासी महिला वस्तीगृह त. का. बा. निवासी आश्रम शाळेत अधीक्षिका पदासाठी मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही शिफारस जिल्ह्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालिका दीपा हिरोळे यांनी केली आहे.

**नियमबाह्य बाबी:**

आश्रम शाळेच्या वस्तीगृहात विद्यार्थी संख्या कमी असल्याचे चौकशीत वारंवार सिद्ध झाले असूनही अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन न करता नवीन पदस्थापना करण्यात आली आहे. यापूर्वी आर्थिक व्यवहाराच्या आरोपाखाली विद्यमान संस्था अध्यक्षांनी मनमर्जीने बेकायदेशीर नेमणूक केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे खारिज करण्यात आली होती. असे असतानाही पुन्हा त्याच संस्थेत त्यांच्या सुनेला पद देण्याच्या हालचाली संशयास्पद आहेत.

**प्रस्तावातील माहिती**

पत्रानुसार मोनालीसा राठोड यांची नेमणूक २८ ऑक्टोंबर २०२४ पासून मान्यता देण्याची शिफारस आहे. त्यांचे वेतनश्रेणी एस.१० २९३० ते ९२३० रुपये इतकी दर्शविली आहे. तर पदस्थापनेची तारीख २८ ऑक्टोंबर २०२४ ते २६ ऑगस्ट २०२७ पर्यंत परिवीक्षाधीन मान्यता अशी आहे.

**सवाल उपस्थित:**

आश्रम शाळेत पुरेसे विद्यार्थी नसताना नवीन अधीक्षिकेची गरज का भासली? अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन न करता सरळ संस्था अध्यक्षांच्या सुनेला (नातेवाईकाला)दुसऱ्यांदा पद देणे हा नियमबाह्य प्रकार नाही का? दीपा हिरोळे यांचा यामागील हेतू काय? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

**प्रशासनाची संशयास्पद भूमिका:**

याबत वरिष्ठ पातळीवर चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक तक्रार करते इंद्रजीत राठोड यांनी केली आहे. प्रादेशिक उपसंचालक साळवे यांच्याशी संपर्क साधला असता पत्राची प्रत पाठवा चौकशी करू असे मोघम उत्तर प्रस्तुत प्रतिनिधीला दिले पत्र पाठविल्यानंतर मोबाईल नंबर विजय साळवे यांनी ब्लॉक करून टाकल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधींनी दिली.ङ

**पुढील कारवाई:**

प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अमरावती यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मात्र विद्यार्थी संख्या आणि अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन याचा विचार न करता दिलेली मान्यता नियमबाह्य ठरण्याची शक्यता आहे.

## आपत्तीच्या काळात तात्काळ व समन्वयित प्रतिसाद अत्यावश्यक - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर



### आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आपदा प्रतिसाद किट बाबत प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशीम ■

आपत्तीच्या प्रसंगी त्वरित, समन्वयित आणि प्रभावी प्रतिसाद देणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी सर्व यंत्रणांनी सदैव सज्ज राहावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

वाशिम येथील नियोजन भवन सभागृहात आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आपदा प्रतिसाद किट बाबत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात ते अध्यक्षस्थाना वरून बोलत होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी आपदा प्रतिसाद किटचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, नैसर्गिक आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत जीवित हानी व मालमत्तेचे नुकसान कमी करण्यासाठी किट मधील साहित्याचा योग्य व प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने कार्य करत समन्वय साधावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. प्रशिक्षणा दरम्यान आपदा प्रतिसाद किटमध्ये असलेल्या विविध साहित्याची माहिती, त्यांचा प्रत्यक्ष वापर, तसेच आपत्तीच्या वेळी घ्यावयाच्या उपाय योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक दक्षता व नियोजन याबाबतही माहिती देण्यात आली. यावेळी परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, प्रशिक्षक संतोष बैले आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशिक्षणाला सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत अधिकारी, आपदा मित्र, आपदा सखी आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या प्रशिक्षणामुळे संबंधित यंत्रणांची आपत्ती हाताळण्याची क्षमता अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

## कृषि विज्ञान केंद्रात 'अतिघनता कपाशी लागवड तंत्रज्ञान' विषयावर एकदिवसीय वैज्ञानिक कार्यशाळेचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशीम ■

दिवसेंदिवस बदलत असलेल्या हवामानातील अस्थिरता, अनियमित पर्जन्यमान, तापमानातील चढ-उतार तसेच वाढता कीड-रोग प्रादुर्भाव यामुळे खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होत असून उत्पादनात घट होत आहे. त्याचबरोबर पिक संरक्षणासाठी होणारा खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतीतील निव्वळ नफा कमी होत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी अतिघनता कपाशी लागवड तंत्रज्ञानङ हे अधिक उत्पादनक्षम, खर्चिकदृष्ट्या फायदेशीर व शाश्वत पर्याय म्हणून उदयास येत आहे.

अतिघनता पद्धतीने कपाशी लागवड केल्यास प्रति एकक क्षेत्रातील झाडांची संख्या वाढवून अधिक उत्पादन मिळविता येते. तसेच सुधारित वाणांचा वापर, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, पिक वाढ नियमन, कीड-रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन आणि वेळेवर तांत्रिक उपाययोजना केल्यास उत्पादनक्षमता व नफाक्षमता वाढण्यास मदत होते. याशिवाय कपाशी काढणीनंतर गहू लागवडीसाठीही ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरत आहे. जुन्या म्हणी प्रमाणे ङउपट पराटी पेर गहूङ ही सुद्धा साध्य होण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक, वैज्ञानिक व शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी 'अतिघनता कपाशी लागवड तंत्रज्ञान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन सोमवारी, ङदिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजताङ कृषि विज्ञान केंद्र, करडा प्रक्षेत्रावर करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळेङ भूषविणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय कृषि अधिकारी ङएस. के. वाळकेङ, प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, वाशिम ङडॉ. बी. डी. गितेङ, तालुका कृषि अधिकारी, रिसोड ङमगनदास तावरेङ यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ ङटी. एस. देशमुख, आर. एस. डवरे एस. के. देशमुख हे तांत्रिक मार्गदर्शन करणार आहेत. तरी परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन आधुनिक कपाशी लागवड तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी केले आहे.

## वाहनाची अज्ञात ट्रॅक्टरला जोरदार धडक एक ठार, एक गंभीर जखमी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

सेनगाव मार्गावर मुंगसाजी नगर परिसरात दुधाच्या कॅन घेऊन येणाऱ्या इंट्रा चारचाकी वाहनाने अज्ञात ट्रॅक्टरला मागून जोरदार धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाल्याची भीषण घटना २४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास घडली.

या अपघातात वैजनाथ भाऊराव मुकाडे (वय २४, रा. खिलार, ता. सेनगाव, जि. हिंगोली) यांचा जागीच मृत्यू झाला. तर वाहन चालक दतराव धुरपतराव चिलधर (वय २६, रा. खिलार, ता. सेनगाव, जि. हिंगोली) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दतराव चिलधर व त्यांचे सहकारी वैजनाथ मुकाडे हे इंट्रा वाहन (क्रमांक एमएच ३८ एक्स ३८९०) द्वारे सेनगावहून रिसोडकडे दुधाचे कॅन घेऊन येत होते. दरम्यान, मुंगसाजी नगर जवळ समोरून चालत असलेल्या अज्ञात ट्रॅक्टरला त्यांनी मागून जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की वाहनाच्या कंडक्टर बाजूचा अक्षरशः चुराडा झाला. या भीषण अपघातात वैजनाथ मुकाडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर चालक चिलधर गंभीर जखमी झाले. अपघातानंतर अज्ञात ट्रॅक्टर चालक घटना स्थळावरून पसार झाला.घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गीते यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमीस रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच मृतकास वाहनातून बाहेर काढण्यासाठी सुमारे एक ते दीड तास अथक प्रयत्न करावे लागले.मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला असून २५ एप्रिल रोजी सकाळी शवविच्छेदना नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.दरम्यान, या अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात ट्रॅक्टरचा शोध रिसोड पोलीस घेत असून अद्याप या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.



## बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत उन्हाळी शिबिरातील उपक्रम विद्यार्थ्यांसाठी कौशल्यपूर्ण - डॉ.उमेश तारे



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे विद्यार्थ्यांसाठी लर्न विथ फन या उक्ती प्रमाणे उन्हाळी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिराच्या उद्घाटन सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे तर प्रमुख प्रमुख अतिथी नगर पंचायत सदस्य अभी घुगे, शाबीर शहा,डॉ.उमेश तारे, सय्यद इमरान, नृत्य मार्गदर्शिका वृषाली गर्जे, उपस्थित होते सदर कार्यक्रमाची सुरुवात विद्येची आराध्य देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमापूजन व हार अर्पण करून करण्यात आली.यानंतर प्रमुख उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने शिल्ड,पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आजच्या आधुनिक युगात जग दिवसेंदिवस एकेक शिखरे पार करत आधुनिक युगात पुढे जात आहे तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आहे सदर उन्हाळी शिबिर ०१ मे पर्यंत चालणार असून यामध्ये विद्यार्थ्यांसाठी चित्रकला आर्ट, रांगोळी आर्ट, क्राफ्ट,योगा,झुम्बा डान्स, वैदिक मॅथ, मेहंदी नृत्य,० fराटे,ज्वेलरी मेकिंग, सोलो डान्स, बालसंस्कार प्रबोधन इत्यादी उपक्रम व तसेच मनोरंजक खेळ व विद्यार्थ्यांसाठी दररोज स्नेहभोज सुद्धा समाविष्ट असणार आहेत. सदर उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन मु विठ्ठल भिसडे यांनी केले.यामध्ये त्यांनी शाळेच्या विविध उपक्रम व शाळेतील नाविन्यता बद्दल मान्यवरांना माहिती दिली. तसेच प्रमुख अतिथी डॉ. उमेश तारे व सय्यद इम्रान यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. व शाळेत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचाल न सुषमा इंगळे यांनी केले तर उन्हाळी शिबिराचे आयोजन विजया भिसडे व सुषमा इंगळे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

## मत्स्य व्यवसायिकांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना; दुहेरी व्याज सवलतीची संधी



■ प्रतिनिधी | वाशीम ■

मच्छीमार, मत्स्य संवर्धक, मत्स्य उत्पादक तसेच मत्स्य व्यवसायाशी संबंधित विविध घटकांसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजना राबविण्यात येत असून, या योजनेद्वारे मत्स्यव्यवसायासाठी आवश्यक असलेल्या दैनंदिन व कार्यकारी खर्चासाठी सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या योजनेनुसार १२ लाख रुपयांपर्यंतच्या खेळत्या भांडवली कर्जावर राज्य शासनाकडून ४ टक्के व्याज परतावा सवलत दिली जात असून, केंद्र शासनाकडून ३ टक्के व्याज सवलत मिळते. त्यामुळे कर्जाचा प्रभावी व्याजदर अत्यल्प ठरत आहे. विशेष म्हणजे, कर्जाची परतफेड एका वर्षाच्या आत केल्यास लाभार्थ्यांना दुहेरी व्याज सवलतीचा फायदा मिळणार आहे. योजनेअंतर्गत मच्छीमार, मत्स्य शेतकरी, मत्स्य उत्पादक, मत्स्य संवर्धक, मत्स्यबीज उत्पादक, मत्स्य सहकारी संस्था व संबंधित गट पात्र ठरतात. या कर्जाचा उपयोग मत्स्यबीज खरेदी, मत्स्यखाद्य, औषधे, जाळी, एरेटर्स, तलाव व जलाशयांची देखभाल, वाहतूक, मजुरी आदी आवश्यक खर्चासाठी करता येतो.कर्जासाठी बँक व्याजदर ७ टक्के प्रति वर्ष असून, कर्जाची पूर्ण परतफेड एका वर्षाच्या आत करणे आवश्यक आहे. वेळेत परतफेड केल्यासच व्याज सवलतीचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.या योजनेसाठी अर्ज सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वाशिम कार्यालय येथे करावयाचा असून, अधिक माहितीसाठी ०७२५२-२९९३०३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.मत्स्य व्यवसायिकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपला व्यवसाय अधिक सक्षम व नफ्याचा करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. अशी माहिती प्रियंका झोड यांनी दिली.


Appendix -A

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.

No. SGBAU/8/C-677/2026. Date - 18/04/2026.

WANTED

Name of the Society - Shri Babuji Shikshan Yuvak Kalyan Vyayam & Krida Prasarak Mandal, Akola.

(1). Mahatma Jyotiba Phule Arts & Science College, Paras, Dist. Akola.

(2). Mahatma Jyotiba Phule Science College, Sangrampur, Dist. Buldana.

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/ Humanities/ Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Non-Grant Courses/Programmes

| S.N | Name of the Post | Subject/ Course | Category wise No. of Post | | | | | | Total No. of Post |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Open | SC | ST | VJ-A | OBC | SEBC | |
| 01 | Principal | -- | 02 | - | - | - | - | - | 02 |
| 02 | Assistant Professor | English | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 03 | Assistant Professor | Marathi | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 04 | Assistant Professor | Sociology | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 05 | Assistant Professor | Political Sci. | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 06 | Assistant Professor | Mathematics | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 07 | Assistant Professor | Physics | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 08 | Assistant Professor | Chemistry | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 09 | Assistant Professor | Botany | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 10 | Assistant Professor | Zoology | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 11 | Assistant Professor | Computer Sci. | 01 | - | - | - | - | - | 01 |
| 12 | Librarian | -- | -- | 1 | - | - | - | - | 01 |
| 13 | Director of Physical Education | -- | 01 | 1 | - | - | - | - | 02 |

(संस्था/ महाविद्यालयाच्या दि. १८.०४.२०२६ रोजीच्या जाहीरात मागणी पत्रानुसार दर्शविण्यात आलेल्या समांतर व अपंगाचे आरक्षण पदांची संख्या विहित आरक्षणानुसार आवश्यक संख्येइतकी आहे या बाबत महाविद्यालयाने खातर जमा करणे आवश्यक आहे, या अटीवर. समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे आहे- महिला -०४ (खुले - ०३, अजा -०१) व दिव्यांग - ०१ खुले )

दि. २५-०१-२०२४ व दि. २९-०१-२०२४ च्या शासन परिपत्रकान्वये सदर समांतर आरक्षण भरण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारण यांची राहील.

For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College website www https://mahatmafulcollege.org.in

Note : 1) Our college is granted by govt. as permanent non-grantbasis. 2) Apply within 10 days from the date of advertisement published on address principal Mahatma Phule Arts and Science College Paras Tq. Balapur Dist Akola & or mail the application mjpasc240@sgbau.ac.in

PRESIDENT

APPROVED

Asstt. Registrar (Coll.)

Sant Gadge Baba Amravati University

Amravati

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४९ ■ रविवार, २६ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# नोकरीच्या आमिषाने कोट्यवधींची लूट! ठगांचा 'शिवम' गजाआड

## -बहुराज्यीय रॅकेट १.९४ कोटींचा घोटाळा उघड

### -हिंगणघाटमध्ये १२ लाखांनी तरुणांना लुबाडले

**वर्धा जनमाध्यम :** नोकरी, पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, वेअरहाऊस आणि थेट निती आयोग व रेल्वेमध्ये संधी मिळवून देण्याचे आमिष दाखवत बेरोजगारांच्या स्वप्नांवर डल्ला मारणाऱ्या बहुराज्यीय ठगटोळीचा अखेर भंडाफोड झाला आहे. या टोळीचा मुख्य सूत्रधार शिवम संतोषकुमार सेन याला नागपूरच्या बेलतरोडी पोलिसांनी पनवेलमधून सापळा रचून अटक केली असून, या कारवाईमुळे कोट्यवधींच्या फसवणुकीचे धक्कादायक जाळे उघडकीस आले आहे.

या प्रकरणात नागपूर येथील फिर्यादी नामदेव विश्वनाथ कडू व त्यांच्या नातेवाईकांची तब्बल १ कोटी ९४ लाख ७६ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद आहे. विश्वास बसणार नाही अशा पद्धतीने सरकारी नोकऱ्यांचे आणि निविदांचे आमिष दाखवून आरोपींनी ही रक्कम उकळली. याप्रकरणी बेलतरोडी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवम सेन हा या टोळीचा 'मास्टरमाईंड' असून त्याच्या इशाऱ्यावर देशभरातील साथीदार काम करत होते. या टोळीत योगेंद्र मिश्रा (लखनौ), देवेंद्र भार्गव उर्फ 'गुरुजी' (ग्वालियर) आणि रामचंद्र पाटील (मुलताई, छिंदवाडा) यांचा समावेश असून त्यांनी मिळून बेरोजगारांना जाळ्यात ओढले.

**दिल्ली-भोपाळ-मुंबईपर्यंत जाळे; आणखी आरोपी पोलिसांच्या रडारवर**

दरम्यान, हिंगणघाटमध्येही या टोळीचा काळा कारनामा समोर आला आहे. रेल्वेत नोकरी लावून देण्याच्या नागाखाली अभिषेक ब्राम्हणे व मयूर कापटे या दोन तरुणांना तब्बल १२ लाख रुपयांनी गंडा घातल्याची तक्रार नोंद झाली आहे. या प्रकरणात रामचंद्र पाटील याला मुंबईच्या सीएसटी येथून ताब्यात घेण्यात आले होते.




शिवम सेनला ९ एप्रिल रोजी अटक करण्यात आली असून १८ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले. मात्र, त्याच्याविरोधात भोपाळ आणि हिंगणघाट येथेही स्वतंत्र गुन्हे दाखल झाल्याने आता विविध राज्यांतील पोलिस त्याला ताब्यात घेण्यासाठी हालचाली करत आहेत.

या प्रकरणाचा तपास करताना धक्कादायक बाब म्हणजे, या टोळीचे जाळे दिल्ली, बिहार, भोपाळ, मुंबईसारख्या मोठ्या शहरांपर्यंत पसरलेले आहे. दिल्लीतील एका कार्यालयात कार्यरत असलेल्या महिलेचाही यात सहभाग असल्याची माहिती समोर आली असून तिलाही ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तपास अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक हरिहर सोनकुसरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, उर्वरित आरोपींना पकडण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. बिहारमधील दरभंगा येथे लपून बसलेल्या शुभम चौधरीसह इतर आरोपींचा शोध सुरू असून लवकरच आणखी मोठे उघड होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या संपूर्ण घोटाळ्याचा तपास अनेक राज्यांमध्ये पसरलेला असल्याने पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्याकडे अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी करण्यात आली आहे.

बेरोजगारांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फेरत कोट्यवधींची लूट करणाऱ्या या टोळीचा चेहरा उघडा पडला असला, तरी 'नोकरी'च्या नावाने होणाऱ्या फसवणुकीचा धोका किती भयानक आहे, याची जाणीव पुन्हा एकदा या घटनेने करून दिली आहे,

# कोट्यवधींची योजना जमीनदोस्त; पाईपलाईन फोडून पाणीपुरवठा ठप्प

### कंत्राटदाराच्या बेदरकार खोदकामाने थार तहानले...

**आष्टी जनमाध्यम :** तालुक्यातील थार गावात पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः आक्रोश उसळला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत उभारण्यात आलेली कोट्यवधी रुपयांची पाणीपुरवठा योजना कंत्राटदाराच्या मनमानी आणि निष्काळजीपणामुळे उद्ध्वस्त झाली असून गावाचा नळपाणी पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. जसापूर तलावातून थारकडे येणारे जीवनदायी पाणी गावात पोहोचण्याआधीच जमिनीत गाडलेल्या पाईपलाईनची तोडफोड करून थांबवण्यात आले आहे.



आष्टी ते कारंजा (घा.) सिमेंट रस्ता बांधकामाच्या कामादरम्यान कंत्राटदाराच्या टीमने कोणतीही परवानगी न घेता जेसीबीने नाल्यांचे खोदकाम सुरू केले. या बेदरकार खोदकामात जलजीवन मिशनची मुख्य पाईपलाईन अक्षरशः फोडून काढण्यात आली. परिणामी थारसह बोरखेडी गावाचा पाणीपुरवठा ठप्प झाला असून नागरिकांना पुन्हा टंचाईच्या खाईत ढकलण्यात आले आहे.

थार, बोरखेडी, बम्बरडा, चामला ही गावे आधीपासूनच पाणीटंचाईने होरपळणारी. अशा परिस्थितीत २०२२-२३ मध्ये मोठ्या आशेने उभारलेली योजना सुरू होण्याआधीच कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे मोडीत निघाली. हम करे सो या मनमानी भूमिकेतून काम करणाऱ्या कंत्राटदाराने गावकऱ्यांना विश्वासात घेणे तर दूरच, पण प्रशासनाच्या नियमांचाही पायमल्ली केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

बोरखेडी येथेही नव्याने टाकलेली पाईपलाईन अद्याप जोडणीअभावी निष्प्रभ ठरली आहे. जागोजागी फुटलेल्या पाईपमुळे पाणीपुरवठा वारंवार खंडित होत असताना प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

कोट्यवधींचा निधी खर्चून उभारलेली योजना एका बेदरकार कृतीमुळे उद्ध्वस्त झाल्याने नुकसान भरपाई कोण देणार आणि जबाबदारांवर कारवाई कधी असा प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत. थार गावात तणावपूर्ण वातावरण असून संबंधित कंत्राटदारावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

# पांढुरणा जंगलात भीषण आग; दहा हेक्टरवरील गवत लागवड रोपवन जळून खाक

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पांढुरणा येथील जंगलात लागलेल्या भीषण आगीत सुमारे दहा हेक्टर क्षेत्रातील गवत लागवड व कुरण विकासाचे रोपवन जळून खाक झाले. या घटनेमुळे वनविभागाच्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पाचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

आष्टी ते वरुड राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या सहवन क्षेत्र पांढुरणा व नियतक्षेत्र पांढुरणा (कक्ष क्रमांक ३८/१) अंतर्गत संरक्षित क्षेत्र योजनेतून २०२४-२५ या कालावधीत गवत लागवड व कुरण विकासाची कामे करण्यात आली होती. ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करून मोठ्या प्रमाणावर गवताची लागवड करण्यात आली होती. पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता.

मात्र, दोन दिवसांपूर्वी अचानक लागलेल्या आगीने या संपूर्ण क्षेत्राला वेढा घातला आणि काही तासांतच रोपवन जळून खाक झाले. उन्हाळ्याच्या कडाक्याच्या तापमानामुळे आग झपाट्याने पसरल्याचे सांगितले जात आहे.

प्राथमिक अंदाजानुसार, अज्ञात व्यक्तीकडून आग लावण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात असली तरी, याबाबत अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. दरम्यान, आग प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना पुरेशा प्रमाणात करण्यात आल्या होत्या का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आग लागल्यानंतर तातडीने नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध नव्हती, अशीही चर्चा आहे. यामुळे नुकसान अधिक वाढल्याचे सांगितले जाते.



या घटनेची माहिती सुसुंद्रा येथील एका नागरिकाने माध्यमांना दिली. वनविभागाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून, आगीचे नेमके कारण आणि झालेल्या नुकसानीचा अहवाल लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आग प्रतिबंधक उपाययोजना अधिक काटेकोरपणे राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# हिंगणघाटमध्ये गांजासह आरोपी जेरबंद; नागपूर कनेक्शन उघड

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने हिंगणघाट परिसरात मोठी कारवाई करत गांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत २ किलो २२८ ग्रॅम गांजासह मोपेड असा एकूण १ लाख ५५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार अंमली पदार्थ विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत २४ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हिंगणघाट परिसरात गस्त घालत असताना, मिळालेल्या माहितीच्या आधारे जाम ते हिंगणघाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील रिमडोह शिवारात सापळा रचण्यात आला.

यावेळी सुझुकी बर्गमॅन मोपेडवरून जाणाऱ्या अब्दुल रिजवान उर्फ टोनी अब्दुल रज्जाक शेख (वय ३०, रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट) याला अडवून झडती घेतली असता त्याच्याकडे गांजा आढळून आला. आरोपी हा आर्थिक फायद्यासाठी गांजाची विक्री करण्यासाठी वाहतूक करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.



दरम्यान, जप्त केलेल्या गांजाचा पुरवठा नागपूर येथील जावेद शेख (रा. ऑटोमॅटिक चौक, यशोधरा नगर) याच्याकडून होत असल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी व त्यांच्या पथकाने केली.

# राज्यातील शासकीय शाळांची मान्सूनपूर्व तपासणी होणार- डॉ.भोयर

### -शाळा सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाचे कडक निर्देश

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील सर्व शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने मान्सूनपूर्व आणि मान्सूनोत्तर तपासणी अनिवार्य केली आहे. शालेय शिक्षण मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाळ्यात उद्भवणाऱ्या इमारतींची पडझड, छतांची गळती, विजेचे अपघात तसेच अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आरोग्य समस्यांचा विचार करून यंदा अधिक कडक आणि सविस्तर निर्देश जारी करण्यात आले आहेत. समग्र शिक्षण अभियानांतर्गत या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले असून सर्व शाळांना त्याचे पालन बंधनकारक राहणार आहे.



या निर्देशांनुसार पावसाळ्यापूर्वी शाळांच्या इमारतींची सखोल तपासणी करून भेगा, सैल प्लास्टर, गळती होणारी छते आणि कमकुवत रचना यांची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वर्गखोल्यांमध्ये पाणी शिरणार नाही याची खात्री करून खिडक्या, दरवाजे व निचरा व्यवस्थेची पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याचबरोबर स्वयंपाकगृहांची स्वच्छता, गॅस जोडणीची सुरक्षितता आणि स्वच्छतागृहांची नियमित देखभाल यावरही विशेष भर देण्यात आला आहे.

पावसाळ्यात वाढणाऱ्या विजेच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर शाळांमधील विद्युत यंत्रणेची तपासणी करून उघडी वायरिंग व खराब उपकरणे तात्काळ दुरुस्त करण्याचे निर्देश आहेत. तसेच शाळा परिसरातील धोकादायक झाडे व साचलेले पाणी यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे. मुसळधार पावसाच्या काळात जीर्ण इमारतींचा वापर टाळून आवश्यक असल्यास पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत. यासोबतच डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य तपासणी मोहीम राबविणे आणि शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी पूरक अध्यापन आयोजित करणे आवश्यक ठरणार आहे. प्रत्येक शाळेने तपासणीचा सविस्तर अहवाल सादर करणे बंधनकारक असून निर्देशांचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही शासनाने दिला आहे.

# कत्तलीसाठी नेत होते गोवंश; आर्वी पोलिसांनी वेळेत उधळला डाव

**आर्वी जनमाध्यम :** परिसरात गोवंश जनावरांची अमानुष व बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या टोळीवर पोलिसांनी धडक कारवाई करत मोठा प्रकार उघडकीस आणला. वर्धा–आर्वी मार्गावरील सावळापूर घाटाजवळ नाकेबंदीदरम्यान मालवाहू टाटा पिकअपमधून तब्बल सहा गोवंश जनावरे अत्यंत क्रूर अवस्थेत कोंबून नेली जात असल्याचे समोर आले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, जनावरांची सुटका करण्यात आली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास सापळा रचला. दरम्यान, भरधाव वेगाने येणारे संशयास्पद वाहन अडवून तपासणी केली असता, वाहनाच्या मागील भागात कोणतीही चारा-पाण्याची व्यवस्था नसताना जनावरे निर्दयीपणे बांधून कोंबलेली आढळली. या जनावरांना कत्तलीसाठी नेले जात असल्याची कबुली आरोपींनी दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या कारवाईत शेख फारुख शेख हारुण (३२) व मोहम्मद अबुझर अब्दुल मजीत (२३), दोघेही रा. वाल्मीक वार्ड, आर्वी, यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी सुमारे ६.५३ लाख रुपये किमतीचे मालमत्ता जप्त केली असून त्यात टाटा पिकअप वाहन आणि सहा गोवंश जनावरे समाविष्ट आहेत.

# पुलगावात बनावट डिटर्जंटचा साठा जप्त; लाखोंचा माल पोलिसांच्या हाती

**पुलगाव जनमाध्यम :** पुलगाव पोलिसांनी मोठी कारवाई करत नामांकित कंपनीच्या नावाने बनावट डिटर्जंट व साबणांची विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. रसुलाबाद परिसरात उभी असलेल्या संशयित टाटा एस वाहनातून तब्बल ४.३२ लाख रुपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी मुख्य आरोपी अमन खान अब्दुल्ला खान पठाण याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २२ एप्रिल रोजी रसुलाबाद येथील हाफीज काझी यांच्या घराजवळ संशयास्पद अवस्थेत उभी असलेली टाटा एस (MH ०३ AH ५६६४) पोलिसांच्या निदर्शनास आली. वाहनात मोठ्या प्रमाणात बनावट माल असल्याचा संशय आल्याने संबंधित कंपनीशी संपर्क साधण्यात आला. त्यानुसार कंपनीचे ऑपरेशन मॅनेजर प्रविण कुमार नायर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुलगाव येथे येऊन मालाची तपासणी केली.

तपासणीत प्रसिद्ध ब्रँडच्या नावाने बनावट तयार केलेले हजारो पॅकेट्स आढळून आले. यामध्ये व्हील डिटर्जंटचे ५८८० छोटे पॅकेट्स, १५३० मोठे पॅकेट्स, सर्फ एक्सेलचे ४६०८ पॅकेट्स तसेच रिन साबणाचे ६४६८ नग असा मोठा साठा होता. या सर्व मालाची किंमत लाखोंमध्ये असून, विक्रीसाठी आसपासच्या ग्रामीण भागात पुरवठा केला जात असल्याचे उघड झाले.

# अंनिस आणि वर्धेकर सामाजिक संघटनांचा बुवाबाजीविरूद्ध जागर

### उद्या श्याम मानव यांचे खरात प्रकरणानिमित्त व्याख्यान

**वर्धा जनमाध्यम** - अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्हा व तालुका शाखा आणि वर्धेकर सामाजिक संघटनांद्वारे सोमवार, दि. २७ रोजी अंनिसचे राष्ट्रीय संघटक प्रा. श्याम मानव यांचे 'बुवा तेथे बाया' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सध्या चर्चेत असलेल्या ज्योतिषी खरातच्या निमित्ताने अंनिसद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात बुवाबाजीविरूद्ध अभियान सुरू करण्यात आले आहे.



स्थानिक लोक महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६.३० वाजता आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अमर काळे यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. चेतना सवाई राहणार असून नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगूळ, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांची प्रमुख उपस्थिती राहील. आजही विज्ञानयुगात बुवाबाबांच्या शोषणाला मोठ्या प्रमाणात स्त्रिया बळी पडत असून समाजजागृतीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**वर्धा जनमाध्यम :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. सदरील हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे यादृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत:




कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर - क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे- क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे स्वतंत्र केंद्र यांचा समावेश आहे. राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून संचालनालयाचे संचालक सुजितकुमार उगले कार्य पाहणार आहेत. तर मराठी भाषा विकास संस्था तथा अभिजात मराठी भाषा कक्षाच्या उपसंचालक अंजली ढमाळ या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

सदर सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत 'Gyan Bharatam' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच NCC, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ट्रम्प चक्रव्यूहात

इराणबरोबरच्या संघर्षात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बेमुदत युद्धविरामाची घोषणा केली. चर्चा आणि वाटाघाटीतून या संघर्षात मार्ग निघेपर्यंत,अंतिम तोडगा होईपर्यंत हा युद्धविराम असेल.अमेरिकेने हल्ले थांबवले आणि शस्त्रे म्यान केली,हा एक भाग झाला.तथापि, ट्रम्प यांनी यात एक मेख मारली आहे.ती म्हणजे, होर्मुझ सामुद्रधुनीतील नौदल नाकेबंदी चालूच ठेवण्याची. म्हणजे युद्धविरामाची घोषणा करताना ट्रम्प यांनी दुटप्पी भूमिका कायम ठेवली. ती त्यांच्या आजवरच्या स्वभावाला धरूनच आहे.नाकेबंदीमुळे इराणवर टांगती तलवार कायम आहे.नेमका त्यालाच इराणणे आक्षेप घेत वाटाघाटीत सक्रिय सहभाग घ्यायला असमर्थता दर्शवली. म्हणजे पुन्हा आहे तिथेच आहे. त्यामुळे उजाडले, तथापि, सूर्य कुठे आहे, प्रत्यक्षात युद्धबंदी कुठे झाली आहे, युद्ध थांबले कुठे आहे, अशीच विद्यमान परिस्थिती आहे. ट्रम्प यांची आडमुठी भूमिकाच त्याला कारणीभूत आहे.इराणने युरेनियम संवर्धन बंद करावे, युरेनियमचा साठा हस्तांतरित करावा, अण्वस्त्र सुविधा संपुष्टात आणाव्यात, ही इराणवरील हल्ल्यामागची अमेरिकेची भूमिका आणि त्यासाठी इस्त्रायलने त्यांना चिथावणी दिली. व्हेनेझुएलाप्रमाणे इराण सहज कब्जात घेऊ अशा घमेंडीत ट्रम्प यांनी इराणवरील हल्ल्याचे अतिरेकी आणि आततायी पाऊल उचलले; पण दोन महिने होत आले, तरी इराण नमलेला नाही. इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांची अमेरिकेने हत्या घडवून आणली. त्यानंतरही अनेक प्रमुख नेते, अधिकाऱ्यांच्या हत्या करण्यात आल्या. त्यातून इराणमध्ये अशांतता घडेल आणि आपला हेतू साध्य होईल, ही ट्रम्प यांची अपेक्षा होती. इराणमधील घडामोडींवर लक्ष ठेवून असलेले युवराज पहलवी गुडघ्याला बाशिंग बांधून तयारच होते. तथापि, त्यांचा होरा चुकला आणि इराणमध्ये सत्तांतर झाले नाही. उलट राष्ट्रप्रमुखांच्या आणि प्रमुख नेत्यांच्या हत्येने इराणमध्ये अमेरिकेविरोधात संतापाची लाट उसळली. प्रत्युत्तर द्यायचा इराणने निर्धार केला आणि संघर्षाला तोंड फुटल्यापासून त्यात कसूर ठेवलेली नाही.जगातील सर्वात मोठे लष्कर, नौदल, हवाई दल आणि प्रचंड शस्त्रसामग्री असणाऱ्या अमेरिकेला इराणचे हे प्रत्युत्तर चांगलेच महागात पडलेले आहे. ट्रम्प यांनी अनेक गर्जना केल्या; पण दरवेळी एकदा आक्रमक घोषणा करायची आणि लगेचच नरमाईचे धोरण जाहीर करायचे, अशा धरसोड वृत्तीशिवाय त्यांच्याकडून काहीही साध्य झालेले नाही. अमेरिकेच्या जाळ्यात इराण न सापडता अमेरिकाच या चक्रव्यूहात गुंतल्याचे चित्र दिसत आहे. अमेरिकेला शह देण्यासाठी इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आणि त्याचा परिणाम कच्च्या तेलाच्या दरावर आणि अपरिहार्यपणे जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला. इराणी राज्यकर्त्यांनी या सामुद्रधुनीचा शस्त्र म्हणून अचूक वापर केला. अमेरिकेने इराणला शह द्यायचा म्हणून सामुद्रधुनीत नौदल नाकेबंदी केली. त्यामुळे परिस्थिती चिघळली, तरी त्यातून अमेरिकेला अपेक्षित परिणाम साधता आलेला नाही.उलट पाकिस्तानच्या खांद्यावर बंदूक ठेवून अमेरिकेला वाटाघाटीचा घाट घालावा लागला आहे. त्यात डोनाल्ड ट्रम्प यांचा स्वभाव अहंकारी. निर्णयात धरसोड वृत्ती. इराण प्रकरणात युरोपियन राष्ट्रांनीही त्यांना साथ दिली नाही. ट्रम्प यांची भाषा उद्दाम. ती कोणी सहन करणार नाही. आपण हुकूम केला की, युरोपियन देश आपल्या मागे येतात, हा ट्रम्प यांचा विश्वास. तथापि, ट्रम्प यांनी आततायीपणा करावा आणि त्याला आपण 'मम' म्हणावे, अशी युरोपियन राष्ट्रांची मानसिकता आता राहिलेली नाही. हे शेखचिल्लीप्रमाणे स्वप्ने पाहणाऱ्या ट्रम्प यांच्या ध्यानी आले नाही. त्यामुळे त्यांना मनगट चावीत बसण्यापलीकडे काही करता आले. त्यांनी डोळे वटारूनही काही फायदा झाला नाही. युरोपियन देशांनी ट्रम्प यांना वाऱ्यावर सोडले. स्पेनसारख्या छोट्या राष्ट्रानेही ट्रम्प यांना मूँहतोड जवाब दिला. यातून ट्रम्प यांच्याविषयी जगामध्ये काय भावना आहेत, हेच स्पष्ट झाले.या साऱ्या धामधुमीत रशिया आणि चीन या बलाढ्य देशांची इराणला सहानुभूती असल्याचे स्पष्ट झाले असले, तरी अमेरिकेच्या कारवायांना उत्तर द्यावे, अशी त्यांची तयारी दिसत नाही. या प्रयत्नात अमेरिकेचे हसे होत आहे आणि त्यांचा युद्ध खर्च वाढत आहे. त्यामुळे चीन, रशिया यांना आनंदाच्या उकाळ्या फुटत असतील, तर त्यात आश्चर्य नाही. इराणमध्ये चीनचे हितसंबंध आहेत आणि परिस्थितीने गंभीर वळण घेतले, तर चीन शांत बसेल असे नाही. चीनने हस्तक्षेप केला, तर या संघर्षाला नवा आयाम प्राप्त होईल. तसेच मध्यपूर्वेवर सध्या जे अमेरिकेचे अनिर्बंध वर्चस्व आहे, त्यालाही धक्का बसेल. रशियाचे अरब राष्ट्रात हितसंबंध आहेत. नव्या गंभीर घटना घडल्या, तर रशियाही स्वार्थ साधण्यासाठी हालचाली करू शकतो. तसे झाले, तर या भागातील प्रादेशिक तोल बिघडून जाईल आणि त्याचा दीर्घकाळ परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने या भावी घटनांची किती दखल घेतली आहे, याची कल्पना नाही; पण ट्रम्प यांच्या नेतृत्वाने एकूणच अमेरिकेला अडचणीत आणले आहे. त्यांचा हा चौखूर वारू कोणी रोखेल असे दिसत नाही. त्याची फळे अमेरिकेला भोगावी लागतीलच; पण सुदैवाने साऱ्या जगालाच त्याचे कमी-अधिक परिणाम भोगावे लागतील. या संघर्षाने जगभर महागाईचा वणवा उद्भवला आहे. शेअर बाजारावर जबरदस्त परिणाम झाला आहे. या संघर्षाची झळ सर्वसामान्य कुटुंबापर्यंत पोहोचली आहे. छोट्या व्यावसायिकांना चटके सोसावे लागत आहेत. या साऱ्याला ट्रम्प यांचे आक्रस्ताळे, आगाऊ नेतृत्वच जबाबदार आहे. इतिहासात अनेक लहरी, क्रूरकर्मा राज्यकर्ते होऊन गेले; पण ट्रम्प यांनी आपल्या बेमुर्वत, हट्टाग्रहापोटी साऱ्या जगालाच वेठीस धरले. आताही बेमुदत युद्धविरामाची घोषणा करताना सामुद्रधुनीतील नौदल नाकेबंदी चालूच ठेवण्याचा ट्रम्प यांच्या दुटप्पी भूमिकेने तोडगा दृष्टिपथात येणारच नाही. ट्रम्प आणि अमेरिकेला ते कळत नसेल, असे नाही; पण आपले ते खरे करण्याच्या नादात ट्रम्प यांनी लक्ष्मणरेषा ओलांडली आहे, हेच भावी इतिहासात नोंदले जाईल.

# इराण समोर ट्रम्प यांची शरणागती !

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविराम अनिश्चित काळासाठी वाढवण्याची घोषणा करून एक प्रकारे या प्रकरणी माघार घेतली आहे.यावरुन अमेरिकेच्या मर्यादा जगासमोर उघड्या पडल्या आहेत.इराण विरुद्धच्या युद्धामुळे ट्रम्प यांना जे काही साध्य करायचे होते,त्यापैकी काहीच साध्य झालेले नाही.युध्द करुन इराण मधील जुलुमी राजवट ट्रम्प बदलू शकलेले नाहीत.महत्वाचे म्हणजे अमेरिकेने ज्या अटी इराणसमोर ठेवल्या होत्या त्या अटी इराणने मान्य केलेल्या नाहीत.हे युद्ध इराणवर लादून अमेरिकेने काय साध्य केले,असा प्रश्न संपूर्ण जगाला पडला आहे.इराणच्या ताकदी बद्दलचे ट्रम्प यांचे सर्व अंदाज चुकले आहेत.



व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकन सैनिकांनी ज्या सहजतेने पकडले आणि अमेरिकेला नेऊन जेलमध्ये टाकले.त्या प्रकरणामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आत्मविश्वास वाढला असावा. त्यांना असे वाटले असावे की, इराणलाही आपण सहजपणे नमवू.इराण विरूद्धच्या युध्दात पहिल्या दिवशी अमेरिका आणि इस्त्रायल यांना मिळालेले मोठे यश पाहून ट्रम्प यांचा आत्मविश्वास दुणावला असावा.परंतु इराणने कणखरपणा दाखवून ट्रम्प यांचे इरादे धुळीस मिळवले. अमेरिका-इराण युद्धाचा मोठा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला.इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर एखाद्या हत्याराप्रमाणे करून अमेरिकेला जवळजवळ शरण आणले आहे. भविष्यात इराण हे हत्यार वारंवार वापरण्याची शक्यता आहे.इराणची ही रणनिती होर्मुझ सामुद्रधुनी पुरती मर्यादित रहाणार नसून त्याची व्याप्ती बाब 'अल मंदेब' (तांबडा समुद्र) सामुद्रधुनी पर्यंत पसरणार आहे. 'अल मंदेब' सामुद्रधुनीतून उर्जा आणि केमिकल्स वाहून नेणारी जहाजे मार्गक्रमण करत असतात.येमेनमधील इराण समर्थक हौथी बंडखोर या सामुद्रधुनीतून मार्गक्रमण करणाऱ्या जहाजांवर हल्ले करतात.त्यामुळे असुरक्षित असणाऱ्या या सामुद्रधुनीचा वापरही इराणकडून हत्यार म्हणून केला जाऊ शकतो.होर्मुझची सामुद्रधुनी आणि 'अल मंदेब'ची सामुद्रधुनी यांचा वापर करून इराण जागतिक अर्थव्यवस्थेला वेठीस धरू शकतो.याचा परिणाम अर्थातच आखाती देशांवर होणार आहे.कारण होर्मुझ सामुद्रधुनीच्या हत्याराचा वापर आता इराण आखाती देशांविरुध्द करु शकेल.त्यांना धमक्या देऊ शकेल.

अमेरिका-इराण युद्धाच्या दरम्यान इराणने आखाती देशांतील अमेरिकेच्या लष्करी तळांवर ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने प्रखर हल्ले केले होते.तेंव्हा अमेरिका आखाती देशांना व्यवस्थितपणे सुरक्षा पुरवू न शकल्याने अमेरिकेवर आता त्यांचा भरवसा राहिलेला नाही.आपल्या सुरक्षेसाठी आखाती देश आता नवीन भागिदारांच्या शोधात आहेत.अमेरिका- इराण युद्धात इराणची मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि लष्करी हानी झाली आहे.त्याचे प्रदिर्घ परिणाम इराणला भोगावे लागतील.मात्र त्यातून इराणचा एक फायदाही झाला आहे.तो म्हणजे आता इराणने संरक्षणात्मक पवित्रा सोडून आक्रमक पवित्रा धारण केला आहे आणि हा पवित्रा इराणला आखाती देशांतील एक मेजर पॉवर बनवू शकतो.

अमेरिका आणि इस्त्रायलने इराण विरूद्ध युद्ध छेडल्यानंतर पहिल्याच दिवशी इराणचे सुप्रीम लिडर अयातुल्ला अली खामेनी त्यात मारले गेले.त्या शिवाय इराणचे काही ज्येष्ठ लष्करी अधिकारी आणि अणूशास्त्रज्ञ या युद्धात मारले गेले.त्यामुळे संरक्षक पवित्रा घेऊन काही साध्य होणार नाही तर आक्रमक पवित्रा घ्यायला हवा हा धडा इराणला मिळाला असावा आणि होर्मुझची सामुद्रधुनी सारखा हुकूमी एक्का इराणला गवसल्याने इराण आणखी आक्रमक झाला आहे.इराणचे सध्याचे सुप्रीम लिडर मुज्तबा खामेनी यांच्या तब्येतीबाबत निरनिराळे दावे केले जात आहेत.अमेरिका-इस्त्रायल यांनी इराणवर पहिल्या दिवशी केलेल्या हल्ल्यात मुज्तबा खामेनी हे जबरदस्त जखमी झाल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या चेहऱ्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाल्याचा दावा केला जात आहे.अशा परिस्थितीत इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डसनी (इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्डस कॉर्प्स) संपूर्ण प्रशासनावर ताबा मिळवला असून महत्वाचे निर्णय त्यांच्याकडून घेतले जात असल्याची चर्चा आहे.

> 'इंटरनॅशनल मॉनेटरी फंड'च्या अंदाजानुसार इराणमधील महागाईचा दर हा ७० टक्क्यांच्यावर जाऊ शकतो.युद्ध संपल्यानंतर उद्भवणाऱ्या महागाईच्या विरोधात इराणमधील जनता पुन्हा एकदा रस्त्यावर उतरु शकते.

अमेरिका-इराण युध्दाअगोदर इराण मधील क्रांतिकारी राजवटी विरोधात, तेथील जनतेने जो असंतोष व्यक्त केला होता तो असंतोष आता कमी झाल्याची चिन्हे दिसत आहेत.अमेरिकेने इराण विरुद्ध छेडलेल्या युद्धात इराण मधील नागरी पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाल्या आहेत.शेकडो इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत.त्यामुळे इराणमधील जनता ट्रम्प यांच्यावर अतिशय नाराज असून देशावरील संकटाच्या वेळी ती (जनता) सध्याच्या राजवटी मागे उभी असल्याचे चित्र निर्माण झाले आहे आणि हे सर्व ट्रम्प यांच्या चुकीच्या धोरणांमुळे घडून आले आहे.ट्रम्प यांचा असा अंदाज होता की, युद्ध सुरू झाल्यानंतर इराण मधील जनता सध्याच्या क्रांतिकारी राजवटी विरोधात उभी राहिल.मात्र तसे काही झाले नाही.उलट ट्रम्प यांच्या विरोधातील इराणी जनतेचा असंतोष दिवसेंदिवस वाढत आहे.

अमेरीकेने इराणमध्ये इतका विध्वंस घडवून आणला आहे की,इराणच्या पुनर्निर्माणासाठी दोनशे बिलियन डॉलर्स इतका प्रचंड निधी लागण्याची शक्यता आहे.इंटरनॅशनल मॉनेटरी फंडच्या अंदाजानुसार इराणमधील महागाईचा दर हा ७० टक्क्यांच्यावर जाऊ शकतो.युद्ध संपल्यानंतर उद्भवणाऱ्या महागाईच्या विरोधात इराणमधील जनता पुन्हा एकदा रस्त्यावर उतरु शकते. जानेवारी २०२६ मध्ये प्रचंड महागाईच्या विरोधात इराणमधील जनता रस्त्यावर उतरली होती.ते जन आंदोलन चिरडण्यासाठी रिव्हॉल्युशनरी गार्डसनी पाशवी बळाचा वापर केला होता.तेंव्हा ट्रम्प यांनी अमेरिका लवकरच तुमच्या मदतीला येत असल्याचा दिलासा इराणमधील आंदोलकांना दिला होता.इराण विरूद्धचे युद्ध आपण एक -दोन आठवड्यात संपवू हा ट्रम्प यांनी बाळगलेला फाजील आत्मविश्वास त्यांना फार महागात पडला आहे.होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर, इराण एखाद्या हत्याराप्रमाणे करेल या गोष्टीचा त्यांना अंदाज लावता आला नाही.इराणच्या बाबतीतील हाराकिरीमुळे अमेरिकेच्या जागतिक पातळीवरील वर्चस्वाला कुठे तरी ठेच लागली आहे.या उलट इराणची प्रतिमा उजळून निघाली आहे.१९५६ साली इजिप्तचे तत्कालीन अध्यक्ष नासेर यांनी सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतल्यानंतर इस्त्रायल, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी इजिप्तवर आक्रमण केले होते.नासेर यांनी सुवेझ कालव्याचा उपयोग एखाद्या हत्याराप्रमाणे केला होता.नंतर अमेरिका आणि रशियाच्या दबावामुळे इस्त्रायल, ब्रिटन आणि फ्रान्स यांना युद्ध गुंडाळावे लागले होते.त्यानंतर ब्रिटनची सुपर पॉवर ही प्रतिमा संपुष्टात आली होती आणि इजिप्तचे तत्कालीन अध्यक्ष नासेर यांची प्रतिमा उजळून निघाली होती. अमेरिकेचा प्रवासही त्या दिशेने चालू आहे का,या प्रश्नाचे उत्तर नजिकच्या भविष्यकाळात नक्कीच मिळेल.

**अभय गोखले**

# अलौकिक गणिती:श्रीनिवास रामानुजन !

रामानुजन हे लहानपणापासूनच गणिती कूट प्रश्नांची उकल करण्यात पारंगत होते. खरे तर गणित त्यांच्या रक्तातच भिनलेले होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. साहजिकच त्याची प्रचिती त्यांनी शुद्ध गणितात केलेल्या मूलभूत संशोधनामुळे पुढे आली. तथापि, नोकरीसाठी केलेल्या पायपीटीमुळे पुढे जीवनाला अमुलाग्र कलाटणी देणाऱ्या काही मातब्बर व्यक्तींशी त्यांचा योगायोगाने परिचय झालात्यांच्या सुदैवाने या मंडळींना गणिताची उत्तम जाण होती. तथापि, रामानुजन यांनी मांडलेली प्रमेये आणि सूत्रे या मंडळींच्या डोक्यावरून जाऊ लागल्याने रामानुजन हे कुशाग्र बुद्धिमत्तेचे सर्जनशील संशोधक असून त्यांची बुद्धी मार्गदर्शका अभावी मद्रासच्या हवेत खुरटून न जाता तिला धुमारे फुटून अव्वल दर्जाच्या गणितज्ञामध्ये त्यांचे परिवर्तन होण्यासाठी ते गणिताच्या तीर्थक्षेत्री म्हणजे केंब्रिजच्या ख्यातनाम गणितज्ञांच्या संपर्कात आले पाहिजेत, या निष्कर्षाप्रत ही मंडळी येऊन ठेपली. याच सुमारास अविभाज्य संख्या संबंधीची आपली काही प्रमेए घेऊन रामानुजन प्रा. शेषू अय्यर यांच्याकडे गेले असता त्यांनी प्रा. हार्डी यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला एक शोधनिबंध दाखविला. या निबंधात निर्देश केलेला पण प्रा. हार्डीनाही अजून जो निष्कर्ष मिळाला नव्हता तो आपण यापूर्वीच काढल्याचे रामानुजनने सांगितले. तेव्हा प्रा. शेषू यांनी रामानुजननी प्रा. हार्डीना पत्र पाठवून आपल्या निष्कर्ष सोबत इतर काही प्रमेये आणि सूत्रे देखील पाठवावी असे सुचवले.



**प्रासंगिक**

तथापि गणितात तेज बुद्धी असलेल्या रामानुजन यांचे इंग्रजी यथातथाच असल्याने त्यांना महाविद्यालयीन शिक्षणावर पाणी सोडावे लागले होते. त्यांनी पोर्ट ट्रस्ट मधील आपले वरिष्ठ नारायण अय्यर यांच्या मदतीने प्रा. हार्डीना पाठवायच्या पहिल्या पत्राचा मसुदा तयार करून घेतला आणि ते पत्र १९१३ च्या मकर संक्रातीला रवाना केले. हे पत्र जेव्हा प्रा. हार्डीना मिळाले तेव्हा त्यात मळक्या कागदावर इंग्रजीत लिहिलेल्या ओळी मागून ओळी असलेले पत्र व त्यासोबत गणिती चिन्हांनी नटलेली सूत्रे व निष्कर्ष एवढा ऐवज मिळाला. रामानुजन यांनी पत्रासोबत पाठवलेल्या प्रमेय व सूत्रांवरून त्यांचा संशोधकीय वकूब जाणून त्यांना जर केंब्रिजच्या गणितज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर ते जगप्रसिद्ध गणिती होऊ शकतील या विश्वासाने केंब्रिज विद्यापीठातील प्रा. हार्डी यांनी त्यांना इंग्लंडला बोलावले. प्रा. हार्डी यांनी रामानुजन यांना इंग्लंडला घेऊन येण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आणि १३ मे १९१४ रोजी रामानुजन केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजात दाखल झाले. तेथे ते १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत सुमारे पाच वर्षे राहिले. या काळात त्यांचा संशोधनाचा वेग वाढला. सुमारे वीस शोधनिबंध प्रसिद्ध झाले. इतकेच नाही तर त्यांच्या संशोधकीय कामावर केंब्रिज विद्यापीठाने त्यांना बी.ए.ची पदवी प्रदान केली आणि रॉयल सोसायटीने १९१८ साली त्यांना एफ.आर.एस. या दुर्मिळ पदवीने सन्मानित केले. तथापि इंग्लंड चे थंड हवामान तसेच आपल्या हाताने शाकाहारी जेवण बनवने आणि तेही वेळच्यावेळी खाण्याची आबाळ करणे याचा विपरीत परिणाम होऊन त्यांना क्षय रोगाची बाधा झाली. वर्ष-दीड वर्ष त्यात गेले. प्रकृतीमध्ये काहीशी सुधारणा झाल्यावर त्यांना अल्पकाळ हिंदुस्थानात पाठवल्यास तेथील हवा, नातलग, मित्रांचा सहवास आणि मुख्य म्हणजे घरचे अन्न यामुळे ते आणखी सुधारतील या हेतूने प्रा. हार्डी यांनी १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यात त्यांना मायदेशी पाठवले. तथापि, भारततही खूप उपचारानंतर ही त्यांच्या प्रकृतीत काही सुधारणा झाली नाही आणि २६ एप्रिल १९२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण गणितातील मूलभूत तसेच उपयोजित संशोधन यासाठी त्यांचा आदर्श सतत डोळ्यासमोर ठेऊन भारताची गणितातील गौरवशाली परंपरा वाढवूया !

**प्रा. विजय कोष्टी**

## स्कायमेटचा मान्सूनबाबतचा अंदाज

नुकतेच स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने चालू वर्षात मान्सूनबाबत व्यक्त केलेला अंदाज भारतीय कृषी क्षेत्रासाठी धोक्याचा व आगामी संकटाची चाहूल देणारा इशारा आहे. दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९४ टक्के पावसाची शक्यता आणि खरीप पट्ट्यात पावसाची तूट या दोन बाबी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरू शकतात. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यासाठी हा अंदाज अधिक चिंताजनक आहे. भारतातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. सरासरी ८६८.६ मिलीमीटर पावसाच्या तुलनेत यंदा केवळ ८१६ मित्र पावसाचा अंदाज हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. हा फरक वरकरणी लहान गटात असला तरी त्याचे परिणाम मोठे असतात. कारण पावसाचे केवळ प्रमाण नव्हे तर त्याचे वितरणही तितकेच महत्वाचे असते. स्कायमेटने व्यक्त केल्याप्रमाणे पावसाचे असमान वितरण आणि उत्तराधार्थ एल-निनोचा प्रभाव वाढण्याची शक्यता, ही खरी चिंता वाढवणारी बाब आहे.

महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान यासारख्या खरीप पट्ट्यातील राज्यांत सुमारे सहा टक्के पावसाची तूट राहण्याचा अंदाज आहे. सोलापूर, धाराशिव, लातूर यासारख्या आधीच दुष्काळाच्या छायेत असलेल्या भागांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. केवळ अंदाजावर निराश होणे योग्य नाही. पण गाफिल राहणेही परवडणारे नाही.पावसाळ्यात पडणारे थेंब-थेंब पाणी साठवून ते जमिनीत मुरविले पाहिजे. पाणी अडवा पाणी साठवा ही कृती प्रत्यक्षात उतरविली पाहिजे. जलसंवर्धन, पाणी पुनर्भरण, शेततळी, बंधारे, ठिबकसिंचन यासारख्या उपाययोजनांना वेग देणे आवश्यक आहे. शासन, प्रशासन आणि लोकसहभागातून जलसंवर्धनाची मोहीम व्यापक स्वरुपात राबविली पाहिजे. भारतीय हवामान विभागाचा मान्सूनबाबतचा अंदाज आल्यानंतर अधिक सतर्कतेने योजण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

**संवाद**

## तेलंगणा सरकारचा ऐतिहासिक निर्णय

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवन्थ रेड्डी यांनी एक ऐतिहासिक व लोकोपयोगी निर्णयाची मंत्रिमंडळात मंजुरी दिली आहे.गेली सुमारे दहा वर्षे तेथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन इत्यादी सुविधा मिळालेल्या नाहीत . ही रक्कम सरकारकडे पडून आहे . अनेक जेष्ठ नागरिक व सेवानिवृत्त कर्मचारी अनेक हेलपाटे मंत्रालयात व विविध सरकारी कार्यालयात मारत होते येत्या शंभर दिवसात ही रक्कम त्यांना दिली जाणार आहे . राज्यातील सर्व मंत्री , राज्यमंत्री, आमदार यांच्या पगारातून कपात करून ही रक्कम दिली जाणार आहे ही बातमी नुकतीच वाचली अनेक मंत्री व आमदार कोट्याधिश आहेत त्यामुळे काही दिवस ५० टक्के पगार कापल्यामुळे त्यांचे फारसे नुकसान होणार नाही . या निर्णयामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी सरकारला धन्यवाद दिले आहेत तेलंगणा सरकारचा हा निर्णय योग्य असून त्याचे स्वागत होत आहे.

**शांताराम वाघ**

## लोकशाहीचा स्तंभ की बाजार?

लोकशाहीमध्ये वृत्त वाहिन्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. दृश्य माध्यमांचा प्रभाव थेट आणि मोठा असतो. कारण डोळ्यांनी जे दिसते त्यावर प्रेक्षकांचा चटकन विश्वास बसतो.मात्र,अलीकडच्या काळात मराठी वृत्त वाहिन्यांचा दर्जा टीआरपीच्या शर्यतीत खालावत चालला असून, पत्रकारितेच्या मूळ मूल्यांना तडा जात असल्याचे चित्र दिसत आहे.आज अनेकदा अत्यंत स्थानिक किंवा क्षुल्लक बातम्यांना 'राष्ट्रीय संकट' असल्याप्रमाणे सादर केले जाते. एखाद्या राजकीय नेत्याच्या किंवा धार्मिक आचार्य, स्वामी ज्यांना संत यांच्या विधानाचा योग्य अर्थ लावण्याऐवजी त्याचा 'अनर्थ' लावून समाजात खळबळ कशी उडवून देता येईल.याकडेच अधिक लक्ष दिले जाते. केवळ टीआरपी मिळवण्यासाठी बातम्यांचे स्वरूप इतके फुगवून सांगितले जाते की, त्यातून सामाजिक वैमनस्य निर्माण होण्याची भीती निर्माण होते.लोकशाहीत ज्या प्रश्नांवर सखोल चर्चा होणे अपेक्षित आहे. याला 'चर्चा' म्हणण्यापेक्षा 'आग लावण्याचे प्रकार' म्हणणे अधिक संयुक्तिक ठरते.जेव्हा महत्त्वाच्या लोकहितार्थ मुद्द्यांना बाजूला सारून केवळ वादावादीला महत्त्व दिले जाते. तेव्हा खऱ्या प्रश्नांना जागा उरत नाही. वृत्त वाहिन्यांनी जनतेला दिशा दाखवणे अपेक्षित असताना आज त्या केवळ राजकीय अजेंडा किंवा व्यावसायिक फायद्यासाठी काम करताना दिसत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांचे प्रश्न अनुत्तरित राहतात आणि लोकशाहीचा हा चौथा स्तंभ कमकुवत होऊ लागतो.वृत्त वाहिन्यांनी आपल्या अफाट ताकदीचा वापर विधायक कामासाठी करणे गरजेचे आहे. समाजात द्वेष किंवा खळबळ निर्माण करण्यापेक्षा लोकहिताच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारणे आणि सकारात्मक बदल घडवून आणणे हे त्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे.

**अविनाश देशपांडे**

# पार्डी, शिवारात दगडाने ठेचून इसमाचा खून; पुसद शहर हादरले

## तालुका परिसरात सहा महिन्यात अनेक क्राईम वाढले जवाबदार कोण?

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद : सेवादास नगर शेत शिवारात एका ५० वर्षीय अनोळखी इसमाचा दगडाने ठेचून खून झाल्याची धक्कादायक घटना आज सकाळी उघडकीस आली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. संबंधित इसमाचा मृतदेह रक्तबंबाळ व कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

मिळालेल्या माहितीनुसार,आज सकाळच्या सुमारास स्थानिकांना शिवारात दुर्गंधी येत असल्याने त्यांनी पाहणी केली असता एक मृतदेह आढळून आला. मृतदेहाची अवस्था अत्यंत विचित्र व कुजलेली असल्याने हा खून काही दिवसांपूर्वी झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच वसंत नगर पोलीस स्टेशनचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसर बंदोबस्तात घेत पंचनामा सुरू केला. तसेच घटनास्थळी मोबाईल व्हॅनही तैनात करण्यात आली होती. या घटनेमुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नसून, पोलिसांकडून नागरिकांना ओळख पटविण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. पुसद उपविभागातील सर्व पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके व गोपनीय यंत्रणा कामाला लागल्या आहेत. पुसद उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वसंत नगर पोलीस स्टेशनकडून तपासाची चक्रे वेगाने फिरत असून, लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# गुटखा तस्करीला पोलिसांचा हात?

## तिन शिपाई निलंबित 'वरदहस्त' असलेला कर्मचारी मात्र सुरक्षित!

### लोहारा-लाडखेडचे कर्मचारी कारवाईच्या जाळ्यात; ढुमनापूर प्रकरणाने उघड केले वसुलीचे रॅकेट

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - जिल्ह्यात गुटखा तस्करीप्रकरणी पोलिस यंत्रणेतीलच काही कर्मचाऱ्यांचा सहभाग उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. नेर मार्गावरील ढुमनापूर शिवारात घडलेल्या घटनेत तिघा पोलिस शिपायांचे गुटखा तस्करांशी संबंध असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले आहे. मात्र, या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार मानला जाणारा एक कर्मचारी अद्याप कारवाईपासून दूर असल्याने पोलिस विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे १० वाजता तन्वीर (नेर) हा अमरावतीहून गुटखा घेऊन आदिलाबादकडे जात असताना ढुमनापूर परिसरात त्याला तिघा शिपायांनी अडवले. वाहन 'डायरीवर' असल्याचे कारण देत वरिष्ठांच्या सांगण्यावरून वाहन सोडण्यात आले. मात्र, अंधाराचा फायदा घेत तिघांपैकी एकाने गुटख्याची दोन पोती लंपास केल्याची धक्कादायक बाब समोर आली. यानंतर तस्करांमध्येच झालेल्या वादातून हे प्रकरण उघडकीस आले. घटनेची माहिती प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध होताच पोलिस अधीक्षकांनी संबंधित कर्मचाऱ्यांचा कसुरी अहवाल मागवला. त्याआधारे लाडखेड पोलिस ठाण्यातील अविनाश ढोणे तसेच लोहारा येथील बबलू पठाण आणि प्रशांत राठोड यांना निलंबित करण्यात आले. तथापि, या प्रकरणातील थेट 'कनेक्शन' जोडणारा एक कर्मचारी अजूनही सुरक्षित असल्याची चर्चा आहे.

संबंधितावर पोलिस निरीक्षकाचा वरदहस्त असल्याने त्याच्यावर साधी चौकशीही झालेली नसल्याचा आरोप आहे. गुटखा तस्करीतील व्यवहार, तसेच तस्करांशी संपर्क प्रस्थापित करण्यात त्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यातील सहा पोलिस उपविभागांमध्ये अशा प्रकारचे 'वसुली' करणारे कर्मचारी सक्रिय असल्याचीही चर्चा असून, त्यांच्यावर कारवाई क्वचितच होत असल्याचे चित्र आहे.

अनेक कर्मचारी नियमित कर्तव्यापेक्षा अवैध वसुलीत अधिक गुंतलेले असून, राजकीय दबावाच्या जोरावर सोयीच्या ठिकाणी नियुक्ती मिळवत असल्याचेही समोर येत आहे. दरम्यान, पोलिस अधीक्षकांनी केलेल्या कारवाईमुळे अशा वसुली कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, उर्वरित संबंधितांवर कठोर कारवाई होणार का, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

# पीकविमा नाकारला, कर्जाचा फास आवळला!

## मारेगावात ७२ तासांत ३ शेतकऱ्यांचा मृत्यू, प्रशासनावर सवाल

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - सततच्या पावसामुळे उध्वस्त झालेल्या शेतीला आधार मिळण्याऐवजी पीकविमा नाकारल्याने मारेगाव तालुक्यात अवघ्या ७२ तासांत तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

पार्डी येथील कैलास गाडगे, सुर्ला येथील विलासभाऊ मेश्राम आणि गोरज येथील युवा शेतकरी अविनाश पानघाटे अशी मृतांची नावे असून, हे तिघेही आदिवासी, दलित व मागासवर्गीय घटकांतील असल्याची माहिती शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी दिली.

जिल्ह्यात २०२६ मध्ये आतापर्यंत ६४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या नोंदल्या गेल्या आहेत. याशिवाय मक्त्याने शेती करणाऱ्या २४ भूमिहीन शेतकऱ्यांच्या मृत्यूची अधिकृत नोंदच होत नसल्याचा आरोप आहे.

या कुटुंबांकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी पाठ फिरवल्याची टीका होत आहे.यावर्षी जून ते नोव्हेंबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस व सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले. बँकांकडून अपुरा कर्जपुरवठा, वाढलेला लागवड खर्च आणि सावकारांच्या विळख्यात अडकलेले शेतकरी यामुळे कर्जबाजारी पणाचा ताण वाढला आहे. पीकविमा हा शेवटचा आधार ठरू शकला असता; मात्र तोही नाकारल्याने संताप व्यक्त होत आहे.

"सरकारने तातडीने पीकविमा मंजूर करून पतपुरवठा वाढवला नाही, तर आत्महत्यांची मालिका थांबणार नाही," असा इशारा किशोर तिवारी यांनी दिला. हमीभावावर बोनस, खर्चात कपात आणि पीकपद्धतीत बदल या उपाययोजनांचीही त्यांनी मागणी केली आहे.

## वेचक

### आठ महीन्यापासून खुनाचा प्रयत्न गुन्हयातील फरार आरोपी ताब्यात



पुसद - 24/04/2026 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद उपविभाग पुसद पाहीजे व फरार आरोपी शोध घेत असतांना सन 2025 पासून पोलीस स्टेशन वसंतनगर अप क्रमांक 280/2025 कलम 109, 351(2), 351(3), 296, 3(5) भान्यास सह कलम 3, 25 आर्म ॲक्ट मधील खुनाचा प्रयत्न गुन्हयातील फरार पाहीजे आरोपी मोहम्मद आवेज ऊर्फ तिड्डु। मोहम्मद नजीर हा गायमुखनगर रोड पुसद परिसरात असल्याबाबत नमूद पथकांस गोपनिय माहीती मिळाल्याने गायमुखनगर रोड पुसद परिसरात पोहचुन शोध घेवून पोलीस कौशल्याचा वापर करुन अतिशय शिताफिने त्यास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मोहम्मद आवेज ऊर्फ तिड्डु। मोहम्मद नजीर वय 27 वर्ष, रा. पार्वती नगर पुसद असे असल्याचे सांगितल्याने तसेच हाच आरोपी सन 2025 पासून खुनाच्या प्रयत्नातील मधील नमूद गुन्हयातील फरार पाहीजे आरोपी असल्याचे खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेवून आरोपी नामे मोहम्मद आवेज ऊर्फ तिड्डु। मोहम्मद नजीर वय 27 वर्ष, रा. पार्वती नगर पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यास पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन वसंतनगर यांच्या ताब्यात दिले.

### भाजी मंडी व ब्राह्मणी फाटा येथे जुगार अड्डयांवर छापा, चार आरोपींवर गुन्हे दाखल

वणी - अवैध धंद्यांवर पोलीसांचा कडक बडगा नागरिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले असून दिनांक 20 एप्रिल व 23 एप्रिल 2026 रोजी वणी शहरातील भाजी मंडी परिसर तसेच ब्राह्मणी फाटा परिसरात लपून-छपून सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर वणी पोलीस प्रशासनाने धडक कारवाई केली.या कारवाईत चार आरोपींवर जुगार कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार,अतुल सुधाकर नक्षीने (रा. रंगारीपुरा,वणी), शेख फारुख शेख सलीम (रा. पंचशील वार्ड, वणी),अंश सावंत पासवान (रा.पंचशील नगर,वणी) व रेहान मोहम्मद हनीफ शेख (रा. पंचशील नगर, वणी) यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.या छाप्यामध्ये एकूण ४,३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वणी पोलीस विभागाकडून सातत्याने माहिती संकलन करून विशेष पथकांच्या माध्यमातून अशा अवैध जुगार अड्ड्यांवर छापे टाकले जात आहेत.शहरातील बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ही मोहीम पुढेही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे पोलीसांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात सुरू असलेल्या अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती पोलीसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन वणी पोलीस निरीक्षकांनी केले आहे.

# राळेगावची बदनामी थांबवा! मानवी तस्करीच्या आरोपांवर पत्रकार संघटना आक्रमक

## तथ्यहीन वृत्तांकनाला लगाम घालण्याचा निर्धार; सत्य समोर आणण्याची प्रशासनाकडे मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - गेल्या काही दिवसांपासून राळेगाव तालुक्यात 'मानवी तस्करी' आणि 'मुलींची विक्री' होत असल्याच्या आरोप-प्रत्यारोपांमुळे तालुक्यात भीती आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर आरोपांमुळे शांतताप्रिय व शिस्तबद्ध ओळख असलेल्या राळेगावची नाहक बदनामी होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील दोन्ही पत्रकार संघटनांची संयुक्त बैठक शनिवार (दि. २५) रोजी सायंकाळी 'आत्मबल' कार्यालयात पार पडली.

बैठकीत प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील सर्व प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सध्याच्या परिस्थितीवर सखोल चर्चा केली. यावेळी "तथ्यहीन व अप्रमाणित बातम्यांमुळे समाजात गैरसमज पसरत असून अशा वृत्तांकनाला आळा बसला पाहिजे," असे ठाम मत व्यक्त करण्यात आले. "राळेगाव तालुका हा सीतामातेच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेली भूमी आहे. अशा पवित्र ठिकाणी मानवी तस्करीसारखे गंभीर आरोप होणे अत्यंत दुर्दैवी आहे," अशा भावना पत्रकारांनी व्यक्त केल्या. राज्यातील पत्रकारांनी कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी वस्तुस्थितीची खातरजमा करावी, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली. राळेगावची ओळख ही सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची असून, चुकीच्या आरोपांमुळे या परंपरेला धक्का बसत असल्याचेही अधोरेखित करण्यात आले. सध्या सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

प्रशासनाकडे मागणी : या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार संघटनांनी केली. पत्रकारांचा निर्धार : "आमच्या पिढ्या या मातीत वाढल्या आहेत; हा परिसर असा कधीच नव्हता आणि नसेल," असा ठाम विश्वास उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केला. राळेगावची शांतता, सुव्यवस्था आणि प्रतिष्ठा अबाधित ठेवण्यासाठी सर्व पत्रकारांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या बैठकीस तालुक्यातील दोन्ही पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार तसेच तरुण प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्याची अस्मिता जपण्यासाठी पत्रकार संघटना आता अधिक सक्रिय झाल्या असून, चुकीची माहिती पसरवणाऱ्यांविरोधात एकत्रित लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# सामाजिक बांधिलकीचा सन्मान!

## पाटीपुरा 'आंबेडकर जयंती गौरव' सोहळ्यात पत्रकार विवेक वानखडे सन्मानित

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - आंबेडकरी विचारांचा जागर आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा पाटीपुरा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाचा समारोप शुक्रवारी (दि. २४) अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात युवा पत्रकार विवेक वानखडे यांना त्यांच्या निर्भीड लेखणी व समाजभिमुख कार्याबद्दल 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

आपल्या परिसरातील नागरिकांकडून मिळालेल्या या सन्मानामुळे भावूक झालेल्या वानखडे यांनी, "हा पुरस्कार माझ्या कार्याला नवी प्रेरणा देणारा आहे. यामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून, जनतेच्या प्रश्नांना लेखणीच्या माध्यमातून अधिक ताकदीने मांडण्याचा प्रयत्न करणार, मुस्लिम समाजाचे विशेष आभार व्यक्त करीत आपल्या भावना व्यक्त केल्या. १४ एप्रिल ते २४ एप्रिल या कालावधीत आयोजित या जयंती महोत्सवात विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. रांगोळी, मॅरेथॉन, संगीत खुर्ची, पावर लिफ्टिंग, बुद्धिबळ, चित्रकला आणि नृत्य स्पर्धांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संदेश दुपारे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी "जिथे कमी तिथे आम्ही" या भावनेतून हा दहा दिवसांचा महोत्सव यशस्वी केला. समारोपीय कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजसेविका प्रमोदिनी रामटेके, संदेश दुपारे यांना मुस्लिम समाज,व सय्यद मतीन यांच्या माध्यमातून पुरस्कार देण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार मतीन सय्यद, ॲड. राहुल पाटील, हरीश रामटेके, गायिका सीमा खान, विजया भगत (ब्लू शाहीन ग्रुप) व नीलिमा मॅडम यांची उपस्थिती लाभली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचाही त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे तरुण कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम महत्त्वाचे ठरले. इंजिनीअर संदीप गायकवाड, संतोष पाटील, कुणाल चव्हाण, सुरज नगराळे, सचिन मेश्राम, श्रेयश रामटेके, श्याम मिश्रा, हिमांशू देशभ्रतार, नितीन धुळे आदींनी विशेष मेहनत घेतली. पाटीपुरा हा केवळ उत्सव साजरा करणारा परिसर नसून सामाजिक परिवर्तनाचा विचार रुजवणारे केंद्र म्हणून ओळखला जातो. यंदाचा जयंती सोहळा हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता वैचारिक जागर निर्माण करणारा ठरला. तरुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच समाजाभिमुख पत्रकाराचा सन्मान करून समितीने सामाजिक सलोखा आणि बांधिलकीचा आदर्श समोर ठेवला.

# घाटंजी तहसीलदार साळवे यांची महसूल मंत्र्यांकडे तक्रार

## तक्रारीत निलंबणाची मागणी, महसूल मंत्री बावनकुळे यांनी तक्रारीची दखल घेतल्याची सूत्रांची माहिती

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तहसीलचे तहसीलदार विजय साळवे हे भ्रष्टाचारी,स्वभावाने उद्धट आणि गरिबांप्रती त्यांना सहानुभूती नसल्याने त्याची चौकशी करून त्यांना निलंबन अथवा बदली करण्यासंबंधीची तक्रार थेट राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे घाटंजी तालुक्यातील साखरा येथील रहिवाशी चंद्रकांत चंद्रभान चौधरी यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे कि, चंद्रकांत चौधरी हे आपल्या म्हाताऱ्या आईचे निराधार सुरु करावा याकरिता तहसील कार्यालय घाटंजी येथे गेले असता निराधार योजनेकरिता लागणाऱ्या महत्वाच्या दस्तावेजापैकी कमी उत्पनाचा दाखला मिळाला म्हणून गेले असता तहसीलदार विजय साळवे यानी चौधरी यांना उद्धट शब्दात वागणूक देत निराधारांकरिता कमी उत्पन्नाचा दाखला मिळणार नाही आणि तुम्हाला निराधार सुरु करायचा असल्यास खर्च करावा लागेल अशी ताकीद देत त्याचा अपमान केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे.एवढेच नव्हे तर तहसीलदार यांचे रेती माफियांशी संबंध असून त्यांच्याकडुन हफ्ते मंडळ अधिकाऱ्यांमार्फत बांधून आहे आणि तालुक्यातील 104 राशन दुकानदाराकडून आणि सेतू केंद्राकडूनही हफ्ता घेतात,तहसीलच्या रेकार्ड रूम मध्ये ठेवलेल्या दोन दलालामार्फत रेकार्डच्या लिपिकांकडून हफ्ता घेतात,चंद्रकांत चौधरी यांनी या अगोदर तत्कालीन घाटंजीच्या तहसीलदार पूजा माटोडे याची एलसीबी मुंबई येथे तक्रार दिली होती ती तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकत असल्याचे तक्रारीत चौधरी यांनी नमूद केले आहे.

निराधार व उपेक्षित लोकांसोबत उद्धटपणे वागणारे तहसीलदार विजय साळवे यांची याअगोदर आर्णी विधानसभेचे आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी सुद्धा त्यांची तक्रार दिली होती.घाटंजी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते दत्ताजी गटलेवार यांच्या एका प्लाटवरील कर्जाचा बोजा तहसीलदारांनी केलेली पैशाची मागणी पुर्ण न केल्याने एका प्लॉटवरील कर्ज बोजा त्याच्या बाराही प्लॉटवर चढविले त्या अन्यायाविरुद्ध तहसील कार्यालयापुढे दत्ताजी गटलेवार यांनी उपोषण केले होते.अशी अनेक राजकीय व सामाजिक संघटनेकडून तहसीलदार साळवे यांच्या विरुद्ध उपोषने झाल्याची चित्रे पाहवयास मिळाली एवढच नव्हे तर गणपत लांबतुरे या खाजगी दलाला मार्फत तहसीलदार अनेक अवैध कामे करून घेऊन कमाई करत असल्याचा आरोप चौधरी यांनी केला आहे त्यामुळे असे अनेक अवैध कामे करणाऱ्या आणि गरिबांना सन्मानाची वागणूक न देणाऱ्या तहसीलदार विजय साळवे यांची सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी किंवा त्यांची बदली अथवा त्यांना निलंबित करण्यात यावे अशी तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# बांधकाम कामगार स्थानीक सनियंत्रन समितीच्या अशासकीय सदस्यपदी महेश महादेव ढाकरे

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत बांधकामगार 'स्थानिक संनियंत्रण समिती' अशासकीय सदस्य पदी घाटंजी येथील महेश महादेवराव ढाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यवतमाळ येथे स्थानिक सनियंत्रन समितीची बैठक पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आर्णी विधानसभेचे आमदार राजूभाऊ तोडसाम होते. तर प्रियाताई तोडसाम यांची प्रमुख उपस्थिती होती. आर्णी केळापूर विधानसभा मतदार संघातील बांधकाम कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि शासनाच्या कल्याणकारी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत पाऊल उचलण्यात आले. महाराष्ट्र शासन कामगार विभागात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ जिल्हा कामगार सुविधा केंद्र यवतमाळ यांच्या विद्यमाने सनियंत्रण समितीची बैठक पार पडली. सदर बैठकीत बांधकाम कामगारांना नोंदणी करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि कामगारांच्या कुटुंबाना मिळणाऱ्या शासकीय योजना या संबंधित चर्चा करण्यात आली. या बैठकीत महेश ढाकरे यांची आर्णी विधानसभा अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी बैठकीला जिल्हा कामगार अधिकारी राहुल काळे, जतकर, गुल्हाने, मरस्कोल्हे तसेच पुरुष कामगार प्रतिनिधी सदस्य नंदकिशोर पंडित, मालक प्रतिनिधी बाळू जाधव, महिला कामगार प्रतिनिधी कल्पना वडे,अश्विनी सलाम, यांचा सहभाग होता.

# बाभूळगाव येथे 'पौष्टिक खाद्य पदार्थ प्रदर्शन, स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), पंचायत समिती बाभूळगाव अंतर्गत दि. २३ एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायत मालापूर येथील समाज भवन येथे 'पोषण पंधरवाडा' व स्व. बळवंत कामडी सरांच्या स्मृतीनिमित्त तालुकास्तरीय पौष्टिक खाद्य पदार्थ प्रदर्शनी व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात तालुक्यातील ६० महिलांनी विविध पौष्टिक पदार्थांचे स्टॉल्स लावून आपल्या पाककौशल्याचे दर्शन घडवले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सहायक गट विकास अधिकारी हेमंत नेवल यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अभियान व्यवस्थापक श्री. अमित जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक (प्रथम संस्था) विपुल चौधरी, प्रभागसंघ अध्यक्ष स्वातीताई खोंडे, तालुका व्यवस्थापक प्रशांत मोदी, सुनील जाधव, प्रभाग समन्वयक अल्पा राठोड, विजय उघडे आणि विक्रम रामटेके (गिमोना) उपस्थित होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्व. बळवंत कामडी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

गट विकास अधिकारी हेमंत नेवल यांनी महिलांनी तयार केलेले पदार्थ केवळ प्रदर्शनापुरते मर्यादित न ठेवता, ते व्यावसायिक स्तरावर आणण्याचे आवाहन केले.

तालुका व्यवस्थापक सुनील जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "तुम्ही केवळ अन्नपूर्णा नसून उद्याच्या यशस्वी उद्योजिका आहात." त्यांनी चव, गुणवत्ता, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि FSSAI परवाना यांसारख्या महत्त्वाच्या व्यावसायिक टिप्स देऊन महिलांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित केले.

# उष्णतेमुळे चालकाचे प्रकृती खालावली, चालक वाहक रुग्णालयात दाखल

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड़ - अहमदपूर डेपोची महामंडळाची बस एम२० (बी१८६२) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर डेपोतून सकाळी १०:०० वाजता नागपूरसाठी निघाली. उष्णतेमुळे इंजिनची उष्णता वाढली, ज्यामुळे चालक अमोल आनंदराव डोंगरे आणि वाहक हरिश्चंद्र नामदेव मुसळे यांची प्रकृती खालावली.

प्रकृती खालावत असल्याचे पाहून, चालक आणि वाहकाने तात्काळ बसमधील ४० ते ५० प्रवाशांना उमराखेड बस डेपोत उतरवले आणि स्वतः उमराखेडच्या सरकारी रुग्णालयात दाखल झाले. डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर, चालकाने तात्काळ पुढील प्रवास रद्द केला. दरम्यान महामंडळाच्या जुन्या आणि भंगार झालेले बसेस लांबच्या प्रवासासाठी वापरू नयेत आणि त्याऐवजी नवीन बसेसची व्यवस्था करून प्रवाशांना सवलत घ्यावी अशी जनतेकडून मागणी होत आहे. अहमदपूर ते नागपूर हे अंतर सुमारे ५०० किलोमीटर असून, कडक उन्हात हा प्रवास करायला एक दिवस लागतो. ५०० किलोमीटरचा प्रवास करणे म्हणजे आपला जीव धोक्यात घालण्यासारखेच आहे. महामंडळाच्या अनेक योजना व अत्याधुनिक बसेसची सुविधाचे सरकारचे जनतेला दिलेले मोठे दावे आणि आश्वासने पोकळ ठरत आहेत.

# जनगणना २०२७ साठी पुसदमध्ये प्रगणक-पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरू; पहिल्या टप्प्यात २०० जणांना मार्गदर्शन

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने पुसद येथे प्रगणक व पर्यवेक्षकांच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली असून, पहिल्या टप्प्यात शनिवारी (दि. २५ एप्रिल) २०० जणांना मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणाबाबत माहिती अशी की, जनगणना प्रक्रियेसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने तीन टप्प्यांत प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. पहिला टप्पा २५, २७ व २८ एप्रिल रोजी, दुसरा टप्पा २९, ३० एप्रिल व २ मे रोजी, तर तिसरा टप्पा ४ ते ६ मे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सर्व टप्प्यांत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी चार्ज अधिकारी म्हणून तहसीलदार रेखा वाणी कार्यरत असून, अतिरिक्त चार्ज अधिकारी म्हणून नायब तहसीलदार वैभव खाडे काम पाहत आहेत. जनगणना कक्षात सहाय्यक महसूल अधिकारी दिलीप कोलेवाड, तलाठी कामराज चौधरी व निलांजन वानखेडे, तसेच महसूल सहाय्यक प्रणित भवरे आणि तांत्रिक सहाय्यक निलेश पवार हे कामकाज सांभाळत आहेत. मास्टर ट्रेनर म्हणून कामराज चौधरी, निलांजन वानखेडे, गजानन कवाने, विजय डोईफोडे, नितीनकुमार नरवाडे, पवन काळे, सुमित बोजेवार आणि संदीप राठोड हे प्रशिक्षण देत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कॉम्प्रेसर मशीनमध्ये स्फोट; सहा दुचाक्या जळाल्या

## वॉलकट कम्पाउंड परिसरातील घटना

**अमरावती/का.प्र.**

कॉम्प्रेसर मशीनमध्ये स्फोट होऊन वाहन दुरुस्ती व पेंटींगच्या दोन दुकानांना आग लागल्याची घटना शुक्रवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास वॉलकट कम्पाउंड परिसरात घडली. महत्त्वाची बाब म्हणजे या दुकानांच्या बाजुलाच गॅस सिलिंडरचे गोदाम व खासगी दवाखाना असल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती; मात्र अग्निशमन विभागाच्या तत्परतेमुळे आग आटोक्यात आली आणि मोठा अनर्थ टळला.

वॉलकट कम्पाउंड परिसरातील दुकानात वाहनांना रंग लावण्याचे काम केले जाते. त्यामुळे येथे पाच ते सहा दुचाक्या स्प्रे पेंटींग करण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी दुचाकींना रंग लावण्याचे काम सुरू असताना, अचानक कॉम्प्रेसर मशीनमध्ये स्फोट झाला.

महत्त्वाची बाब म्हणजे हा परिसर अत्यंत दाटीवाटीचा असून, बाजुला लहान मुलांचे खासगी रुग्णालय व गॅस सिलिंडरचे गोदामही आहे.



त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. आग लागताच शेख इमरान शेख उसमान यांनी अग्निशमन दलाच्या मुख्य कार्यालयात माहिती दिली. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचेपर्यंत दोन दुकानांना आग लागली होती आणि आकाशात काळ्या धुराचे लोट उडत होते. या आगीत पाच ते सहा दुचाक्या जळाल्यामुळे अंदाजे साडेतीन लाखांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, अग्निशमन दलातील जवानांनी तातडीने आग नियंत्रणात आणल्यामुळे परिसरातील नागरिकांचा जीव भांड्यात पडला.

ही आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांच्या नेतृत्वात केंद्रप्रमुख सोनकांबळे, फायरमॅन योगेश ठाकरे, सतीश घाटे, राहुल खोडे, दहातोंडे व वाहनचालक राजकुमार खडसे, गणेश राठोड, फरहान खान आदीनी शर्थीचे प्रयत्न केले.

**CHANGE IN NAME**

**Old Name:**
SURAIYA BANO
**New Name:**
SURAYYA PARVIN
MOHAMMAD SHAKIR
**Address:**
QASADPURA
ACHALPUR, ACHALPUR
CITY, AMRAVATI,
MAHARASHTRA, 444806

# राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानच्या वतीने 'शेतकरी सन्मान सप्ताह'

## पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांच्या बांधावर होणार वितरण

**अमरावती/का.प्र.**

राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावतीच्या वतीने राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न वितरण सोहळा पुरस्कार २०२५-२६ ची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. भारताचे माजी पंतप्रधान व विज्ञान क्रांतीचे जनक स्व. राजीव गांधी यांच्या २१ मे या स्मृतिदिनाचे औचित्य साधून २१ ते २८ मे २०२६ दरम्यान 'शेतकरी सन्मान सप्ताह' साजरा केला जाणार आहे. अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी दिली आहे.



सप्ताहाची सुरुवात २१ मे रोजी सकाळी नऊ वाजता तीर्थक्षेत्र दोनद येथे बैलजोडी पूजनाने होईल. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे पुरस्कार वितरण थेट पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांच्या बांधावर होणार आहे. समारोप २८ मे रोजी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांचे संगोपन करणाऱ्या सेवाभावी संस्थांना गौरवून होईल. स्व. राजीव गांधी यांनी कृषी क्षेत्राला विज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांना प्रगतीचे नवे दालन उघडले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणारा हा शेतकरी सन्मान सोहळा आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२६ हे वर्ष जागतिक महिला शेतकरी दिन म्हणून जाहीर केले आहे. त्यामुळे यावर्षीच्या पुरस्कारात महिला शेतकरी, कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या महिलांना प्राधान्याने निवडले जाणार आहे. २१ प्रवर्गातून २१ शेतकऱ्यांची निवड होणार आहे. यात प्रयोगशील शेतकरी, कृषी वैज्ञानिक, उत्कृष्ट तिफणकरी, कृषी उद्योजक, फार्मर प्रोड्यूसर कंपनी, कृषी पत्रकार यांचा समावेश आहे. दुग्ध उत्पादक, आदिवासी फळबागायतदार, शेतकरी, सेंद्रिय शेती, मत्स्यपालन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही विशेष पुरस्काराने गौरवले जाईल.

**२० वर्षांची यशस्वी परंपरा**

राज्य शासनाच्या जिजामाता कृषी भूषण पुरस्कारप्राप्त पौर्णिमा सवाई यांच्या अध्यक्षतेखाली १२ कृषी तज्ज्ञांची निवड समिती नेमली आहे. ही समिती १० मे २०२६ पर्यंत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन निवड करणार आहे. आयोजनासाठी १० मान्यवरांची राज्यस्तरीय समितीही कार्यरत आहे. जवळपास ३०० प्रस्ताव येणे अपेक्षित आहे. २००७ पासून सलग सुरू असलेल्या या उपक्रमाचे यंदा विसावे वर्ष आहे. आजपर्यंत ३९४ प्रगतशील शेतकरी, कृषी कंपनी, शेतमजूर, वैज्ञानिक, उद्योजक, महिला शेतकऱ्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यातील १३२ शेतकऱ्यांना राज्य शासनाचे कृषी पुरस्कारही मिळाले आहेत. पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना सन्मानचिन्ह, स्व. राजीव गांधी यांची प्रतिमा, मानधन, प्रमाणपत्र, सन्मानाच्या वस्तू प्रदान केल्या जातात. पुरस्कार स्वीकारण्यासाठी शेतकऱ्यांना सपत्नीक, सहपरिवार सन्मानित केले जाते.

---

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर**
**यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : ११७/ २०२६ नेमलेली तारीख :- १५-०६-२०२६

**१. नरेश दौलतराव गायकवाड**
**२. अमित नरेश गायकवाड**
**३. पायल नरेश गायकवाड**

सर्व रा. प्लॉट नं. ४८६, पंचमुख हनुमान मंदिर जवळ, न्यु नंदनवन लेआऊट, नागपूर, जि. नागपूर

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत विमल नरेश गायकवाड यांचा मृत्यु दि. २२.०९.२०२२** मध्ये सेव्हन स्टार हॉस्पीटल, नागपूर, जि. नागपूर येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ हे पती, **अर्जदार क्र. २ हा मुलगा तर अर्जदार क्र. ३ ही मुलगी** आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. **आज दिनांक : २३ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर**
**यांचे न्यायालयामधील**

किरकोळअर्ज क्र. : ११८/ २०२६ नेमलेली तारीख :- १२-०६-२०२६

**१. शुभम साहेबराव भोयर**
**२. गौरव साहेबराव भोयर**

दोन्ही. रा. वेणी गणेशपूर, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत ज्योत्सना साहेबराव भोयर** यांचा **मृत्यु दि. २८.०८.२०२५** मध्ये हायटेक हॉस्पीटल, अमरावती जि. अमरावती येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र. १ आणि अर्जदार क्र. २ ही मुल** आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : २३ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : १२२/ २०२६ नेमलेली तारीख : १८/०६/२०२६

**आयिशा वि. निरंक**

**१. आईशा खातून कयामुदिन-** नांदगाव खंडेश्वर ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**२. इमरान सईद कयामुदिन-** नांदगाव खंडेश्वर ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**३. सबा फिरदौस सैय्यद तमीम-** नांदगाव खंडेश्वर ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**४. तसनिम फिरदौस सैय्यद वकार अली-** रा. वाठोडा शुक्केश्वर ता. भातकुली जि. अमरावती
**५. अंबारिन नसरिन सैय्यद सलीम -** सय्यद पुरा अकोट ता. अकोट जि. अकोला

**//वि// - निरंक**

ज्याअर्थी, **मयत कयामुदिन बशीरउदीदन यांचे दि. ०१/०२/२०२४ रोजी निधन** झाले. मयत यांची अर्जदार क्रं. १ ही पत्नी आहे. व अर्जदार क्रं. २ ते ५ हे मुल व मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच वर्ग - १ चे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २२ एप्रिल२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ अर्ज क्र. : १२५/ २०२६ नेमलेली तारीख :- १७-०६-२०२६**

**१. ज्ञानेश्वर विठोबा गुजर**
**२. रविंद्र ज्ञानेश्वर गुजर** दोघेही रा. राधाकृष्ण पार्क, ए-विंग रूम नं. ००१, मलांग रोड, चेतना शाळेजवळ, पिसवली, कल्याण पूर्व, काटेमानिवली, कल्याण, ठाणे
**३. हर्षलता विशाल गायकवाड**
रा. चाळ-१, रूम १३, रेश्मा कॉलनी, नवीन पोस्ट ऑफीस रोड, नितीराज हॉटेल जवळ, कल्याण पूर्व, कल्याण, जि. ठाणे

**//वि//निरंक**

ज्याअर्थी, **मयत प्रभा उर्फ प्रभावती ज्ञानेश्वर गुजर यांचा मृत्यु दि. ०१.०१.२०२१** मध्ये अमेय मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पीटल, सायकलॉन टॉवर, चक्की नाका, डोंबीवली कल्याण जि. ठाणे येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. **१ हा पती, अर्जदार क्र. २ हा मुलगा असून अर्जदार क्र. ३ ही मुलगी** आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : २१ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**सह मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर**
**यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : १२६/ २०२६ नेमलेली तारीख : १२/०६/२०२६

**१. पंचफुला पंजाब राठोड** रा. टाकळी गिलबा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**२. सुनिल पंजाब राठोड** रा. टाकळी गिलबा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**३. अमोल पंजाबराव राठोड** रा. टाकळी गिलबा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**४. मनुबाई साहेबराव जाधव** रुम नं. १६ भावीण अपर नविन वैष्णवी नगर चंदासार रोड, विरार ईस्टे पालघर जि. ठाणे
**५. संगीता ज्ञानदेव पवार** - पिंपळगाव डुब्बा, ता. नेरपरसोपंत जि. यवतमाळ
**६. रेणूका संजय पवार** व्दारा कल्पना औतकर, प्लॉट नं. १८ हटवार ले आऊट परसोडी, उमरेड ता. उमरेड जि. नागपुर

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत पंजाबराव शिवराम राठोड यांचे दि. १९/०९/२०२५ रोजी टाकळी गिलबा पो. पिंपरी निपाणी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती** येथे निधन झाले. मयत यांची अर्जदार क्रं. १ ही पत्नी आहे व अर्जदार क्रं. २ व ३ हे मुले आहेत व अर्जदार क्रं. ४ ते ६ हया विवाहीत मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच वर्ग- १ चे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुद्ध काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. आज दिनांक : २२ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर**
**यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : ११६/ २०२६ नेमलेली तारीख :- १०-०६-२०२६

**१. मो. इद्रिस अब्दुल गफ्फार भुत**
**२. परवीन मो. इद्रिस भुत** दोन्ही. रा. पो. ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत मोहम्मद अफान मो. इद्रिस भुत यांचा मृत्यु दि. १७.१२.२०२५ मध्ये नांदगाव खंडेश्वर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ व २ हे आई वडील आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २३ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज क्र. : ११४/ २०२६ नेमलेली तारीख : १०-०६-२०२६

**१. तुकाराम धनुजी भुजाडणे**
**२. राजाराम धनुजी भुजाडणे** क्र. १ व २ रा. भगुरा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
**३. उमेश नारायण भुजाडणे**
**४. अतुल नारायण भुजाडणे** क्र. ३ व ४ रा. अवधुत मंदिर जवळ, बारी पुरा, मंगरूळ दस्तगीर, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती
**५. अमोल नारायण भुजाडणे** रा. वार्ड नं. २, शिवाजी चौक, मंगरूळ दस्तगीर, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत धनु किसन भुजाडणे** यांचा **मृत्यु दि. १२.०८.१९८९** मध्ये भगुरा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथे झाला. **मयताचे पत्नी नामे बिंदाबाई धनुजी भुजाडणे यांचा मृत्यु दि. १९.११.१९९०** मध्ये भगुरा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ व २ ही मुले असून अर्जदार क्र. ३ ते ५ हे नातू आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलग ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २३ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज : ११०/२०२४ नेमलेली तारीख : ०८/०५/२०२६

**मीरा वि. निरंक**

**१. मीरा शंकरराव पवार-** रा. धर्मापुर पोस्ट पळसमंडळ ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**२. गोपाल शंकर पवार-** रा. धर्मापुर पोस्ट पळसमंडळ ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**३. रुपेश शंकर पवार-** रा. धर्मापुर पोस्ट पळसमंडळ ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**४. संगीता गजानन कलालकर-** रा. वाटपुर ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**५. मंगला साहेबराव लांडे-** रा. हिवरा मुरादे पोस्ट, निपाणी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती

ज्याअर्थी, **मयत शंकरराव मोतीराम पवार यांचा मृत्यु दि. ०८/१०/२०१८ रोजी धर्मापुर ता. नांदगाव खंडेश्वर** येथे झाला. **मयत यांचे अर्जदार क्रं. १ ही पत्नी आहे व अर्जदार क्रं. २ व ३ हा मुलगा** आहे. व अर्जदार क्रं. ४ आणि ५ हया विवाहीत मुली आहेत. मयत यांचे हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २० एप्रिल २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---

**मा. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ अर्ज : १०४/२०२४ नेमलेली तारीख : ०८/०५/२०२६

**शांती वि. निरंक**

**१. शांती रामजी चव्हाण**
रा. टाकळी गीलबा पो. पिंपरी निपाणी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

ज्याअर्थी, मयत **रामजी लक्ष्मण चव्हाण** यांचा **मृत्यु दि. २१/०१/२०२६** रोजी राहते **घरी टाकळी गीलबा, पो. पिंपरी निपाणी ता. नांदगाव खंडेश्वर** येथे झाला. मयत रामजी यांची **आई नामे केसलाबाई लक्ष्मण चव्हाण** यांचे ब-याच वर्षापुर्वी निधन झाले. मयत यांचे अर्जदोर क्रं. १ ही पत्नी आहे. मयत यांचे हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर चकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २० एप्रिल २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक
शिक्का — मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

---


# पाहिजेत

उर्दु एज्युकेशन सोसायटी वरूड र.नं. एफ-८२ द्वारा संचालीत (महाराष्ट्र शासन प्रमाणपत्र क्र. नं. 12092025SOC10651 दि. १२/०९/२०२५ अन्वये अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त) उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरूड ता. वरूड जि. अमरावती (१००% अनुदानीत) येथे खालील रिक्त पदे भरणे आहे.

| अ. क्र. | पदांचे नांव | पद संख्या | माध्यम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक वर्ग ११ वी व १२वी करिता | १ | उर्दू | एम.ए. बी.एड उर्दू आणि राज्यशास्त्र |
| २ | शिक्षण सेवक वर्ग ५ वी करिता | १ | उर्दू | उर्दु एच.एस.सी. डी.एड TET/CTET पात्र १ला पेपर |

इच्छुक उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्र व झेरॉक्स पत्रांसह १२/०५/२०२६ रोज मंगळवार सकाळी १०.०० ते ३.०० वाजता मुलाखती करिता स्वखर्चने शाळेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

**अध्यक्ष / सचिव**
उर्दू एज्युकेशन सोसायटी
वरूड वरूड ता.वरूड जि. अमरावती

**मुख्याध्यापक**
उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
वरूड आंबेडकर चौक वरूड


---

**जाहीर नोटीस**
**वि. दिवाणी न्यायालय (वस्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र. २०३/२०२६ ने.ता. १२/०६/२०२६

**अर्जदारः- १. भानुदास देविदास पोटे,** वय ५३ वर्ष, व्यवसाय -शेती
**२. एकनाथ देविदास पोटे,** वय ५० वर्ष, व्यवसाय -शेती
**३. मदन देविदास पोटे,** वय ५१ वर्ष, व्यवसाय -शेती
**४. श्रीकृष्ण देवियास पोटे,** वय ५७ वर्ष, व्यवसाय -शेती
सर्व रा. नरदोडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती

**विरुध्द - गैरअर्जदारः-**

**१. राजकन्या विष्णू भगत,** वय ४९ वर्ष, व्यवसाय - घरकाम रा. कोलखेड जहागीर, ता. जि. अकोला

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **देविदास यशवंत पोटे** हे **दिनांक २२/०६/२०२५** रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्य झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन- देविदास यशवंत पोटे** यांचे नावे मौजा अहमदपूर, ता. बदर्यापूर, जि. अमरावती येथील शेत गट क. ११४, ० हे. ३७ आर, पोट खराब २ आर. एकूण० हे. ३९ आर, आ.रु. ३.०८ व मौजा नरयोडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील ग्रा. पं. अंतर्गत अ.क. ५२५ मालमत्ता क. ०७, क्षेत्रफळ १०५४ चौ. फूट यावर बांधलेले घर व खुली जागा येणे प्रमाणे मिळकत आहे. वरील दोन्ही मिळकतींची बाजारभाव किंमत ५०,००० रु. आहे. आज दि. २२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
शिक्का — **दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

---

**सायटेशन/जाहीरातनामा**
**विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी**

**आर.एम.जे.सी.कं. ३१३/२०२६ ने.ता. १४/०६/२०२६**

**अर्जदार - १) श्रीमती पंचफुला अशोकराव ब्राम्हणे**, वय ७३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
**२) प्रफुल अशोकराव ब्राम्हणे,** वय ३६ वर्षे व्यवसाय -मजुरी
**३) कु. कविता अशोकराव ब्राम्हणे,** वय ३८ वर्षे, व्यवसाय -घरकाम
**४) कु. पुजा अशोकराव ब्राम्हणे,** वय ३३ वर्षे, व्यवसाय -घरकाम
**५) सौ. संगीता रुपराव तायडे,** वय ४१ वर्षे, व्यवसाय -घरकाम
**६) सौ. ममता आकाश शियाले,** वय-४० वर्षे, व्यवसाय -घरकाम
सर्व रा. आंबेडकर चौक मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती

**विरुध्द निल (कुणीही नाही)**

वरील अर्जदाराने वि. दिवाणी न्यायाधिश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २ बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार कं. १ चे पती तर अर्जदार कं. २ ते ६ यांचे वडील नामे **अशोक मारोती ब्राम्हणे** यांचा दि. २७/०८/२०१८ रोजी मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मृत्यु झालेला आहे. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहे. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयतांना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**आदेशानुसार**
**(सहायक अधिक्षक)**
शिक्का — **दिवाणी न्यायालय क. स्तर मोर्शी**

---

**जाहीर नोटीसे**
**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

आर.एम.जे.सी. २०७/२०२६ ने. ता. १९/०६/२०२६

**अर्जदार :- १. दिपा उर्फ गिता प्रकाश ताथोडकर**, वय ४२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा. मालवियपुरा, मोर्शी ता. मोर्शी जि. अमरावती
**२. बेला उर्फ सिता गजानन ढोले,** वय ४२ वर्ष व्यवसाय- घरकाम
रा. मालवाडी, वर्धा ता. जि. वर्धा

**गैरअर्जदार :- निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मृतक रमेशराव उर्फ रामचंद्रराव राऊत यांचा मृत्यु दि. २१/११/१९९५ रोजी आजारपनाने कुटीर रूग्ग्रालय, परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती येथे झालेला असुन ते कायमचे रा. करजगांव ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथी रहीवासी होते. तसेच मृतक शोभा रमेशराव राऊत हिचा मृत्यु दि. १६/०१/२०१७ रोजी झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत, अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीत्ता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. २०७/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २१/०४/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
शिक्का — दिवाणी व फौजदारी न्यायालय चांदुर बाजार



**महिलांना योग्य पाठबळ मिळते, तेव्हा संपूर्ण कृषी क्षेत्र बळकट होते. महिला शेतकरी व्यावहारिक तोडगे अतिशय वेगाने आत्मसात करतात. मग ते हवामानपूरक शेतीचे प्रशिक्षण असो, नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन असो किंवा श्रम कमी करणारी यंत्रे असो; हे केवळ तांत्रिक शिक्षण नसून त्यांच्यासाठी ते सक्षमीकरणाचे एक मोठे माध्यम आहे. जेव्हा आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाची जोड महिलांच्या स्वतःच्या अनुभवांचा मिळते, तेव्हा शेतीशी निगडित निर्णय अधिक अचूक आणि शाश्वत ठरतात.**



डॉ.सौम्या स्वामिनाथन



डॉ. अनामिका अजय

# महिलाच देतील शेतीला बळकटी

भारतातील समाजसुधारणेच्या चळवळींना दिशा देण्यात महाराष्ट्राचे योगदान ऐतिहासिक राहिले आहे. सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या महान वारशापासून ते विकासाच्या आधुनिक प्रवासापर्यंत, महाराष्ट्राने नेहमीच बदलाचे नेतृत्व करण्याचे धाडस दाखवले आहे. आज महाराष्ट्रासमोर कृषी परिवर्तनाच्या केंद्रस्थानी महिला शेतकऱ्यांना सन्मानाचे स्थान देण्याची एक उत्तम संधी चालून आली आहे. भारतातील इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही शेतीचा कणा महिलाच आहेत. पेरणी, पिकांची जोपासना, कापणी, प्रतवारी आणि प्रक्रियेमध्ये काम करतानाच त्या घरकाम आणि कुटुंबाच्या देखभालीची जबाबदारीही चांगल्याप्रकारे पेलतात. ग्रामीण भागातून पुरुषांचे शहरांकडे स्थलांतर वाढल्यामुळे शेतीमधील महिलांची जबाबदारी अधिकच वाढली आहे. दुर्दैवाने, इतके कष्ट करूनही त्यांना 'शेतकरी' म्हणून न ओळखता केवळ 'मदतनीस' म्हणून पाहिले जाते. हा विरोधाभास आज भारताच्या कृषी क्षेत्रापुढील प्रमुख आव्हानांपैकी एक आहे.

महिलांच्या नावे जमिनीची मालकी अत्यल्प आहे, त्यांना संस्थात्मक कर्ज मिळवताना अनेक अडचणी येतात आणि धोरणात्मक निर्णयांच्या प्रक्रियेतही त्यांना स्थान दिले जात नाही. जमिनीची अधिकृत मालकी नसल्यामुळे पाणी, आधुनिक तंत्रज्ञान, कृषी विस्तार सेवा आणि बाजारपेठेशी थेट जोडले जाणे यांसारख्या आवश्यक संसाधनांपासून त्या वंचित राहतात. परिणामी, ज्या क्षेत्राला त्या आपल्या कष्टाने जिवंत ठेवतात, त्याच क्षेत्रात त्यांची स्थिती एका मजुरासारखी होते. मात्र या परिस्थितीवर मात करून एक वेगळा आणि प्रगत मार्ग स्वीकारणे शक्य आहे, हे महाराष्ट्राने यापूर्वीच सिद्ध करून दाखविले आहे.

### महिला शेतकरी सक्षमीकरण प्रकल्प

विदर्भामधील वर्धा आणि यवतमाळसारख्या बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका बसलेल्या जिल्ह्यांमध्ये 'एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन'च्या सहकार्याने 'महिला किसान सक्षमीकरण परियोजना' राबविण्यात आली. या उपक्रमात प्रामुख्याने शेतकरी आत्महत्येमुळे निराधार झालेल्या महिला आणि इतर गरजू गटांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. शाश्वत शेतीचे तंत्र, नेतृत्वाचे प्रशिक्षण आणि स्थानिक समित्यांच्या माध्यमातून केलेली संघटनात्मक बांधणीमुळे या महिलांना ज्ञान, संसाधने आणि संस्थात्मक मदत मिळवणे सोपे झाले. यामुळेच शेतात राबणाऱ्या 'अदृश्य मजूर' ही ओळख पुसून त्यांनी स्वतःची 'शेतकरी' म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली.

या प्रकल्पातून एक गोष्ट प्रकर्षाने समोर आली ती म्हणजे जेव्हा महिलांना योग्य पाठबळ मिळते, तेव्हा संपूर्ण कृषी क्षेत्र अधिक बळकट होते. महिला शेतकरी व्यावहारिक तोडगे अतिशय वेगाने आत्मसात करतात. मग ते हवामानपूरक शेतीचे प्रशिक्षण असो, नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन असो किंवा श्रम कमी करणारी यंत्रे असो; हे केवळ तांत्रिक शिक्षण नसून त्यांच्यासाठी ते सक्षमीकरणाचे एक मोठे माध्यम ठरले आहे. जेव्हा आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाची जोड महिलांच्या स्वतःच्या अनुभवांना मिळते, तेव्हा शेतीशी निगडित निर्णय अधिक अचूक आणि शाश्वत ठरतात.

### आर्थिक स्वातंत्र्याचा नवा मार्ग

वैयक्तिक सक्षमीकरणासोबतच संस्थात्मक बांधणी महत्त्वाची आहे. आजही शेती बाजारपेठा किंवा मंडईसारख्या ठिकाणी पुरुषांचेच वर्चस्व अधिक असल्याचे जाणवते. प्रवासावरील मर्यादा,बाजारभावाची अपुरी माहिती आणि साठवणूक किंवा प्रक्रिया केंद्रांसारख्या पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या त्रुटींमुळे अनेकदा मध्यस्थांमार्फत कमी किमतीत माल विकण्याची वेळ येते. अशा वेळी महिला बचत गट, सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्या महिलांना कर्जपुरवठा, निविष्ठा, थेट बाजारपेठ आणि नेतृत्वाची संधी उपलब्ध करून देऊन या अडथळ्यांवर मात करण्यास मदत करू शकतात.

गेल्या काही वर्षांत 'एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन'ने अनेक राज्यांमध्ये अशा संस्थात्मक गटांसोबत मोठ्या प्रमाणावर काम केले आहे, ज्याचे सकारात्मक बदल आता प्रत्यक्ष जमिनीवर दिसू लागले आहेत. केवळ शेतीवर अवलंबून न राहता पशुपालन, मत्स्यपालन आणि मूल्यवर्धित प्रक्रियेसारख्या वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या साधनांना प्रोत्साहन दिल्यामुळे महिलांचे उत्पन्न वाढले असून त्यांची अस्मानी संकटांना तोंड देण्याची क्षमताही सुधारली आहे. काढणीपश्चात प्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या उपक्रमांनी त्यांना आर्थिक स्वातंत्र्याचा एक नवीन मार्ग दाखविला आहे. जशी महिलांच्या या आर्थिक भूमिकेला समाजात मान्यता मिळत जाईल, तसतसे महिलांना समान हक्क आणि सन्मान मिळवून देण्याचे आपले उद्दिष्ट अधिक जवळ येईल.

हवामान बदलाचे संकट महिला शेतकऱ्यांच्या भूमिकेचे महत्त्व अधिकच अधोरेखित करते. कमी मालमत्ता आणि अपुरी सुरक्षा साधने यामुळे दुष्काळ, अतिवृष्टी आणि पिकांच्या नुकसानीचा पहिला फटका अनेकदा महिलांनाच बसतो. तरीही प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या प्रक्रियेत त्या सर्वांत आघाडीवर असतात. हवामानपूरक शेतीमधील उपक्रम हे सिद्ध करतात, की जेव्हा महिला पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाची सांगड घालतात, तेव्हा बीज संवर्धनापासून ते पर्यावरणपूरक शेतीपर्यंतच्या शाश्वत साधनसंपत्ती व्यवस्थापनाचे त्या यशस्वी नेतृत्व करू शकतात.

महिला सहभागाची ही सकारात्मक चिन्हे महाराष्ट्रात पुष्कळ आधीपासून दिसू लागली आहेत. यामध्ये 'महिला किसान योजने'चे उदाहरण लक्षात घेतले. ही योजना महिलांना 'स्वतंत्र शेतकरी' म्हणून मान्यता देते. त्यांना कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, तसेच दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालनासारख्या पूरक उपजीविकेसाठी पाठबळ देते. तसेच 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) हा कार्यक्रमही एक उत्तम उदाहरण आहे. या अभियानाने महिलांच्या संघटनांना बळकटी दिली असून, त्यांना कर्जपुरवठा, बाजारपेठ आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### महिलांना मिळावेत अधिकार

गेल्या काही वर्षांत प्रगती होऊनही, सुधारणांचा वेग सर्वत्र सारखा नाही. खोलवर रुजलेल्या सामाजिक समजुतींमुळे आजही महिलांना जमीन आणि उत्पन्नावर समान अधिकार मिळत नाहीत. अनेक महिलांना घराबाहेर शेतातील कष्ट आणि घरात न मोबदल्याची घरकामे व कुटुंबाची देखभाल असे दुहेरी ओझे पेलावे लागते. या सततच्या कामांमुळे त्यांच्याकडे स्वतःसाठी वेळ उरत नाही, ज्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर, उत्पन्नावर आणि सार्वजनिक जीवनातील सहभागावर होतो. तसेच कृषी विस्तार सेवांमधील त्रुटी आजही महिला शेतकऱ्यांच्या दैनंदिन जगण्यावर मर्यादा आणत आहेत. शेतीचे 'स्त्रीकरण' म्हणजे केवळ त्यांच्या कामात वाढ होणे नव्हे, तर त्यांच्या अधिकारांमध्येही वाढ होणे आवश्यक आहे.

या परिस्थितीत सकारात्मक बदल घडवण्यासाठी महाराष्ट्राने आता काही ठोस पावले उचलणे काळाची गरज आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांची अधिकृत हमी देऊन महाराष्ट्र पुन्हा एकदा देशाला नवी दिशा दाखवू शकतो. यामध्ये सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे, शेतीमध्ये राबणाऱ्या महिलांना 'शेतकरी' म्हणून कायदेशीर मान्यता मिळवून देणे. थोडक्यात सांगायचे, तर राज्याने महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर आणि सामाजिक ओळख मिळवून द्यायला हवी. त्यासोबतच, कुटुंबांना आणि पुरुष शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर महिलांच्या नावाचा समावेश करण्यासाठी किंवा संयुक्त मालकी हक्कासाठी विशेष पुढाकार घ्यावा. केवळ जमिनीची मालकी असेल तरच कर्ज मिळेल, ही अट शिथिल करून महिलांना संस्थात्मक कर्ज मिळविण्याचे इतर पर्याय उपलब्ध करून द्यावेत. याशिवाय, कृषी विस्तार यंत्रणा आणि शेतीचे तंत्रज्ञान हे महिलांच्या प्रत्यक्ष गरजा आणि सोई लक्षात बैऊन विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. स्थानिक समित्या,

सहकारी संस्था आणि पाणी यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन करणाऱ्या निर्णय प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग केवळ नावापुरता न राहता, त्यांना समान निर्णयाधिकार मिळायला हवेत. ग्रामीण महिला केवळ विनामोबदला घरकामातच अडकून पडू नयेत, यासाठी बालसंगोपन आणि इतर कौटुंबिक सेवांमध्ये पुरेशी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने सामाजिक सुधारणांच्या बाबतीत यापूर्वी अनेकदा नेतृत्व केले आहे. आजही हे राज्य महिला शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी एक भक्कम आदर्श निर्माण करून इतर राज्यांसाठी पथदर्शक ठरू शकते.(साभार सकाळ अ‍ॅग्रोवन)

**डॉ. सौम्या स्वामिनाथन**
या एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत.

**डॉ. अनामिका अजय**
या एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनमध्ये मुख्य शास्त्रज्ञ (जेंडर) आहेत.)

### डिजिटल साधनांसोबत जोडणी

अगदी अलीकडच्या काळात, महाराष्ट्राने महिला विकास धोरणामध्ये तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करून एक प्रगत पाऊल उचलले आहे. 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या 'AI4AI' या उपक्रमासारख्या भागीदारीच्या माध्यमातून राज्य सरकार कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळासारख्या संस्थांच्या मदतीने स्वयंसहायता बचत गटांमधील दहा लाखांहून अधिक महिलांना डिजिटल साधने, अ‍ॅग्रीटेक सेवा आणि डेटावर आधारित सल्लागार प्रणालींशी जोडले जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता साधने पिकांविषयी सल्ला, कीड नियंत्रण आणि हवामानातील जोखमीची आगाऊ माहिती देऊ शकतात. यामुळे ज्ञानाच्या अभावामुळे निर्माण होणारी दरी कमी होऊन शेतीची उत्पादकता आणि संकटांना तोंड देण्याची क्षमता सुधारू शकते. 'महाग्री-एआय' धोरणदेखील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या न्याय्य आणि जबाबदार वापरावर भर देते, जेणेकरून शेतीच्या डिजिटल भविष्यात महिला शेतकरी मागे पडणार नाहीत.



## ..उन्हाचे चटके

ऋतु वसंत येताच
लागे उन्हाचे चटके,
पानगळ झाली सुरू
थंडी सरता फटके...

शीतलता सकाळची
देई समाधान मना
दूपारची उष्ण हवा
गर्मी देई सा-या जना..

घाम,देहाचे पोळणे
अंगी पुरळ उन्हाने
थंड,सरबत आणि
दाह कमी ते पन्ह्याने...

काना,डोई बांधण्याचा,
जुना रिवाज पाळता,
संरक्षण जीवनाला,
चिंता जीवास जाळता..

सरबत,पाणी वाळा,
सांगे आला हो उन्हाळा
रोज जगणेही भारी,
तब्येतीला? हो सांभाळा..


**ॲड.सुलभा गोगरकर,**
अमरावती

# बौद्धिक संपदाःनवसर्जनाचे संरक्षक छत्र

दरवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते.

'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते.

जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात.



आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.

आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे.

शैक्षणिक क्षेत्रात बौद्धिक संपदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोन्मेषाची वृत्ती विकसित होते. तसेच, संशोधनातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षांचे संरक्षण करून त्यांचा समाजहितासाठी उपयोग केला जाऊ शकतो. विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत पेटंट्स, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.

जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# बँकांनी उद्योगांना कर्जवाटप करताना सकारात्मक रहावे

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर -उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा गौरव

**अमरावती :** गाव पातळीवर उद्योग उभारताना आवश्यक असलेला पतपुरवठा बँकांनी करावा. यामुळे गावातही चांगले प्रक्रिया उद्योग उभे राहण्यास मदत मिळेल. त्यामुळे बँकांनी कर्जवाटप करताना उद्योगाप्रती सकारात्मक रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगामध्ये कर्ज मंजूरीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, जिल्हा उद्योग अधिकारी निलेश निकम, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे आदी उपस्थित होते.





जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी बँकांची निर्मिती ही छोट्या उद्योगांना पतपुरवठा करण्यासाठी झाली आहे. हा पतपुरवठा हा सामान्य नागरिकांनी बचतीच्या स्वरूपात गोळा केलेल्या पैशातून केला जातो. मोठ्या उद्योगाप्रती बँकांचे धोरण सकारात्मक असताना छोट्या उद्योगांनाही पतपुरवठा करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. गावातील प्रक्रिया उद्योगांना पतपुरवठा झाल्यास ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल. गेल्या वर्षी जिल्ह्याने प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांमध्ये राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. संपूर्ण जिल्ह्यात शासन सहाय्य करणाऱ्या योजनांची एक हजाराहून प्रकरणे बँकांकडे सादर केली आहे. यात महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. त्यामुळे सार्वजनिक आणि खासगी बँकांनी उद्योगांना मदत करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केलेल्या बँक व्यवस्थापकांचा सत्कार करण्यात आला. यात बँक ऑफ बडोदाचे प्रशांत गावंडे, लोहिता के.एस., जयदीप राठोड, बँक ऑफ इंडियाचे रणजीत ठाकरे, घनश्याम ढवळे, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रफुल शेंडे, प्रशांत चरडे, रुपेश नंदनवार, प्रफुल रसाळपायले, शिवशंकर फड, आलोक कोठेकर, मृणाल क्रांती राणा, कॅनरा बँकेच्या योगिता देशमुख, संदीप तेटे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अजित लिंगाटे, महेंद्र येलमे, नवनीत उमाळे, अमर दाभर्डे, संदीप सूर्यवंशी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सुदीप्ता घोष, जयंत मोरे, पंकज समर्थ, कमर सगीर, रिचा निमोणकर, मधुकर तळपदे, अभिनव राऊत, निधी अग्रवाल, युनियन बँक ऑफ इंडियाचे अक्षय सोनोने, तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापक नवीनकुमार उप्पलवार, मुख्य व्यवस्थापक रविकुमार दालु, ललित त्रिपाठी, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक महेश डांगे, प्रोसेसिंग हेड प्रवीण जंगम, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एलडीएम नरेश हेडाऊ, प्रादेशिक व्यवस्थापक सुनील पांडे, कॅनरा बँकेचे प्रादेशिक व्यवस्थापक रामबाबू मीना, बँक ऑफ बडोदाचे प्रादेशिक व्यवस्थापक राजेश कुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे जिल्हा समन्वयक अमोल मोरे यांचा स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# श्री हव्याप्र मंडळाच्या 'अमरावती धुरंधरांचा' पुण्यात जलवा

## बेस्ट रायफल शूटिंग टीमचा मान पटकावला : मंडळाचा वाढला गौरव

**अमरावती :** महाराष्ट्रात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या शूटिंग लीग ऑफ महाराष्ट्र स्पर्धेत श्री हव्याप्र मंडळाच्या 'अमरावती धुरंधर' या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत बेस्ट रायफल शूटिंग टीमचा मान पटकावला. १७, १८ व १९ मार्च दरम्यान पुणे येथील छत्रबुज नरसी स्कल येथे ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत राज्यातील एकूण १८ जिल्ह्यांच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात झालेल्या या स्पर्धेत अमरावतीच्या संघाने उत्कृष्ट अचूकता आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर विशेष छाप पाडली. 'अमरावती धुरंधर' संघाच्या विजयात प्रशिक्षक राहुल उगले व सहकारी प्रशिक्षक अभिषेक सिंघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विजयी रायफल शूटिंग टीममध्ये श्रावणी श्रीराव,






गोजिरी घाडगे, यश वेणी आणि सावी गुल्हाने या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. यापैकी गोजिरी घाडगे हिने विशेष कौशल्य दाखवत बेस्ट शूटिंग रायफल खेळाडू म्हणून मान मिळविला, ज्यामुळे अमरावतीच्या क्रीडाक्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

स्पर्धेत अमरावतीच्या पिस्टोल टीममध्ये टिया लोया, तनिष्का देशमुख, अलविन मानू आणि हर्ष बकाल यांनी सहभाग घेतला. या खेळाडूंनीही चांगली झुंज देत संघाची प्रतिष्ठा उंचावली. या स्पर्धेत 'सोबो जायन्ट, मुंबई' संघाने प्रथम क्रमांक मिळविला, तर पालघर व पुणे संघांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान पटकावले. 'अमरावती धुरंधर' संघाला बेस्ट रायफल शूटिंग टीम म्हणून गौरविण्यात आले असून त्यांना २५,००० रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशामुळे अमरावती जिल्ह्याच्या क्रीडाक्षेत्राला नवी ओळख मिळाली असून भविष्यातील स्पर्धांसाठी खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळाली आहे. श्री हव्याप्र मंडळाच्या शूटिंग विभागाच्या प्रशिक्षक व खेळाडूंच्या मेहनतीमुळे अमरावतीचे नाव राज्यस्तरावर झळकले आहे. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव विकास कोळेश्वर, सचिव रवींद्र खांडेकर यांच्यासह सर्व पदाधिकारी यांच्यातर्फे यशस्वी खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिक्षण क्षेत्रातील भ्रामक जाहिरातीवर आळा घालण्याची मागणी

## -तिवसा तहसीलदार यांच्या मार्फत शिक्षण उपसंचालक यांना ग्राहक पंचायतचे निवेदन

**तिवसा/प्रतिनिधी-** शिक्षण क्षेत्रात वाढत्या भ्रामक जाहिरातीमुळे विद्यार्थी व पालकांची अक्षरशः दिशाभूल करून आर्थिक लूट होत असल्याने या प्रकारावर कठोर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने २४ एप्रिल रोजी तिवसा तहसीलदार यांच्यामार्फत शिक्षण उपसंचालक यांच्याकडे एका निवेदनातून करण्यात आली.

शासनाने २५ डिसेंबर २०२५ रोजी काढलेल्या परिपत्रकांच्या अनुषंगाने भ्रामक जाहिराती व दिशाभूल करणाऱ्या शाळाविरोधात तातडीने कारवाइ करावी अशी आग्रही भूमिका अखिल भारतीय ग्राहक संघटनेने मांडली आहे. अनेक शैक्षणिक संस्था,इंग्लिश स्कुल या 'इंटरनॅशनल' 'ग्लोबल' किंवा 'सीबीएससी' पॅटर्न अशा आकर्षक शब्दांचा वापर करून पालकांची दिशाभूल करतात मात्र प्रत्यक्षात अशा संस्थांकडे संबंधित मान्यता नसल्याने अनेक वेळा समोर आले आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळ होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.त्यामुळे ग्राहक पालकांची शैक्षणिक व आर्थिक लूट होते.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने याबाबत आवाज उठविला असून राज्यात अनेक शाळा व खाजगी कोचिंग संस्था दिशाभूल करणाऱ्या जाहिराती करत आहे,त्याचप्रमाणे १००३ निकाल किंवा यशाची हमी देणाऱ्या जाहिराती मधून विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात फी वसूल केली जाते. भ्रामक नावाचा वापर करणाऱ्या शाळांची तात्काळ चौकशी करून मान्यता नसलेल्या संस्थांवर दंडात्मक कारवाई करावी, सर्व शाळांची अधिकृत माहिती सर्व पोर्टलवर उपलब्ध करणे किंवा कोचिंग क्लासेसच्या जाहिरातीवर नियंत्रण आणावे,याबाबत तक्रार नोंदविण्यासाठी सुलभ ऑनलाईन व हेल्पलाईन व्यवस्था करण्यात यावी,आदी मागण्यांबाबतचे निवेदन तिवसा तहसीलदार आशिष नागरे यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायत तिवसा तालुका यांच्या वतीने देण्यात आले. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तिवसा तालुकाध्यक्ष गुणवंत देवतारे,वैभव भोंबे,रावसाहेब बाखडे, भिमराव बारी,श्री घोंगे आदी उपस्थित होते.

# दर्यापूर पोस्ट ऑफिसमध्ये सुविधा वाढल्या पण इमारतीची दुरवस्था कायम, सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

**खल्लार -** दर्यापूर शहरातील मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये अलीकडील काळात विविध आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून नागरिकांना त्याचा मोठा फायदा होत आहे. पोस्टल सेवा, स्पीड पोस्ट, बचत खाते, मनी ट्रान्सफर यांसारख्या सुविधांमुळे व्यवहार अधिक सुलभ व जलद झाले आहेत. त्यामुळे पोस्ट ऑफिसकडे नागरिकांचा कल वाढला आहे. मात्र या सर्व सुविधा उपलब्ध असूनही पोस्ट ऑफिसची इमारत अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून दर्यापूर येथिल पोस्टाच्या इमारतीची दुरवस्था कायम असून भिंतींना तडे गेले आहेत, पावसाळ्यात छताला गळती होत असल्याने कर्मचारी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे रोज मोठ्या संख्येने नागरिक या पोस्ट ऑफिसमध्ये ये जा करत असतात. अशा परिस्थितीत इमारतीची जीर्ण अवस्था पाहता कोणतीही दुर्घटना घडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार पोस्ट ऑफिसमध्ये



सुविधा वाढविण्याबरोबरच इमारतीच्या दुरुस्तीवरही प्रशासनाने तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

संबंधित विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नविन इमारत उभारावी किंवा विद्यमान इमारतीचे नूतनीकरण करावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा भविष्यात मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दर्यापूर येथिल पोस्ट ऑफिस इमारतीबाबतचा विषय माझ्या स्तरावरून मांडण्यात आला असून अमरावती डिव्हिजनमध्ये यासंदर्भात चर्चा देखील झाली आहे. सध्या या कामाची प्रक्रिया सुरू आहे. नागरिकांच्या सोयी सुविधांचा विचार करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल?.

**-सुभाष थोरात**
पोस्ट मास्टर दर्यापूर

दर्यापूर येथिल पोस्ट ऑफिस हे नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे सेवा केंद्र आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या सुविधा अपुऱ्या ठरत आहे. त्यामुळे या पोस्ट ऑफिसचे आधुनिकीकरण करणे ही काळाची गरज बनली आहे.

नागरिकांना अधिक चांगल्या व जलद सेवा मिळाव्यात यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान, डिजिटल सेवा सुविधा तसेच पुरेशी भौतिक जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना सोयीस्कर वातावरण मिळणे गरजेचे आहे म्हणूनच प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत दर्यापूर येथे नवीन व सुसज्ज पोस्ट ऑफिस इमारत उभारण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे.

**-मंदाकिनी सुधाकर भारसाकळे**
नगराध्यक्षा,दर्यापूर

# अंजनगाव सुर्जी कृ.उ.बाजार समितीच्या हमालाचे काम बंद आंदोलन

## -हमालांच्या कामबंद आंदोलनाने शेतकरी भर उन्हात ताटकळले

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी** - अंजनगाव सुर्जी,येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ अपात्र घोषित झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी समितीच्या आवारात हमाल चक्कर येऊन पडल्यानंतर नेट लावण्याच्या मागणीसाठी हमालांच्या कामबंद आंदोलनामुळे खरेदी-विक्रीचे व्यवहार ठप्प झाले. भर उन्हात शेतकरी व खरेदीदारांना तासन् तास ताटकळत राहावे लागल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु व्यापाऱ्यांच्या मध्यस्थीने वाद निवळला.

शनिवारी दि.२५ रोजी अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीत गहू व धान्याचा आठवडी बाजार भरतो. यावेळी शेतकरी व व्यापाऱ्यांची मोठी गर्दी असते. दुपारी ११ वाजताच्या सुमारास यार्डात हमाली करणारे अब्दुल जुनैद अ.रशीद ( ३१) हा वाढत्या उन्हामुळे उष्माघाताच्या फटक्याने चक्कर येऊन



कोसळला. त्यांला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले.काही दिवसांपूर्वीच हमालांनी समितीकडे वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर यार्डात सावलीसाठी 'नेट' लावण्याची तोंडी मागणी केली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने आजच्या घटनेनंतर हमालांचा संताप अनावर झाला. 'नेट लावण्याचे लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय काम करणार नाही', असा पवित्रा घेत सर्व हमालांनी काम बंद करून कार्यालय गाठले.हमाल कार्यालयात पोहोचले असता समितीचे कार्यालयात एकही कायमस्वरुपी जबाबदार अधीकारी आढळला नाही. बाजार समितीत केवळ दोनच कायमस्वरूपी कर्मचारी असून प्रभारी सचिव सुटीवर होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा माल मोजमाप व भराईसाठी रखडला. भर उन्हात शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागला.

अखेर व्यापारी विजुभाऊ भांबुरकर, जगदीश शेळके, मो. सिद्दीक, संजय चोरे यांनी पुढाकार घेत हमालांची समजूत काढली. चर्चेअंती 'नेट न लावल्यास उद्यापासून सकाळी ८ ते ११ याच वेळेत हमालीचे काम होईल, त्यानंतर कोणताही हमाल काम करणार नाही', या अटीवर दुपारी अडीच वाजल्यानंतर हमालांनी रखडलेली मापे व माल भराईचे काम सुरू केले. व्यापाऱ्यांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे वाद विकोपाला जाण्यापासून बचावला.


संचालक मंडळ अपात्र झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने तातडीने अनुभवी प्रशासकाची नेमणूक करणे अपेक्षित होते.मात्र नियंत्रणाचे व प्रशासकाअभावी बाजार समितीचे कामकाज वाऱ्यावर असल्याचे या घटने स्पष्ट झाले आहे. कर्मचारी अपुरे असल्याने बाजार समितीच्या व्यवस्थापनाचे धिंडवडे निघाल्याची भावना शेतकरी व व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

# अल्पवयीन मुलीचा छळ; आई-सावत्र वडिलांवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका अल्पवयीन मुलीला तिच्या आई व सावत्र वडिलांनी निर्दयपणे मारहाण केली आणि हेअर कटरने तिच्या डोक्यावरील केस पूर्णपणे कापले. याप्रकरणात वरुड पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

पीडित मुलीने पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, ती घरी असताना तिची आई व सावत्र वडील तिची बदनामी करत शिवीगाळ करू लागले.

तसेच इतर मुलांसोबत तिचे अनैतिक संबंध असल्याचा आरोप करत तिला पोलिस ठाण्यात जाऊन त्या मुलांविरुद्ध खोटी तक्रार देण्यास भाग पाडले. मात्र, पीडितेने खोटे आरोप मान्य करण्यास नकार दिल्यानंतर दोन्ही आरोपी संतापले. त्यांनी



तिला तिच्याच खोलीत पट्ट्याने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता घरातील इलेक्ट्रिक हेअर कटरने तिचे डोके मुंडून तिचा अपमान केला. या अमानुष प्रकारामुळे मुलगी प्रचंड घाबरली असून तिने आपल्या आईसोबत राहण्यास स्पष्ट नकार दिला. वरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी तिला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. तेथे तिने कोणत्याही दबावाशिवाय घडलेला संपूर्ण प्रकार सांगितला. तिच्या सुरक्षेसाठी तिला शासकीय मुलींच्या वसतिगृहात ठेवण्यात आले आहे.

अमरावती बाल कल्याण समिती व महिला व बाल विकास विभागाच्या पत्रांनुसार वरुड पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# आ. पिंपळे 'टक्केवारी'त व्यस्त; मतदारसंघातील विकास ठप्प

## » वंचित बहुजन आघाडीचा आरोपांचा भडीमार » सभागृहाबाबत दिशाभूल केल्याचा गंभीर दावा

• अकोला | प्रतिनिधी •

मुर्तिजापूर मतदारसंघातील भाजप आमदार हरीश पिंपळे हे टक्केवारी आणि मालीदा लाटण्यातच गुंतले असून, मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांकडे त्यांनी पूर्णपणे पाठ फिरवली आहे, असा जोरदार आरोप वंचित बहुजन आघाडीने पत्रकार परिषदेत केला. गावागावांतून आमदारांविरोधात रोष उसळत असल्याचा दावा करत आघाडीने त्यांच्या कार्यपद्धतीवर कठोर टीका केली.



पत्रकार परिषदेत माजी जिल्हा परिषद गटनेते ज्ञानेश्वर सुलताने यांनी आमदारांवर निशाणा साधताना सांगितले की, "मतदारसंघात पाणीटंचाई, बेरोजगारी, रस्त्यांची दुरवस्था आणि शेतीचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असताना आमदारांना त्याचे भानही नाही. विकासकामांच्या नावाखाली केवळ टक्केवारी गोळा करण्यावर त्यांचा भर आहे."

यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेमार्फत उभारण्यात आलेल्या सभागृहाच्या मुद्द्यावरही आमदारांवर खोटारडेपणाचा आरोप केला. दि. २४ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ०८ हा ५३ सदस्यांच्या एकमताने मंजूर झाला होता. निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदाराने सभागृहाचे बांधकामही पूर्ण केले आहे. इतकेच नव्हे, तर निवडणूक प्रशिक्षणासाठी त्या सभागृहाचा वापर प्रशासनाने केला आहे. याबाबत अधिकृत अहवालही देण्यात आला आहे. तरीही आमदार पिंपळे हे सभागृह अस्तित्वात नसल्याचा दावा करून जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोप सुलताने यांनी केला.

अकोला जिल्हा कापूस उत्पादक असूनही प्रक्रिया उद्योगांचा अभाव असल्यामुळे बेरोजगारी वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले. बहुजन आणि मागासवर्गीय महिलांना रोजगार मिळावा, त्या स्वयंपूर्ण व्हाव्यात या उद्देशाने प्रत्येक तालुक्यात भव्य सभागृह उभारण्यात आले. मात्र महिलांचा विकासच होऊ नये, या




मानसिकतेतून आमदार हे प्रकल्प नाकारत आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

वंचित बहुजन आघाडीने पुढे इशारा देताना म्हटले की, आमदार पिंपळे यांचे भ्रष्टाचार आणि निष्क्रियतेचे पितळ आम्ही उघडे पाडल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. त्यांचे खरे स्वरूप जनतेसमोर आणण्यासाठी आघाडी आक्रमक भूमिका घेणार आहे. या पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष प्रमोद दैंडवे, महिला जिल्हाध्यक्ष आम्रपालीताई खंडारे, माजी जि. प. अध्यक्ष संगीताताई अढावू, संजय नाईक, किशोर जामणिक, विकास सदांशिव, नगरसेवक पराग गवई, नितेश किर्तक, दिलीप शिरसाट, शुक्लोधन डोंगरे यांची उपस्थिती होती.

# गोमाता सन्मान अभियानासाठी पातूरमध्ये पूर्व नियोजन बैठक संपन्न



• पातूर | प्रतिनिधी •

गोमातेला सन्मान मिळावा तसेच तिला राष्ट्रमातेचा दर्जा द्यावा या मागणीसाठी देशभर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पातूर येथे पूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली. संत श्री सिदाजी महाराज मंदिर सभागृहात आयोजित या बैठकीत गोमाता सन्मान अभियानाच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान आगामी कार्यक्रमाचे नियोजन, जनजागृती उपक्रम आणि आंदोलनाची दिशा यावर विचारविनिमय करण्यात आला. तसेच, कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली पूर्वपरवानगी मिळावी यासाठी पातूरचे तहसीलदार व ठाणेदार यांना निवेदनही देण्यात आले. या अभियानांतर्गत दि. २७ एप्रिल २०२६, सोमवार रोजी सकाळी ९ वाजता संत श्री सिदाजी महाराज सभा मंडप येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. बैठकीला संजुभाऊ यादव, संजय गाडगे, सचिनभाऊ बारोकार, नानासाहेब देशमुख, श्री श्री १०८ महंत गणेशानंदगिरी महाराज, श्री नवनाथ महाराज गोशाळा चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी, अनंता बगाडे

# खेट्रीत वरली मटका अड्ड्यावर एसडीपीओ पथकाची धाड

## ९ जणांविरुद्ध गुन्हा; ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त

• खेट्री | प्रतिनिधी •

पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील खेट्री येथे सुरू असलेल्या वरली मटका अड्ड्यावर एसडीपीओ पथकाने धाड टाकत मोठी कारवाई केली. या प्रकरणी ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सुमारे ६९ हजार ३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद मराठी शाळेच्या परिसरात काही दिवसांपासून वरली मटका अड्डा सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बाळापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने सापळा रचून २४ एप्रिल रोजी धाड टाकली. या कारवाईदरम्यान आठ आरोपींना रंगेहात पकडण्यात आले, तर एक आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाला.

ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून वरली मटका



साहित्य, पाच मोबाईल, रोख ८ हजार ३९० रुपये तसेच २५ हजार रुपये किंमतीची मोटारसायकल असा एकूण ६९ हजार ३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी विठ्ठल किसन पाचपोर, शेख सादिक शेख पिरन, सुभाष लक्ष्मण तिडके, मधुकर लक्ष्मण मते, महादेव पांडुरंग मेटांगे, इस्माईल खान रऊल्ला खान (रा. खेट्री) तसेच शिरपूर येथील शेख रफिक शेख रशीद, अमीर खान जमीर खान आणि शेख अनिस शेख राजू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अकोट पंचायत समितीची वार्षिक आमसभा संपन्न

• अकोट | प्रतिनिधी •

पंचायत समिती अकोट अंतर्गत सरपंच-उपसरपंच मेळावा तथा वार्षिक आमसभा आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी अकोट तालुक्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी तसेच विविध विभागांतील अधिकारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



## सरपंच-उपसरपंच मेळाव्यात विविध प्रश्नांवर चर्चा, उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा गौरव

आमसभेचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांनी केले. सभेला तहसीलदार सुनील चव्हाण, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेश खुमकर यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागांचा आढावा सादर केला. आढाव्यानंतर सरपंच व नागरिकांनी विविध समस्या मांडत लेखी निवेदने सादर केली. अनेक प्रश्नांचे निराकरण सभेमध्येच करण्यात आले. आमदार भारसाकळे यांनी जनतेच्या अडचणींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच चांगले कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी शासन कायम उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन सावरकर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन विस्तार अधिकारी (पं.) मदनसिंग बहुरे, दिपाली महल्ले व कृषी विस्तार अधिकारी प्रमोद महल्ले यांनी केले.


### जाहिर नोटीस

**वि. ०४थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ९७/२०२६ — प्रोसेस नं. : ९६०/२०२६
चौ. ता.: २७/०२/२०२६ — दिनांक: २१/०१/२०२६

**अर्जदार** : - १. सुनंदा राजकुमार गुप्ता, २. रोहीत राजकुमार गुप्ता, दोघेही रा. गिताई अपार्टमेंट, ४०१, बिरला कॉलनी, गेट नं. २, अकोला. ता. जि. अकोला.

.. विरूध्द ..

**गैरअर्जदार :- निल**
**मयताचा पत्ता :- मयत :- राजकुमार पुष्करराज गुप्ता**
**पत्ता :- रा. गिताई अपार्टमेंट, ४०१, बिरला कॉलनी, गेट नं. २, अकोला. ता. जि. अकोला.**

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजकुमार पुष्करराज गुप्ता यांचे दि. ०९/०९/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला


# महानगरात बुधवारी होणार राज्यस्तरीय अशोक पर्व महोत्सव

## • बहुजन ऐक्याचा भव्य संगम, मोठ्या संख्येने सहभागी व्हा : डॉ संतोष हुशे

• अकोला| प्रतिनिधी •

सम्राट अशोक यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही महानगरात राज्यस्तरीय 'अशोक पर्व महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून यात अनेक पुरोगामी संस्था संघटना व बहुजन समाज सहभागी होणार असल्याची माहिती

अशोक पर्व महोत्सवाचे अध्यक्ष डॉ संतोष हुशे यांनी शनिवारी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. सम्राट अशोक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा विजय आठवले, प्रा. डॉ.बाळकृष्ण खंडारे, प्रा. सुनील कांबळे, प्रा. शैलेश इंगळे, अनिल गवई, विद्याधर मोहोड आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या एक दिवसीय महोत्सवाची रूपरेषा मांडण्यात आली.बुधवार दि 29 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता स्थानिक आबासाहेब खेडकर सभागृह, रामदास पेठ येथे हा भव्य महोत्सव प्रारंभ होणार आहे.

यावर्षी महोत्सवाचे अध्यक्ष स्थान जेष्ठ ओबीसी नेते प्रा डॉ. संतोष हुशे भूषविणार असून उद्घाटक म्हणून मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. रणजीत कोरडे राहणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती येथील खा बळवंत वानखडे, शेतकरी नेते प्रकाश पोहरे, आ धीरज लिंगाडे,जि प च्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम,आ सिद्धार्थ खरात, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष अँड महेश गणगणे,काँगेस जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, सिनेट सदस्य डॉ. संतोष बनसोड, समवेत विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि



प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून या माध्यमातून सामाजिक एकात्मता व बहुजन ऐक्याचा नवा प्रयोग साकारला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.


### जाहिर नोटीस

**वि. ०५वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ६०१/२०२६ — प्रोसेस नं. : ५५४५/२०२६
चौ. ता.: १७/०६/२०२६ — दिनांक : २३/०४/२०२६

**अर्जदार** : - १. नकीबुद्दीन काझी सैय्यद इसामोधीन, २. आहतेशमुद्दीन काझी सैय्यद हिसामूद्दीन, ३. सय्यदा कौसर काझी सैय्यद इसामुद्दीन, ४. सिधिक कौसर काझी सैय्यद इसामुद्दीन, सर्व रा. अगरबेस परचुरे कंट्रोल च्या दुकानासमोर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

.. विरूध्द ..

**अर्जदार :- गैरअर्जदार :- निल**
**मयताचा पत्ता :- मयत :- निखत फातेमा इसामोधिन उर्फ फातेमा बी इसामोद्दीन**
**पत्ता :- रा. अगरबेस परचुरे कंट्रोल च्या दुकानासमोर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.**

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निखत फातेमा इसामोद्दिन उर्फ फातेमा बी इसामोद्दीन यांचे दि. ०२/१०/२०१९ रोजी अगरबेस, परचुरे कंट्रोल च्या दुकानासमोर, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला


# अधिक मासानिमित्त श्री विठ्ठल मंदिरात भागवत कथा सप्ताह

## २४ ते ३१ मे दरम्यान धार्मिक सोहळा; सुजित महाराज देशमुख यांच्या अमृतवाणीतून कथामृत

• अकोला | प्रतिनिधी •

अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासानिमित्त शहरातील जुने शहर परिसरातील पुरातन श्री विठ्ठल मंदिर येथे भव्य भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २४ मे ते ३१ मे या कालावधीत हा धार्मिक सोहळा पार पडणार असून, ह. भ. प. श्री सुजित महाराज देशमुख यांच्या अमृतवाणीतून भाविकांना भागवत कथाश्रवणाचा लाभ मिळणार आहे.



अधिक मास हा चार वर्षांतून एकदा येणारा पवित्र कालखंड मानला जातो. या महिन्यात धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व असते. त्या पार्श्वभूमीवर मंदिरात आयोजित कथा सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

या सप्ताहाची सुरुवात भव्य शोभायात्रेने करण्याचा आयोजकांचा मानस आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून नियोजनाला वेग आला आहे.

या भागवत कथा सप्ताहात शहरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन श्री विठ्ठल मंदिर अखंड हरिनाम सप्ताह मंडळाचे सर्वसेवाधिकारी कृष्णा गोवर्धन शर्मा व व्यवस्थापक रमेश अलकरी यांनी केले आहे.

# मुंडगाव उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना निरोप

• अकोट | प्रतिनिधी •

अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील जिल्हा परिषद उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी भावनिक वातावरणात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम केवळ शैक्षणिक टप्प्याच्या समाप्तीपुरता मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या आठवणी, प्रेम आणि आपुलकीने भरलेला ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुरआन पठणाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कविता, लघुसंवाद आणि मनोगतांद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या. "माझ्या खोड्या कमी होणार नाहीत, फक्त शाळा बदलेल" या निरागस वाक्याने उपस्थितांच्या चेहऱ्यावर



हास्याबरोबरच हलकीशी उदासीही उमटली.

यावेळी मुख्याध्यापक जनाब मोहम्मद शफीक, सय्यद एजाज अली, सय्यद आसिम अली, अन्सार अहमद, मो. जावेद, असिफ खान, वासिक अली यांच्यासह प्रमुख पाहुणे कारी मोहम्मद साजिद, इबाद खान, उर्दू संघटनेचे तालुका अध्यक्ष साजिद खान, निवृत्त मुख्याध्यापक मोहम्मद अमीर, ए. डी. एल. सर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमानंतर सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी एकत्र येत आनंदाने भोजनाचा आस्वाद घेतला आणि निरोप समारंभाचा सुंदर समारोप झाला. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १४२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# सावरगावात श्रीमद् भागवत कथेची भावपूर्ण सांगता

## शेकडो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ; गावात भक्तीमय वातावरण

• खेट्री | प्रतिनिधी •

पातूर तालुक्यातील सावरगाव येथे दुर्गा माता परिसरात आयोजित श्रीमद् भागवत कथेची भावपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण गावात भक्तिचा दरवळ निर्माण झाला होता.

कथेदरम्यान कथाकारांनी भागवत धर्म, भक्ती, सदाचार यांचे महत्त्व प्रभावी शब्दांत पटवून देत उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. सात दिवसांच्या या सोहळ्यात कीर्तन, भजन आणि हरिनामाच्या गजराने वातावरण



भारावून गेले होते.

सांगता कार्यक्रमाच्या दिवशी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. कार्यक्रमाच्या समारोपानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन सावरगाव येथील समस्थ पंचमंडळाच्या वतीने करण्यात आले होते. आयोजकांनी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडत भाविकांसाठी उत्तम व्यवस्था केली. या धार्मिक सोहळ्यामुळे गावात एकात्मता आणि श्रद्धेची भावना अधिक दृढ झाल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल भाविकांनी आयोजकांचे आभार मानले.

# किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांना राज्य पुरस्कार




• पातूर | प्रतिनिधी •

महाराष्ट्र राज्य भारत स्काउटस आणि गाईडस राज्य संस्था मुंबई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या राज्य पुरस्कार चाचणीमध्ये पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. राज्यपाल यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव होणार आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारासाठी चाचणी परीक्षा घेण्यात येत असते नुकतीच ही परीक्षा पार पडली असून यामध्ये पातुर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या तन्मय माहोकार आणि रुद्रेश पवार या दोन स्काउटनी सहभाग घेतला होता. या परीक्षेत किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या तन्मय माहोकर,रुद्रेश पवार या विद्यार्थांनी प्रविण्य मिळवत बाजी मारली.

# स्पीड ब्रेकरचा धक्का... आणि रुग्णाने उघडले डोळे

## घरी नेताना घडला थरार; नातेवाईकांच्या डोळ्यात आनंदाश्रू

**वर्धा/जनमाध्यम**

यवतमाळ जिल्ह्यातील पहूर येथील ३७ वर्षीय अरविंद लांबाडे यांनी उंदीर मारण्याचे औषध सेवन केल्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर झाली. त्यांना उपचारासाठी वर्धा जिल्ह्यातील सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगत डॉक्टरांनी पुढील उपचारांची शक्यता कमी असल्याने रुग्णाला घरी घेऊन जाण्याचा सल्ला नातेवाईकांना दिला.

नातेवाईकांनी हा सल्ला मान्य करून अरविंद यांना ॲम्बुलन्सने गावाकडे रवाना केले. मात्र, यावलीजवळील रस्त्यावर स्पीड ब्रेकरवरून जाताना ॲम्बुलन्सला जोरदार धक्का बसला. या धक्क्यानंतर अरविंद यांच्या हातापायात हालचाल जाणवू लागली. काही क्षणांत त्यांनी डोळेही उघडले. हा प्रकार पाहून ॲम्बुलन्समधील नातेवाईक स्तब्ध झाले; दु:खाचे वातावरण क्षणात आनंदात बदलले. तत्काळ अरविंद यांना यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

त्यांची प्रकृती अद्याप चिंताजनक असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात आश्चर्य व्यक्त होत असून 'जाको राखे साईंया, मार सके न कोय' अशी भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

# चौकातील बाकावर खासदार 'रस्त्यावर रंगल्या गोष्टी
# लोकशाहीला मिळाली माणूसकीची उब

**रवींद्र लाखे**

राजकारण म्हणजे केवळ स्टेज, भाषणं आणि घोषणांचा गजर ही पारंपरिक चौकट शुक्रवारी रात्री वर्ध्यात अक्षरशः तुटताना दिसली. धुनिवाले मठ परिसरातील चौकात एका साध्या बाकावर बसून खा.अमर काळे यांनी नागरिकांशी रंगवलेल्या गप्पांनी 'रस्त्यावरची लोकशाही' जिवंत करून दाखवली.

हा बाकही काही साधासुधा नाही, स्थानिक पातळीवर लोकांसाठी उभा केलेला, आ,पंकज भोयर यांनी लावलेला. त्याच बाकावर खासदार बसले आणि काही क्षणांतच चौक गजबजून गेला. कुठेही माईक नाही, स्टेज नाही, कोणतीही दिखाऊ व्यवस्था नाही, फक्त माणसं आणि त्यांच्यात मिसळलेला एक लोकप्रतिनिधी, नेता आमच्यातलाच आहे, ही भावना नागरिकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटली होती. गप्पांचा ओघ सुरू झाला, कोणी रस्त्यांच्या प्रश्नांवर बोललं, कोणी पाण्याच्या अडचणी मांडल्या, तर काहींनी गावाकडच्या बोलीत हलक्या-फुलक्या गप्पा रंगवल्या. खा,अमर काळे यांनीही कुठलाही दुरावा न ठेवता प्रत्येकाशी संवाद साधला. मध्येच एखादा विनोद,



एखादं खळखळून हसू या सगळ्यामुळे वातावरणात आपुलकीची चादर पसरली.

पण या साध्या प्रसंगातही एक धारदार संदेश दडलेला होता. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित राहू नये ती रोजच्या आयुष्यात, अशा चौकात, अशा बाकावर जिवंत राहायला हवी हीच जणू या भेटीची खरी 'घोषणा' ठरली.आजच्या काळात अनेक नेते जनतेपासून दूर, एसी खोल्यांमध्ये आणि सुरक्षेच्या कवचात अडकलेले दिसतात. अशा वेळी रस्त्यावर येऊन लोकांमध्ये मिसळणारा नेता दुर्मीळच आणि म्हणूनच वर्ध्यातील हा प्रसंग केवळ 'गप्पांचा कार्यक्रम' नव्हता, तर तो एक सडेतोड उत्तर होतं, त्या दूरावलेल्या सत्ताधाऱ्यांना, जे जनतेच्या नजरेला नजर देण्यासही कचरतात.या बाकावर रंगलेल्या गोष्टींनी एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली नेतृत्व हे खुर्चीतून नाही, तर लोकांच्या हृदयातून घडतं.वर्धेकरांसाठी हा क्षण केवळ आठवण नव्हता; तो विश्वासाचा पुनर्जन्म होता. आणि अशा क्षणांतूनच खऱ्या अर्थाने विकासाची बीजं रोवली जातात, हे नाकारता येणार नाही.

## संक्षिप्त

### आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**वर्धा-** राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण व शहरी भागात नागरीकांपर्यंत शासकीय, निमशासकीय व खाजगी सेवा पोहोचविण्यासाठी तसेच सदर सेवेकरीता नागरिकांचा वेळ व श्रम वाचविण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यात १३० सेवा केंद्र सुरु करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. यासाठी इच्छुक अर्जदारांनी ३ मेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. आपले सेवा केंद्र सुरु करणाऱ्या इच्छुकांनी Wardha.Gov.in या वेबसाईटवर https://docs.google.com /forms/d/e / 1FAIpQLSfWReJ6nOjdZZbBa UTNW V8W roEQ bo 1 Mz0a5NfpJ _W8OL-FHzg / view form?usp=header ही लिंकवर अर्ज ऑनलाईन पध्दतीने ३ मे पर्यंत दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करावा. आपले सरकार सेवा केंद्राबाबत अटी व शर्ती तसेच रिक्त असलेल्या केंद्राची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

### भोवळ येऊन पडल्याने वृद्धेचा मृत्यू

**हिंगणघाट-**इंझाळा फाट्याजवळ दुचाकीवरून जात असताना



अचानक भोवळ आल्याने खाली पडून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शोभा वाटे (६५, रा. झाडगाव, जि. यवतमाळ) या मुलगा नितीन वाटे याच्यासोबत दुचाकीने हिंगणघाटकडे येत होत्या. दरम्यान, प्रवासादरम्यान त्यांना अचानक भोवळ आली आणि त्या दुचाकीवरून खाली पडल्या. यात त्यांना गंभीर दुखापत झाली. तातडीने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संबंधित प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### बापलेकाकडून इसमास मारहाण

**वर्धा-**आष्टा येथील आठवडी बाजार परिसरात किरकोळ



कारणावरून झालेल्या वादातून एका इसमास विळा व हातोड्याने मारहाण करण्यात आली. आकाश गाडगे (३३) हा बाजारातून जात असताना शंकर शेंडे याच्यासोबत वाद झाला. वाद वाढताच शंकर शेंडे व त्याचे वडील कवडू शेंडे यांनी मिळून गाडगे याच्यावर हल्ला चढविला. विळा व हातोड्याने केलेल्या मारहाणीत आकाश गाडगे जखमी झाला. परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तक्रारीवरून दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. किरकोळ कारणातून वाढणाऱ्या हिंसाचारामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

# मंगळवारी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि पांडूरंग सदाशिव खानखोजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने २८ एप्रिल रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



२८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आयोजित रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील नामवंत कंपन्या सहभागी होणार असून यामध्ये प्रामुख्याने मॅकवेल इंजिनिअरींग कंपनी पुणे, यांच्याकडे फक्त पुरुष उमेदवारांसाठी आयटीआय धारक फिटर, ईलेक्ट्रीशियन, वेल्डर, ड्रॉप्समन अभ्यासक्रम धारण केलेल्या उमेदवारांची भरती प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. उमेदवारांना १८ हजार रुपये मासिक वेतन असून इन्सेंटीव्ह राहणार आहे. सत्या मायक्रीकॅपीला कंपनीकडे असलेल्या ४० रिक्त पदासाठी २० हजार रुपये वेतन राहणार आहे. तसेच सहयोग मल्टीस्टेट बँकेकडे असलेली ३० रिक्क पदे भरण्यात येणार आहे. रोजगार मेळाव्यात प्रधानमंत्री इंटरशीप योजनेबाबत माहिती देण्यात येणार आहे.मेळाव्यात एचएससी पास, पदवी व आयटीआय पास उमेदवारांकरीता एकुण ३७० रिक्त पदासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी उमेदवारांचे वय १८ ते ४० वर्ष असावे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी मुळ शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रासह मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

# सीबीएसई दहावीत ईश्वरी दौडचे यश



**वर्धा-**येथील धंतोली परिसरातील ईश्वरी श्रीकांत दौड हिने सीबीएसई माध्यमाच्या दहावी परीक्षेत ८९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. ती न्यू इंग्लिश हायस्कूलची विद्यार्थीनी असून तिने संस्कृत विषयात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यही मिळविले आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेत आयोजित कार्यक्रमात तिचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात वर्धा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अनिल कठाने, प्राचार्य डॉ. देवेंद्र गुजरकर व प्राचार्य अंजली गावंडे यांच्या हस्ते तिला प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. ईश्वरीने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय व गुरुजनांना दिले. तिच्या या कामगिरीमुळे परिसरात सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

# दोन सख्ख्या भावांना विजेचा जबर झटका

**हिंगणघाट/जनमाध्यम**

शहरातील शास्त्री वॉर्डमध्ये कबूतर उडवण्याच्या प्रयत्नात दोन सख्ख्या भावांना विजेचा जबर धक्का बसून ते गंभीर भाजल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून निष्काळजीपणाची मोठी किंमत चिमुकल्यांना चुकवावी लागली.जीवन श्याम कात्रे (वय १४) आणि गणेश श्याम कात्रे (वय १०) अशी जखमींची नावे आहेत. वडील श्याम कात्रे हे शिवाजी मार्केट यार्डमध्ये हमाली करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई स्वाती कात्रे गृहिणी आहेत. गुरुवारी दुपारी दोघे भाऊ नेहमीप्रमाणे घराच्या आवारात खेळत होते. यावेळी त्यांच्या नजरेस विद्युत तारेवर बसलेले कबूतर पडले. ते उडवण्याच्या हेतूने त्यांनी लोखंडी पाइप उचलला. पण हा खेळ क्षणात जीवघेणा ठरला.लोखंडी पाइप थेट जिवंत विद्युत तारेच्या संपर्कात येताच जीवन याला जोरदार करंट बसला. भावाला वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या गणेशलाही विजेचा धक्का बसला. काही क्षणांत दोघेही वेदनेने तडफडत जमिनीवर कोसळले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी दोघांनाही तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

विद्युत तारा इतक्या सहजपणे उपलब्ध आणि असुरक्षित स्थितीत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लहान मुलांच्या हातात लोखंडी वस्तू आणि उघड्यावर असलेल्या विद्युत आहे हा धोकादायक संगम जीवावर बेतू शकतो, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# 'एल-निनो' च्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाचे पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी नियोजन अंमलबजावणीचे निर्देश

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात वाढत्या तापमानाची शक्यता व उष्णलहरींचा धोका लक्षात घेता पशुसंवर्धन विभागाने सर्व पशुवैद्यकिय दवाखान्यांना सतर्क राहून पशुधनामध्ये उष्माघाताची काळजी घेण्याविषयी मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. पशुधनामध्ये उष्माघाताची लक्षणे उदा. धापा टाकणे, तोंडावाटे लाळ गाळणे, अस्वस्थता, ई. दिसून आल्यास तात्काळ सावलीत व थंड ठिकाणी हलवावे. पशुधनावर थंड पाण्याचा मारा करावा तसेच जवळच्या पशुवैद्यकिय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तातडीच्या सेवेकरिता फिरते पशुवैद्यकिय पथके तैनात ठेवण्यात आली आहेत (त्याकरिता १९६२ या कॉल सेंटर क्रमांकयर संपर्क साधावा), पशुसंवर्धन विभागाने जिल्हा प्रशासन, अशासकिय संस्था तसेच सामाजिक सेवाभावी संस्थांना आवाहन केले आहे की, रस्त्यावरील पशु-पक्ष्यांसाठी घराबाहेर किंवा सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाण्याची भांडी किंवा हौद ठेवावे.'एल-निनों' च्या संकटकाळात पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे. चारा व्यवस्थापन व पशुधनाच्या आरोग्याबाबत कोणत्याही मदतीसाठी स्थानिक पशुवैद्यकिय दवाखान्याशी संपर्क साधाया तसेच १९६२ कॉल सेंटर च्या माध्यमातून पशुसंवर्धन विषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे, याचा पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. जगदीश बुकतरे, यांनी कळविले आहे.

## वृद्धेची आत्महत्या

**हिंगणघाट-**शहरातील बिडकर वॉर्ड येथे राहणाऱ्या एका वृद्ध महिलेन आजारपणाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. लिला ढगे (६४) या काही दिवसांपासून आजारी होत्या. आजारामुळे त्रस्त झाल्याने त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले, अशी माहिती पोलिसांनी दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.

# वनआगीत कुरण विकास रोपवन भस्मसात

**आष्टी (शहीद)/ जनमाध्यम**

आष्टी-वरुड राष्ट्रीय महामार्गालगत पांढुर्णा परिसरातील प्रादेशिक वनविभागाच्या सहवन व नियतक्षेत्रात भीषण आग लागून सुमारे १० हेक्टर जंगल क्षेत्र जळून खाक झाले. शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेले गवत लागवड व कुरण विकास रोपवन या आगीत पूर्णतः भस्मसात झाले.

वनविभागाच्या कक्ष क्रमांक ३८/१ अंतर्गत संरक्षित क्षेत्र योजनेत २०२४-२५ पासून मोठ्या खर्चातून ट्रॅक्टरने नांगरणी करून गवत लागवड करण्यात आली होती. मात्र, आग लागल्यास नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याचे समोर आले आहे. जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे आग लागल्यानंतरही वनविभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले नसल्याची माहिती मिळत आहे. या आगीत मोठ्या प्रमाणात वनसंपदा नष्ट झाली असून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या घटनेची वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# तीर्थदर्शन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

जेष्ठ नागरिकांना देशातील विविध तीर्थ स्थळांना भेटी देऊन दर्शन घेता यावे, यासाठी राज्य शासनाने तीर्थ दर्शन योजना सुरु केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र जेष्ठ नागरिकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.जेष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थ स्थळांना जाऊन मन:शांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मातील ६० किंवा त्यापेक्षा आधिक वयाच्या जेष्ठ नागरिकांसाठी ही योजना राबविली जात आहे. योजनेंतर्गत राज्य आणि भारतातील तीर्थ क्षेत्रांना मोफत भेट व दर्शनाची संधी उपलब्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील ६० वर्ष वय व त्यावरील जेष्ठ नागरिक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहील. लाभार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा. लाभार्थी कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजारापेक्षा जास्त नसावे. योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयास ऑफलाईन अर्ज सादर करावा.अर्जासोबत आधार कार्ड, रेशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचे १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला यापैकी एक कोणतेही प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला किंवा पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड प्रवासाला जाण्यापुर्वी १५ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक राहील. पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकांचा मोबाईल क्रमांक व योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र अर्जासोबत सादर करावे, असे समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

## मध्यभारतातील रुग्णांना मिळणार अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी व सुपर स्पेशलिटी सुविधा

# डॉ. आबाजी थत्ते सेवा व अनुसंधान संस्थेचा महत्त्वकांक्षी प्रकल्प

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते भूमिपूजन

**नागपूर/जनमाध्यम**

जागतिक दर्जाच्या व अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा असलेले सुसज्ज अशा ४६१ बेडची सुविधा असलेल्या नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट या मध्य भारतातील अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे भूमिपूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते आज एका विशेष समारंभात झाले.

धरमपेठ येथील नॉर्थ अंबाझरी मार्गावरील डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्थेच्या वतीने हा वैद्यकीय प्रकल्प सुरू होत आहे. या प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर श्रीमती नीता ठाकरे, माजी सरकार्यवाहक भैय्याजी जोशी संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, उपाध्यक्ष अजय संचेती, सचिव शैलेश जोगळेकर, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर आदी यावेळी उपस्थित होते. नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट ही मध्य भारतातील सर्वात मोठी आणि अत्याधुनिक मल्टी स्पेशलिटी व सुपर स्पेशलिटी संस्था म्हणून सुरू होत असून २३ मजली सुसज्ज इमारत असलेल्या या हॉस्पिटलमध्ये हेलिपॅड ची सुविधा असून एअर ॲम्बुलन्स सुद्धा




उपलब्ध होणार आहे. अत्याधुनिक उपचारांच्या सुविधांसोबतच अवयव प्रत्यार्पण व बर्न वॉर्ड राहणार असून ४६१ बेडची सुविधा तसेच रुग्णांच्या सुविधेसाठी अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी यावेळी सांगितले. अवयव प्रत्यारोपण सुविधेवर विशेष भर दिला जाणार आहे. सिंगापूरच्या एस के या जागतिक दर्जाच्या वास्तू विशारद संस्थेतर्फे हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे येथे मेडिकल प्लॅनिंग आर्किटेक ला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. नॅशनल हेल्थकेअर इन्स्टिट्यूट सुमारे पाच लाख चौरस फूट क्षेत्रावर उभारले जाणार असून नागपूर परिसर तसेच मध्य भारतातील रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन या प्रकल्पाची संकल्पना करण्यात आली आहे. येथे मल्टीस्पेशालिटी तसेच सुपर स्पेशलिटी अंतर्गत जेरियाट्रिक रूमेट्रोलॉजी, हृदय व रक्तवाहिन्या, न्यूरोलॉजी, नेफ्रॉलॉजी, युरोलॉजी, क्रीडा वैद्यक प्लास्टिक व पुनर्रचना आदी सुविधा राहणार आहेत. या संस्थेमध्ये पदव्युत्तर व सुपर स्पेशलिटी अभ्यासक्रमासाठी पूर्ण सुसज्ज शैक्षणिक सुविधा असतील अशी माहिती संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी दिली.

प्रारंभी नॅशनल हेल्थकेअर इन्स्टिट्यूट या संस्थेचे भूमिपूजन सर संघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते झाले. त्यानंतर प्रस्तावित इमारतीच्या प्रतिरूप तसेच कोणशिलेचे अनावर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, सचिव शैलेश जोगळेकर व कोषाध्यक्ष आनंद औरंगाबाद यांनी केले. या कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील तसेच विशेष निमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन मेघा दीक्षित यांनी केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १४९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### दोन दिवसात दोन नेत्रदान



स्व. श्री. मेहूल हरीश धरमशी — स्व. श्रीमती मीनाक्षी एकनाथ राऊत

**अमरावती-** अमरावती व पुणे येथील रहिवासी स्व. मेहूल हरीश धरमशी व स्व. मीनाक्षी एकनाथ राऊत यांचे नुकतेच निधन झाले. दोन्ही परिवारावर सुद्धा दुःखाचा डोंगर कोसळला परंतु अशाही परिस्थितीत गरजूंना या जगातील रंग पाहता येतील या उद्दात भावनेने धरमशी परिवार व राऊत परिवाराच्या सदस्यांनी स्व. मेहूल हरीश धरमशी व स्व. मीनाक्षी एकनाथ राऊत यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा एजुकेशन फाउंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला संपर्क केला. दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे डेप्युटी मेडिकल डायरेक्टर डॉ. अंकित हरवानी, हिमांशू बंड,अनिल देशमुख यांनी मरणोतर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.धरमशी व राऊत परीवाराला नेत्रदान केल्या बद्दल मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नेत्रदानाचे प्रमाणपत्र देण्यात आले. या सेवाभावी कार्यात राऊत परिवाराचे विशाल राऊत, गीता गवई,अविनाश साकुंडे, आशुतोष खाडे व धरमशी परिवाराचे रजनी धरमशी, खुश धरमशी, प्रमिला राऊत व दोन्ही परिवारातील इतर सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.नेत्रदानासाठी संपर्कः ७३७८६५६१४५ । ७३७८६५६१४४ । ९८९९८९८६६७ करावा.



### 'आओ गाव चले अभियान' अंतर्गत तपासणी व उपचार

**अंजनगाव बारी-** प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी अंतर्गत उपकेंद्र पोहरा येथे इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावती यांच्या 'आओ गाव चले अभियान' अंतर्गत भव्य आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. आयुष्यमान आरोग्य मंदिर पोहरा, प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी व हायटेक मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले.शिबिरात एकूण १०१ लाभार्थ्यांनी विविध आजारांवर मोफत तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. हृदयरोग, अस्थिरोग, बालरोग, स्त्रीरोग, मानसिक आजार, शल्यरोग व चर्मरोग अशा विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून मार्गदर्शन केले उपक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. रिंकुंजय केचे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अभिजीत देशमुख, डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. स्वप्नील शिरभाते, डॉ. विजय कुथे, डॉ. मंदार आंबेकर, डॉ. अनिकेत पोटे, डॉ. रोहन बोबडे, डॉ. संदीप दामखेडे, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. मीनल देशमुख, डॉ. मोनाली कळंबे, डॉ. आशिष डगवार, डॉ. मुकुंद गुजरकर व डॉ. अंशू चांडक आदी डॉक्टरांनी सेवा दिली. पोहरा व भानखेडा येथील डॉ. मंगेश पाटील, डॉ. विवेक चोपडे, आरोग्य सहाय्यक अशोक पोकळे, आरोग्य सेविका पद्मा जाधव, विशाखा देवपारे, रक्षा टाले, आरोग्य सेवक स्वप्निल राऊत, शाहरुख शेख तसेच महालॅबचे आकाश खडसे यांनी रक्त तपासणीसाठी सहकार्य केले.सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत पोहरा येथील सरपंच इंदुताई जवंजाळ, बाळूभाऊ जवंजाळ, ग्रामसेवक पंडित, राजूभाऊ तसेच स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### स्व. सोमेश्वर पुसतकर स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान शिबीर

**अमरावती-** स्थानिक आझाद हिंद मंडळ, बुधवारा यांच्या वतीने मंडळाचे ज्येष्ठ सदस्य, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख तथा विदर्भातील ख्यातनाम सामाजिक कार्यकर्ते स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.१ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत स्व. हरीभाऊ कालोती स्मारक येथे पार पडणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाचे कार्याध्यक्ष तथा माजी महापौर विलास इंगोले यांनी केले आहे.शिबिरास मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर सदिच्छा भेट देणार आहेत. नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## उन्हाची लाट असतानाही

# सकाळच्या सत्रात शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यास नकार

## शिक्षण विभागाचा हेकाखोरपणा,शिक्षक संघटनेत नाराजी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती वतीने २६ एप्रिलची शिष्यवृत्ती परीक्षा सकाळच्या सत्रात घेण्यात यावी याबाबतचे निवेदन व्हॉट्सअप द्वारे व ईमेल द्वारे डॉक्टर नंदकुमार बेडसे (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद) व आयुक्त महेश चौथे (आयुक्त परीक्षा परिषद) यांना पाठविले होते.पण शिक्षण परिषदेने ही मागणी नाकारली असून रविवारला तापत्या उन्हात चिमुकले विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देणार आहे.शिक्षण विभागाच्या अश्या हेकाखोरीचा शिक्षक संघटना यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.



परीक्षा परिषद पुणे व्दारा ४ थी व ७वीची शिष्यवृत्ती परीक्षा येत्या रविवार २६एप्रिलला भर उन्हात पहीला पेपर ११ते१२.३० व दुसरा पेपर दुपारी २ते ३.३०या वेळे घेण्याचे नियोजीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात उष्ण उन्हाची लाट आहे.जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती पाहली तर कित्येक वर्ग खोल्या टिनाच्या पत्राच्या आह. वर्गात फॉन नाही,असले तर लाईन नाही.ग्रामिण भागात तिव्र पाणीटंचाई आहे.विद्यार्थांच्या आरोग्याचा विचार करता ही परीक्षा सकाळ पाळीत घेण्याची मागणी पालक,शिक्षक,शिक्षक संघटना यांनी केली होती.दुपारच्या वेळेत परीक्षा देताना विद्यार्थ्यांवर उष्णतेचा / उष्माघाताचा विपरीत परिणाम होऊन त्यांची एकाग्रता व मानसिक स्थिती ढासळण्याची शक्यता आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. म्हणून सदर परीक्षा त्याच दिवशी घेण्यात यावी, मात्र तिचे वेळापत्रक सकाळच्या वेळेत ठेवण्यात यावे,परीक्षेची वेळपहिला पेपर : सकाळी ८.३० ते १०.००,दुसरा पेपर : सकाळी १०.३० ते १२.०० विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून याबाबत योग्य ती कार्यवाही करावी,अशी विनंती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद आयुक्त पुणे यांच्या कडे केली होती.पण शिक्षण परीक्षा संचालनालय यांनी मागणी मान्य केली नाही.

# अल्पभूधारक राऊत कुटूंबातील दोन बंधू झाले डॉक्टर

**अंजनगाव सुर्जा/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील छोट्याशा वडनेर भूजंग गावातील अल्पभूधारक शेतकरी राऊत कुटुंब राहतात. या कुटुंबातील दोन मुलं डॉक्टर होण्यात यशस्वी झाले तर दोन मुलांचे प्रयत्न चालू आहे. दोन वर्षांपूर्वी रविंद्र राऊत यांच्या मुलाने डॉ अंकुशने एमबीबीएसची पदवी बहाल केली तर यावर्षी प्रफुल्ल राऊत यांच्या मुलाने डॉ आनंदने एमबीबीएस ची पदवी बहाल केली. अल्पभूधारक कुटूंबातील शेतकऱ्यांच्या मुलांनी जिद्द व कठोर परिश्रमाने एम बीबीएस च्या पदव्या प्राप्त केल्यामुळे त्यांचे परिसरात कौतुक होत आहे.



शेतीतील अडचणींचा सामना करताना राऊत कुटूंबानी जिद्दीने दोन्ही मुलांना डॉक्टर केले आहे. यासाठी वेळ प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन त्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले आहे. घरच्या परिस्थितीची जाण असलेल्या आनंद व अंकुशने देखील मेहनतीने, चिकाटीने स्वतःला सिद्ध केले आहे. शेतात कबाड कष्ट करणाऱ्या आई वडिलांच्या कष्टाची जाण ठेवत दोन्ही भावांनी डॉक्टर पदवी प्राप्त करून आई वडिलांचा विश्वास सार्थ केला आहे.

## मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

# भूषण काळेची सीए परीक्षेत बाजी, तर खुशी अग्रवालची पीडब्ल्यूसामध्ये निवड

**अमरावती/का.प्र.**

बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात यशाचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी भूषण काळे याने 'द इन्स्टिटुयट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' द्वारे आयोजित चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए), तर खुशी अग्रवाल हिने इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन करून व्यावसायिकतेच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकले आहे. तिची निवड जागतिक स्तरावरील 'पीडब्ल्यूसी' मध्ये झाली. यामुळे महाविद्यालयाच्या यशात एक मानाचा तुरा खोवला गेला. खुशी अग्रवालची झालेली निवड म्हणजे जगातील प्रतिष्ठित 'बिग फोर' ऑडिट आणि कन्सल्टिंग संस्थांपैकी एक असलेल्या पीडब्ल्यूसी' या मुंबईतील जागतिक व्यावसायिक सेवा फर्ममध्ये झाली आहे. भूषण काळे



याने सीए सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करण्यासोबतच खुशी अग्रवालने आंतरराष्ट्रीय कंपनीत स्थान मिळवणे या दोन्ही विद्यार्थ्यांच्या कष्टाची आणि महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाची पावती आहे. भूषण आणि खुशी यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. बुलडाणा सारख्या छोटया शहरांतील विद्यार्थी देखील जिद्द असेल तर यश संपादन करू शकतात हे देखील अधोरेखित झाले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशाबद्दल मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. महेश व्यवहारे, प्रा. दिपक नन्हई, प्रा. सुचिता माळोदे, डॉ. दिपक देशमुख, प्रा. अक्षय नरवाडे, प्रा. प्रमोद पंडित, प्रा. बलवान विणकर, डॉ. मुरलीधर जाधव, प्रा. सुनिता गायकी तसेच प्राध्यापकवृंद उपस्थित होते. भूषण आणि खुशी यांच्या या कामगिरीमुळे संपूर्ण परिसरातून आणि शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# लग्नसराई व उन्हाळी सुट्ट्यामुळे लालपरी हाऊसफूल्ल

**अमरावती/का.प्र.**

लग्नसराईचा हंगाम आणि उन्हाळी सुट्ट्यामुळे प्रवासाची मागणी प्रचंड वाढली असून एसटी महामंडळाच्या बसेस अक्षरशाः हाऊसफुल्ल धावत आहेत. अतिरिक्त नियोजनात बसफेऱ्यांची संख्या वाढविण्यात आल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळत आहे. अशातच प्रवाशांची संख्या पाहता खासगी ट्रॅव्हल्स चालकांनी चांगलीच कमाई सुरू केली आहे.

अमरावती जिल्ह्यात एकूण ८ आगारांमधून ४१८ बसेस उपलब्ध आहेत. यामध्ये १९ 'शिवाई' (इलेक्ट्रिक), ३८ 'शिवशाही' (एसी) आणि ३६१ डिझेल बसेसचा समावेश आहे. अलीकडेच ८० नवीन लालपरी बसेस ताफ्यात दाखल झाल्या असून त्या प्रामुख्याने प्रवाशांच्या सोयीसाठी विविध मार्गावर धावत आहेत. 'शिवाई' या बॅटरीवर चालणाऱ्या बसेसची रेंज सुमारे ३०० किमी असल्याने त्या लांब पल्ल्याच्या मार्गावर चालविणे शक्य नाही. मात्र 'शिवशाही'



आणि नव्या लालपरी बसेस लांब व मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात आहेत. उन्हाळी सुट्या आणि लग्नसराईमुळे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यासाठी काही अतिरिक्त फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. अमरावती-चांदूरबाजार, अमरावती-अचलपूर, अमरावती ते धारणी यांसारख्या मार्गावर विशेष बसफेऱ्या चालविण्यात येत आहेत.

एसटीमध्ये जागा न मिळाल्याने अनेक प्रवासी खासगी ट्रॅव्हल्ससह अन्य भाडेतत्वावरील वाहनांकडे वळत आहेत. याचा फायदा घेत काही ठिकाणी भाड्यात वाढ करण्यात आल्याचे दिसून येत आहे. तसेच या काळात अवैध प्रवासी वाहतूकही वाढल्याची चर्चा आहे.

# अनोळखी वृद्धाचा मृतदेह आढळला

**अमरावती-** शहरातील इतवारा बाजार परिसरात बुधवारी (२२एप्रिल) रोजी सकाळी एका अनोळखी वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.सदर मृत व्यक्तीचे वय अंदाजे ६५ ते ७० वर्षे असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. संबंधित व्यक्तीचा बांधा सडपातळ, रंग निमगोरा असून डोक्यावरील व दाढी-मिशांचे केस पांढरे आहेत. अंगात मेहंदी रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट होती. डाव्या हाताच्या पहिल्या बोटाला कापडाची पट्टी बांधलेली होती.मृतदेह इर्विन रुग्णालयाच्या शवागारात ठेवला असून नातेवाईकांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. नागरिकांना या व्यक्तीबाबत काही माहिती असल्यास सिटी कोतवाली पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा अमरावतीचे त्रैवार्षिक अधिवेशन

# तालुकाध्यक्षपदी नितिन देशमुख, सरचिटणीसपदी प्रफुल्ल होले, कार्याध्यक्ष अश्विन दळवी तर कोषाध्यक्षपदी चव्हाण

## महीला आघाडी प्रमुख माधुरी देशमुख तर सरचिटणीसपदी स्वाती चव्हाण

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शाखा अमरावतीच्या वतीने अमरावती शाखेचे त्रैवार्षिक अधिवेशन श्री संत गाडगे महाराज समाधी स्थळ सभागृह येथे मोठ्या उत्सावात संपन्न झाले.अधिवेशनात नुतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.तालुकाध्यक्ष पदी नितिन देशमुख,सरचिटणीस प्रफुल्ल होले,कार्याध्यक्षपदी अश्विन दळवी तर कोषाध्यक्ष रामचंद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली.महीला आघाडी प्रमुख म्हणुन माधुरी देशमुख तर सरचिटणीस पदी स्वाती चव्हाण यांची निवड करण्यात आली.



कार्यक्रमाचे अध्यक्ष गोकुलदास राऊत (जिल्हा नेते म.रा.प्रा.शि. समिती)हे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष म.रा.प्रा.शि. समिती)यांच्या हस्ते करण्यात आले. विशेष सत्कार मुर्ती संभाजी रेवाळे (माजी तालुकाध्यक्ष तथा जिल्हा सल्लागार)प्रमुख पाहुणे राजेश सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख म.रा.प्रा.शि. समिती),प्रविणा कोल्हे (राज्य प्रतिनिधी महिला), शैलेंद्र दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस),सरिता काठोळे (जिल्हाध्यक्ष महिला आघाडी)प्रेमसुख ठोंबरे (सरचिटणीस म.रा.प्रा.शि. समिती डिसीपीएस सेल),जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर,पंकज दहीकर,तुळशिदास धांडे,उमेश चुनकीकर,संगिता तडस,लिनता पवार,सुनिल बोकाडे,राजेश ठाकरे,योगीराज मोहोड,शामकांत तडस,गजानन कावलकर यांची उपस्थिती होती.फोटो पुजन व दिप प्रज्वलनाने अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी संभाजी रेवाळे व सौ.लता टेंभरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी अमरावती तालुका नुतन कार्यकारीनी गठीत करण्यात आली. प्रास्ताविक नितीन देशमुख संचालन प्रफुल्ल होले आणि आभार प्रदर्शन रविद्र निंघोट यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता चंद्रकांत कुरळकर, लता टेंभरे, स्वाती चव्हाण,रामचंद्र चव्हाण,मिलिंद कोकाटे,अश्विन दळवी,बबिता राऊत,इंदीरा रेवस्कर, पदमा ढेवले,संगिता रा.डाफ,वनिता बोरोडे वंदना वि.खंडारे,माधुरी देशमुख, अपूर्वा कदम यांचे सहकार्य लाभले.

# एडुस्किल्स सर्वेक्षणात पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा गौरव

## महाराष्ट्रात एकमेव व भारतात पाचवा क्रमांक

**अमरावती/का.प्र.**

मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, नॅशनल इंटर्नशिप पोर्टल आणि एडुस्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या एआयसीटीई - एडुस्किल्स व्हर्च्यूअल इंटर्नशिपच्या १५ व्या कोहार्ट (जानेवारी २०२६ ते मार्च २०२६) दरम्यान घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी सादरीकरण तसेच मूल्यमापन व प्रमाणपत्रच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती यांनी भारतातील टॉप १० परफॉर्मिंग इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये पाचवा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या कामागिरीमुळे संस्थेच्या शिक्षणपद्धतीला व विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारित शिक्षणाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. या अभियांत्रिकी प्रभागामध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त करणारे महाराष्ट्रातील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय एकमेव आहे. या यशामुळे अमरावती जिल्ह्याचे शैक्षणिक क्षेत्रात नाव उज्ज्वल झाले असून संस्थेच्या गुणवत्तेची आणखी एक राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे.

मागील एआयसीटीई - एडुस्किल्स वर्चुअल इंटर्नशिपच्या १४ व्या कोहार्ट (ऑक्टोंबर २०२५ ते डिसेंबर २०२५) यादरम्यान २२१४ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे हे इंटर्नशिप पूर्ण केली, यावेळी संस्थेचा क्रमांक महाराष्ट्रात प्रथम व व भारतात दुसऱ्या क्रमांकावर होता. तसेच यावर्षी सुद्धा १५ व्या कोहार्ट (जानेवारी २०२६ ते मार्च




२०२६) दरम्यान १६८३ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या ही वर्चुअल इंटर्नशिप यशस्वीरित्या पार पाडली.एआयसीटीई - एडुस्किल्स व्हर्च्यूअल इंटर्नशिप उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाउड कम्प्युटिंग, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, रोबोटिक्स अशा अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये उद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यात आले. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सहभागाची संख्या, प्रोजेक्ट पूर्णत्वाचे प्रमाण, उद्योगतज्ज्ञांकडून मिळालेला अभिप्राय, नवोपक्रमशील प्रकल्प सादरीकरणे व एकूण कामगिरी या निकषांवर देशभरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले.

या सर्व निकषांमध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्रातून प्रथम व भारतामधून पाचवे स्थान पटकावले. संस्थेतील विद्यार्थ्यांनी केवळ मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला नाही, तर गुणवत्तापूर्ण प्रकल्प सादर करून आपली कौशल्ये सिद्ध केली. अनेक विद्यार्थ्यांनी उद्योगमान्य प्रमाणपत्रे प्राप्त केली असून काही विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांकडून इंटर्नशिप व प्लेसमेंटच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. संस्थेचे प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे व इंटर्नशिप विभागाचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्यविकास उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पोलीस निरीक्षकाकडून पत्नीला भररस्त्यात मारहाण व विनयभंगाचा धक्कादायक प्रकार

## व्हायरल व्हिडिओमुळे खळबळ – गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू, पोलीस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह

**अकोला/प्रतिनिधी::** अमरावती शहरातील एका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षकावर स्वतःच्या पत्नीला व साळीला भररस्त्यात मारहाण करून विनयभंग केल्याचे गंभीर आरोप समोर आल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तीवरच अशा स्वरूपाचे आरोप झाल्याने पोलीस यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील डाबकी रोड परिसरातील एका मंगल कार्यालयासमोर रात्री १० वाजताच्या सुमारास हा धक्कादायक प्रकार घडला. तक्रारदार महिलेने दिलेल्या माहितीनुसार, वैवाहिक




### व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल : वरिष्ठांच्या भूमिकेकडे लक्ष

सदर प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर नागरिकांकडून तीव्र टीका होत आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका तुलनेने सौम्य दिसत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याची कुठे पाठराखण तर केली जात नाही ना? असा यक्ष प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणात निष्पक्ष कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आयुष्यातील वाद, छळ आणि अत्याचाराचा इतिहास जुना असून यापूर्वीही संबंधित प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. मात्र, अलीकडील घटनेत वाद थेट रस्त्यावर पोहोचला आणि परिस्थितीने हिंसक वळण घेतले.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वादाच्या दरम्यान पोलिस निरीक्षकासमवेत त्याच्या कुटुंबियांकडून महिलेला शिवीगाळ, ढकलाढकली आणि मारहाण झाली. तक्रारदार महिलेला केस ओढत रस्त्यावर ☞(पान २ वर)

### ■ 'ती' महिला कोण?– रहस्य अधिक गडद

घटनेदरम्यान एका अज्ञात महिलेच्या उपस्थितीमुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. व्हायरल झालेल्या काही दृश्यांमध्ये तक्रारदार महिला त्या अज्ञात महिलेला प्रश्न विचारताना दिसते, तर संबंधित महिला चेहरा लपवून घटनास्थळावरून निघून जात असल्याचे दिसते. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्या महिलेकडूनही मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे 'ती महिला नेमकी कोण?' हा प्रश्न आता या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा ठरत आहे.

### ■ 'कौटुंबिक वाद' की सार्वजनिक गुन्हा?

संबंधित अधिकाऱ्यांच्या बाजूने हा वाद 'कौटुंबिक' असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात तो भररस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी घडल्याने हा केवळ कौटुंबिक वाद राहतो का? असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. कायद्याचे पालन करणाऱ्यांनीच जर कायद्याचे उल्लंघन केल्याचे आरोप होत असतील, तर सामान्य नागरिकांनी कोणावर विश्वास ठेवायचा, असा सवालही नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



# आईच्या मृत्यूनंतर मुलाचा आक्रोश

■ आईच्या जीवासाठी धावपळ करणाऱ्या सुधीर राक्षसकर यांना रुग्णालयातच मनस्ताप सहन करावा लागला. आईची प्रकृती खालावत असताना सलाईननंतर थंडी वाजणे, चेहरा सुजणे अशी गंभीर लक्षणे दिसूनही वेळीच दखल घेतली गेली नाही, असे सुधीर यांनी सांगितले. वारंवार विनंती करूनही प्रतिसाद न मिळाल्याने संताप अनावर झाला. त्यानंतर त्याने परीचारीकांवर हलगर्जीपणा आरोप केला.

## इर्विनमध्ये हलगर्जीपणाचे आरोप



**अमरावती/प्रतिनिधी:** 'माझी आई गेली होष्ठ' या आर्त हाकेनं इर्विन रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक १ क्षणभर स्तब्ध झाला. उपचारासाठी आणलेल्या आईचा काही तासांत मृत्यू झाल्यानंतर मुलाच्या डोळ्यांसमोर सर्वकाही कोसळले. पण या घटनेने केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगरच कोसळला नाही, तर रुग्णालयातील उपचार पद्धती आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.


अंजनगाव सुर्जी तालुक्यातील भंडारज येथील रहिवासी मनोरमा नाना राक्षसकर (वय ५०) यांना डोकेदुखीचा त्रास होता. त्यामुळे मुलगा सुधीर राक्षसकर यांनी आईला प्रथम अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात नेले. त्यानंतर डॉक्टरांनी पुढील तपासणीसाठी अमरावतीला पाठवले. 'काही मोठं नाही, आई बरी होईल,' या आशेवर २४ एप्रिल रोजी त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. ओपीडीत उपचारानंतर वॉर्ड क्रमांक १ मध्ये हलवण्यात आले. एमआरआयसाठी सुपर स्पेशालिटीला नेऊन पुन्हा त्याच वॉर्डात आणले. मात्र, काही वेळातच परिस्थिती अचानक बदलली. आईची प्रकृती बिघडत असल्याचे पाहून सुधीर अक्षरशः धावत होता, 'डॉक्टरांना बोलवा, काहीतरी ☞(पान २ वर)

### नर्सने बोलाविले पतीला, वाद वाढला

याच दरम्यान, संबंधित नर्सने आपल्या पतीलाच रुग्णालयात बोलावल्याचे धक्कादायक समोर आले. वॉर्डातच त्या पतीने सुधीरशी वाद घालत शिवीगाळ केल्याने परिस्थिती आणखी चिघळली. आईच्या मृत्यूच्या दुःखात असलेल्या मुलासोबत असा प्रकार घडल्याने उपस्थितांमध्ये तीव्र संताप व्यक्त झाला. ही घटना केवळ एक अपघात किंवा दुर्दैवी प्रसंग म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. ही आरोग्य व्यवस्थेतील संवेदनशून्यतेची आणि जबाबदारीच्या अभावाची गंभीर घंटा आहे. रुग्णालयात जीव वाचवण्यासाठी येणाऱ्या लोकांना जर अशा अनुभवांना सामोरे जावे लागत असेल, तर ही केवळ हलगर्जीपणा नसून व्यवस्थेच्या अपयशाचा कळस आहे.

## गुप्तधनाच्या हव्यासात अंधश्रद्धेचा कळस..!

# कारेगावात अघोरी विधी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात






### मध्यरात्री सापळा रचून सहा जणांना अटक; जादूटोण्याचे साहित्य व चारचाकी वाहन जप्त

**यवतमाळ /प्रतिनिधी :** गुप्तधनाच्या मोहापायी अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या अघोरी प्रकाराचा वडगाव जंगल पोलिसांनी पर्दाफाश करत सहा जणांना मध्यरात्रीच्या थरारक कारवाईत ताब्यात घेतले. कारेगाव शिवारात जादूटोण्याच्या माध्यमातून जमिनीत दडलेले धन मिळवण्याचा प्रयत्न करणारी ही टोळी पोलिसांच्या सापळ्यात अडकली.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ एप्रिल रोजी पहाटे १.३० वाजताच्या सुमारास वडगाव जंगल पोलीस गस्तीवर असताना वरुड–कारेगाव मार्गावर एक संशयास्पद ईंप्र्ईं ळ्र (क्र. श्प ०१ ँइ ६०२६) उभी असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता त्यातील सहा जणांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र सखोल तपासणीत वाहनातून जादूटोण्याचे साहित्य आढळल्याने पोलिसांचा संशय खात्रीत बदलला.

पोलिसांनी जप्त केलेल्या साहित्यामध्ये काळ्या कापडाच्या बाहुल्या, खिळे, त्रिशूल, स्त्री-पुरुषांचे केस, सुया, लिंबू आणि इतर अघोरी विधींमध्ये वापरले जाणारे साहित्य समाविष्ट आहे. जमिनीत गाडलेले गुप्तधन ☞(पान २ वर)

# बिबट्याने केली वासराची शिकार

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

### कुंभी वाघोली शिवारातील घटना

**अमरावती/प्रतिनिधी:** कुंभी वाघोली, गोंड वाघोली, वागडोह, पायवीर या परिसरात पुन्हा एकदा हिंसक प्राण्याच्या हल्ल्याची घटना समोर आली आहे. कुंभी वाघोली शिवारात बिबट्याने



गायीच्या वासराची शिकार केल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पथ्रोट येथील शेतकरी संजय वंजारी यांचे कुंभी वाघोली येथे शेत असून तेथे त्यांनी पशुधनासाठी झोपडी उभारली आहे. मंगळवारी रात्री अज्ञात हिंसक प्राण्याने झोपडीत शिरून गायीच्या वासरावर हल्ला केला. सकाळी शेतात गेल्यानंतर वंजारी यांना वासरू मृत अवस्थेत आढळून आले. घटनास्थळी मोठ्या आकाराचे ठसेही दिसून आले असून, हा हल्ला वाघ किंवा बिबट्याने केल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून या परिसरात अशाच प्रकारच्या घटना वारंवार घडत असून अनेक पशुधनांची शिकार झाल्याचे समोर आले आहे. ☞(पान २ वर)

# देशी कट्ट्यासह आरोपी ताब्यात

### नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:** नागपुरी गेट पोलिस स्टेशनच्या डीबी पथकाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या एका आरोपीला शनिवारी (दि.२५) अटक करून त्याच्याकडून गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस असा सुमारे २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई लालखडी रोड परिसरात करण्यात आली.




पोलिसांना एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन परिसरात फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे डीबी पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिसराला वेढा घालून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीची ओळख अब्दुल जाफिर अब्दुल शकील (वय ३२, बडनेरा जुनी बस्ती, सध्या ☞(पान २ वर)

# महिलेला धमकी देणाऱ्या आरोपीस शिक्षा

### न्यायालयाचा निर्णय

**अमरावती/प्रतिनिधी:** महिलेला अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावतीने आरोपीस शिक्षा सुनावली आहे. जिल्हा न्यायाधीश (क्र. ३) यशवंत आनंद गोस्वामी यांनी हा निकाल देत आरोपी अब्दुल अजीज अब्दुल लतीफ उर्फ इमरान (वय ३४, रा. बुटीबोरी, नागपूर) यास दोषी ठरवून दहा महिने पंचवीस दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.



आरोपी न्यायाधीन बंदी असल्याने ही शिक्षा त्याने आधीच भोगलेली असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

सदर प्रकरण गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. १४ मे २०२५ रोजी मार्डी रोड येथील गोकुळ आश्रम परिसरात ही घटना घडली होती. ☞(पान २ वर)

# धुरा जाळताना आग अनियंत्रित; बागेचे नुकसान

**परतवाडा/प्रतिनिधी: :** अचलपूर तालुक्यातील झिंगापूर शिवारात शेताची धुरा साफ करण्यासाठी लावलेली आग अनियंत्रित होऊन शेजारच्या संत्रा बागेत पसरल्याची घटना घडली. या आगीत सुमारे २० संत्रा झाडे जळून खाक झाली असून, शेतकऱ्याचे अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या शेतकऱ्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



माहितीनुसार, झिंगापूर येथील मोतीलाल होरे चिल्लात्रे (वय ६५) यांच्या शेतात संत्र्याची बाग आहे. त्यांच्या शेजारीच छोटूलाल होरे चिल्लात्रे (वय ६२) यांचे शेत असून, त्यांनी आपल्या शेतातील मेढ साफ करण्यासाठी कचरा गोळा करून त्याला आग ☞(पान २ वर)

# 'घरी चल' म्हणताच संताप

## पत्नीचा पतीवर दगडाने हल्ला

### चौसाळा येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधी:** कौटुंबिक वादातून संतापलेल्या पत्नीने पतीच्या डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केल्याची घटना चौसाळा येथे घडली. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी संबंधित पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण प्रेमदास मनोहरे (वय ३४, रा. खरपी) आणि त्यांच्या पत्नीमध्ये काही दिवसांपासून मतभेद सुरू होते. त्यामुळे पत्नी माहेरी राहत होती. दरम्यान, अंजनगाव परिसरातील एका लग्नसमारंभासाठी चौसाळा येथे पंगतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पत्नी आपल्या ☞(पान २ वर)

# मुरके रुग्णालयाजवळ आग; शॉर्ट सर्किटने पेटली दुकाने

### अग्नीशमनच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरातील वालकट कंपाउंड परिसरात मुरके रुग्णालयाजवळ शुक्रवारी सकाळी लागलेल्या भीषण आगीत काही दुकाने जळून खाक झाली. या घटनेत सुमारे ३.५ लाख रुपयांचे साहित्य नष्ट झाले असले, तरी अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे शेजारील बालरुग्णालय मोठ्या धोक्यातून बचावले.

शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास परिसरात अचानक धुराचे लोट दिसू लागले. काही क्षणांतच आगीने विकराळ रूप धारण करत आसपासच्या दुकानांना वेढले. प्राथमिक माहितीनुसार, एका दुचाकी दुरुस्ती आणि वेल्डिंगच्या दुकानातून आगीची सुरुवात झाली. दुकानात असलेले सीट कव्हर, टायर तसेच ज्वलनशील साहित्यामुळे आग झपाट्याने पसरली आणि विदर्भ ट्रेडिंग कंपनी, सुपर कॅफे व रशीद ऑटो डील या दुकानांपर्यंत ती पोहोचली. आगीमुळे परिसरात एकच गोंधळ ☞(पान २ वर)

# मध्यरात्री पोलिसांची धडक नाकाबंदी





## ४ हद्दपार गुन्हेगार जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आणि गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री व्यापक नाकाबंदी व शोधमोहीम राबवली. पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली २४ एप्रिल रोजी रात्री १० वाजल्यापासून २५ एप्रिल रोजी पहाटे २ वाजेपर्यंत शहरातील विविध संवेदनशील चौक व परिसरात ही धडक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेचे नेतृत्व स्वतः पोलिस आयुक्तांनी केले. त्यांच्यासोबत पोलिस उपआयुक्त गणेश शिंदे, रमेश धुगे, सर्व सहायक पोलीस आयुक्त, विविध पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ☞(पान २ वर)

# इंजिनीअरिंग विद्यार्थ्याची सोशल मीडियावर बदनामी

### तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधी:** सोशल मीडियाचा गैरवापर करून इंजिनीअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या एका तरुणाची बदनामी केल्याचा गंभीर प्रकार शहरात उघडकीस आला आहे. संबंधित तरुणाच्या नावाने बनावट फेसबुक व इंस्टाग्राम खाते तयार करून त्याच्या आईचे आक्षेपार्ह फोटो प्रसारित करण्यात आल्याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी २१ वर्षीय तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण हा सध्या नागपूर येथे इंजिनीअरिंगच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. आरोपी तरुणीशी ☞(पान २ वर)

# फरार आरोपी जेरबंद, घरातूनही ५३ ग्रॅम एमडी जप्त

### एमडी प्रकरणात मोठी कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरात गाजत असलेल्या कोट्यवधींच्या एमडी (मेफेड्रॉन) ड्रग्ज प्रकरणात गुन्हे शाखेने आणखी मोठी कारवाई करत फरार आरोपींना अटक केली असून तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलीस कोठडीत असलेल्या मुख्य आरोपीच्या घरातूनही मोठ्या प्रमाणात एमडी



जप्त करण्यात आल्याने या रॅकेटची व्याप्ती अधिकच वाढली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नागपुरी गेट पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या एनडीपीएस प्रकरणात आधीच अटकेत असलेला आरोपी साकिब जावेद मोहम्मद आसिफ कुरेशी (वय २५, रा. गवळीपुरा) याच्या राहत्या ☞(पान २ वर)

सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
❑ रविवार, २६ एप्रिल २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com



**आजच्या काळात युद्धाचे स्वरूप केवळ सीमा, रणगाडे आणि क्षेपणास्त्रांपुरते मर्यादित राहिलेले नाही. डिजिटल रूपात आता एक नवीन आघाडी उघडली गेली असून ती अदृश्य असूनही सातत्याने सक्रिय आहे. या युद्धामध्ये गोळ्यांचा आवाज येत नाही, परंतु त्याचे परिणाम तितकेच विनाशकारी असतात.**

# सायबर स्पेस

आजच्या काळात युद्धाचे स्वरूप केवळ सीमा, रणगाडे आणि क्षेपणास्त्रांपुरते मर्यादित राहिलेले नाही. डिजिटल रूपात आता एक नवीन आघाडी उघडली गेली असून ती अदृश्य असूनही सातत्याने सक्रिय आहे. या युद्धामध्ये गोळ्यांचा आवाज येत नाही, परंतु त्याचे परिणाम तितकेच विनाशकारी असतात. आता कोणताही देश सीमा ओलांडल्याशिवाय शत्रूची अर्थव्यवस्था, ऊर्जा व्यवस्था किंवा दळणवळण यंत्रणेला थेट लक्ष्य करू शकतो. आधुनिक युद्ध आता दोन समांतर प्रवाहांमध्ये चालते. एक पारंपरिक आणि दुसरे सायबर, पण अनेक वेळा सायबर आघाडी अधिक निर्णायक ठरते.

इराण या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी उभा असलेले एक गुंतागुंतीचे उदाहरण आहे. कधी हल्ल्याचा बळी, तर कधी प्रतिसादात्मक रणनीतीचा निर्माता. वर्ष २०१० मध्ये 'स्टक्सनेट' नावाच्या सायबर आक्रमणाने इराणच्या नतांझ अणुऊर्जा प्रकल्पाला लक्ष्य केले होते आणि तिथल्या सेंट्रीफ्यूज मशीनचे गंभीर नुकसान केले होते. ती पहिली अशी घटना होती, जेव्हा एखाद्या सायबर हल्ल्याने थेट भौतिक संरचनेवर परिणाम केला होता. त्या घटनेने सांकेतिक कोड केवळ माहितीचे माध्यम नसून विनाशाचे साधनही बनू शकतो, हे जगाला शिकवले. त्या घटनेनंतर इराणने आपली धोरणात्मक दिशा बदलली आणि सायबर क्षमतेला प्राधान्य देण्यास सुरुवात केली. इराणने वेगाने आपली सायबर संरचना विकसित केली आणि अशा यंत्रणा तयार केल्या, ज्या थेट राज्याशी संबंधित न राहता त्याच्या हिताचे रक्षण करू शकतील. 'पे-टू-की'सारख्या भेदक हल्ल्यांच्या माध्यमातून इस्रायली पंपन्यांना लक्ष्य करण्यात आले. अलीकडच्या वर्षांत इस्रायलविरुद्धच्या सायबर हल्ल्यांमध्ये मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. ही बाब एका दीर्घकालीन रणनीतीचा भाग आहे, ज्यामध्ये सायबर हल्ले, मानसिक दबाव आणि आर्थिक अडथळे एकाच वेळी काम करतात. इराणने हे समजून घेतले आहे की, डिजिटल आघाडीवरील लढाई कमी खर्चात अधिक प्रभाव पाडू शकते.

अर्थात हा संघर्ष एकतर्फी नाही. इराणला स्वतःलाही अनेक मोठ्या सायबर हल्ल्यांचा सामना करावा लागला आहे. वर्ष २०२१ मध्ये त्याच्या इंधन वितरण यंत्रणेवर झालेल्या सायबर हल्ल्याने संपूर्ण देशातील पेट्रोलचा पुरवठा विस्कळीत केला होता, ज्यामुळे लांबच लांब रांगा आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर २०२३ मध्ये गॅस स्टेशनचा मोठा हिस्सा ठप्प झाल्याच्या घटनेने हे दाखवून दिले की, सायबर हल्ला थेट सामान्य नागरिकांच्या जीवनावर परिणाम करू शकतो. वर्ष २०२४ मध्ये इराणच्या बँकिंग यंत्रणेवर झालेल्या हल्ल्यात अनेक वित्तीय संस्था प्रभावित झाल्या, ज्यामुळे आर्थिक अस्थिरतेचा धोका वाढला. या घटना पुरावा आहेत की, सायबर युद्ध आता केवळ धोरणात्मक राहिले नसून सामाजिक आणि आर्थिक संकटही निर्माण करू शकते. वर्ष २०२६ पर्यंत पोहोचता पोहोचता हा संघर्ष अधिक जागतिक स्वरूप धारण करून बसला आहे.

इराणशी संबंधित सायबर गटांवर परदेशी कंपन्या, विशेषतः आरोग्य आणि तांत्रिक क्षेत्रांना लक्ष्य केल्याचे आरोप झाले आहेत. या युद्धात सायबर स्पेसची किती मोठी भूमिका आहे, याचे संकेत यूएस सेंट्रल कमांडचे कमांडर ॲडमिरल ब्रॅड कूपर यांनी देताना म्हटले होते की, आपण समुद्राच्या खोलीपासून अंतराळ आणि सायबर स्पेसपर्यंत इराणवर हल्ले सुरूच ठेवले आहेत. दुसरीकडे इराणने स्पष्ट केलेच आहे की, जर त्याच्या तेल आणि गॅसशी संबंधित संरचनांवर हल्ला झाला, तर त्या बदल्यात तो अमेरिका आणि त्याच्या प्रादेशिक मित्रराष्ट्रांच्या ऊर्जा प्रणाली, आयटी प्रणाली आणि पाणी शुद्धीकरण सुविधांना लक्ष्य करेल. युरोप आणि अमेरिकेतील अनेक संस्थांनी आपल्या यंत्रणेची सुरक्षा वाढवली आहे. कारण अशा हल्ल्यांचा धोका वाढत आहे. हे स्पष्ट आहे की, सायबर युद्ध आता कोणत्याही एका क्षेत्रापुरते किंवा देशापुरते मर्यादित नाही, तर जागतिक पुरवठा साखळी, वित्तीय बाजार आणि सार्वजनिक सेवांना थेट प्रभावित करू शकते.

इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेले 'सायबर युद्ध' या संपूर्ण परिस्थितीचे सर्वात अचूक उदाहरण आहे. येथे संघर्ष केवळ जमीन किंवा आकाशापुरता मर्यादित नसून सर्व्हर आणि डेटा केंद्रांपर्यंत पसरला आहे. एकीकडे इराण समर्थित गट ऊर्जा कंपन्या आणि सरकारी यंत्रणांवर हल्ले करत आहेत, तर दुसरीकडे इस्रायलशी संबंधित सायबर मोहिमा इराणचे रेल्वे नेटवर्क, पोलाद उद्योग आणि वित्तीय व्यवस्थेला लक्ष्य करत आहेत. अनेक वेळा हे हल्ले केवळ नुकसान करण्यासाठी नसून धोरणात्मक संदेश देण्यासाठी असतात की, शत्रूची पोहोच तुमच्या प्रणालीच्या आतपर्यंत आहे. सायबर युद्धाचे तांत्रिक स्वरूप समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे. हे युद्ध अनेक टप्प्यांत चालवले जाते. आधी लक्ष्याची ओळख, मग त्याच्या यंत्रणेतील कमकुवतपणाचे विश्लेषण, त्यानंतर प्रवेशासाठी कपटी संदेश किंवा दुर्भावनापूर्ण कूट संकेतांचा वापर आणि शेवटी यंत्रणेच्या आत नियंत्रण प्रस्थापित करणे.

ब-याच वेळा 'रॅन्समवेअर'सारख्या हल्ल्यांच्या माध्यमातून डेटा ओलीस धरला जातो, तर 'डिस्ट्रिब्युटेड डिनायल ऑफ सर्व्हिस'सारख्या हल्ल्यांमुळे एखादी सेवा ठप्प केली जाते. प्रगत हल्ल्यांमध्ये वीज प्रकल्प किंवा पाणीपुरवठा यंत्रणेवरही थेट परिणाम केला जातो.

# पुरवठा साखळीच्या मजबुतीवर ठरतो विजेता...

मध्यपूर्व-आशिया संघर्ष संघर्षाला जवळ जवळ दीड महिना पूर्ण होत असताना, युद्धाच्या निकालावर परिणाम करणारे अनेक निर्णायक घटक आपण पाहिले आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान गुप्तचर कार्य आणि हवाई हल्ल्यांमध्ये प्रभावी ठरते; परंतु सातत्यपूर्ण आणि साध्या रणनीतीसमोर ते अनेकदा अपयशी ठरते.

तंत्रज्ञानाच्या जोरावर शत्रूला काही काळ चकित करणे शक्य असते, तरी अंतिम निर्णायक विजय मिळवण्यात ते क्वचितच यशस्वी ठरते. याचे उदाहरण म्हणून भूतकाळातील इराक व अफगाणिस्तान, तसेच अलीकडील गाझा, युक्रेन आणि आता इराण येथील युद्ध यांचा उल्लेख करता येईल.

मग युद्ध जिंकण्यासाठी नेमके काय लागते? याचे उत्तर समजून घ्यायचे असेल, तर युद्ध प्रत्यक्षात तीन पातळ्यांवर लढले जाते हे लक्षात घ्यावे लागेल. आर्थिक, मानसिक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रसद (लॉजिस्टिक्स). कोणतेही युद्ध टिकवण्यासाठी रसद हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पुरवठा साखळी कच्चा माल, शस्त्रसाठा आणि इतर आवश्यक साधनांनी सातत्याने चालू ठेवावी लागते.

उदाहरणार्थ, एखाद्या देशाला क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्यांपासून संरक्षण करायचे असल्यास त्याच्याकडे प्रतिकारक शस्त्रसाठा असणे गरजेचे आहे. परंतु पुरवठा खंडित झाला, तर तो देश असहाय्य ठरतो. एखाद्या ठिकाणी हल्ला करायचा असल्यास आधी लष्करी तळ उभारावा लागतो, ज्यासाठी यंत्रसामग्री, शस्त्रे आणि स्थान निर्देशांक यांची अचूक माहिती आवश्यक असते. थोडक्यात, युद्ध हे एक समन्वित रसद व्यवस्थापन आहे. म्हणूनच सध्या इराणची मागणी आहे की अरब राष्ट्रांनी अमेरिकेला आपल्या जागा लष्करी तळ बनवू देऊ नयेत किंबहुना त्या अस्तित्वात असतील तर हटवाव्यात.

मात्र, युद्धातील रसद केवळ शस्त्रांपुरती मर्यादित नाही. जागतिक स्तरावर तेल आणि वायू पुरवठा साखळीही बाधित झाली आहे, कारण महत्त्वाचे समुद्री मार्ग ज्या देशाच्या नियंत्रणाखाली आहेत त्यातून जाणे त्या देशाच्या इच्छेवर अवलंबून असते. तेल पुरवठ्यातील व्यत्ययामुळे प्रति बॅरल १५० डॉलरपर्यंत किंमत जाण्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळे आशियातील विकसनशील आणि अल्पविकसित देशांच्या आर्थिक वाढीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे प्रत्येक डॉलर देशाच्या अर्थसंकल्पावर मोठा भार टाकतो.

भारतासारखा देश मोठ्या प्रमाणात तेल आयातीवर अवलंबून आहे. द्रवित पेट्रोलियम वायू पुरवठा खंडित झाल्यामुळे अनेक हॉटेल्स आणि खाणावळींना मोठा फटका बसला असून काही आस्थापने तात्पुरती बंद करण्याची वेळ आली. डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होते, त्याचा सरळ परिणाम म्हणजे आयात महाग होणे, देशाची आर्थिक स्थिती ढासळणे. श्रीलंका, फिलिपिन्स सारख्या देशात





तेलाचा वापर कमी करण्यासाठी साप्ताहिक सुट्ट्या दिल्या गेल्या. भारताने श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ यांना वेळेवर रसद पुरवून त्यांची तेलाची गरज भागवली आहे. हा रसद पुरवठा साखळीचाच एक भाग होय.

**इराण-इस्रायल-अमेरिका युद्धविरामानंतर भारताने चाबहर बंदरावर आपले हक्क पुन्हा प्रस्थापित करणे आणि तुर्कमेनिस्तान-अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत गॅस पाईपलाइनसारखे प्रकल्प सक्रिय करणे आवश्यक ठरेल.**

ग्रामीण भागातील ग्राहकांनाही गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी सुरुवातीच्या काळात तब्बल ४५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागत होती. यावरून पुरवठा साखळी अखंड राहण्याचे महत्त्व अधोरेखित होते. भारत सध्या रशियाकडून तेल खरेदी करत असला, तरी सवलती संपल्या आहेत. अमेरिका, कॅनडा आणि रशियाकडून एलपीजी खरेदी केली जात आहे; मात्र ती अधिक महाग आहे, कारण कतारने 'फोर्स मॅज्योर' जाहीर करून पुरवठा थांबवला आहे.

यामुळे हॉटेल व्यावसायिकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे आणि गॅस वितरण केंद्रांबाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. सूक्ष्म पातळीवर पाहता, कंत्राटी कामगारांना मोठा फटका बसला आहे, कारण इंधन तुटवड्यामुळे क्विक कॉमर्स सेवा अडचणीत आल्या आहेत. आता भारताने अर्जेन्टिनाकडून गॅसची रसद चालू केल्यामुळे गंभीर संकट टळले आहे.

तेल आणि वायू हे तुलनेने टिकाऊ संसाधने आहेत. परंतु ग्राहक वस्तू क्षेत्राची परिस्थिती अधिक गंभीर आहे. माल आधीच जहाजांवर लादलेला आहे आणि वितरण शक्य न झाल्यास उत्पादकांना मोठे नुकसान सहन करावे लागेल. सध्या लाखो डॉलर मूल्याची फळे, भाज्या आणि गहू होर्मुझ सामुद्रधुनीजवळ अडकले आहेत. यामुळे आर्थिक नुकसान वाढेलच, पण अन्नपुरवठा खंडित झाल्यास उपासमारीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

युद्धाचे परिणाम केवळ लढणाऱ्या देशांपुरते मर्यादित राहत नाहीत; तर या रसद पुरवठ्याच्या मार्गावर अवलंबून असलेल्या इतर देशांनाही त्याची मोठी किंमत चुकवावी लागते. या वर्षी हवामान खात्याने एल निनो म्हणजेच कमी पावसाचे वर्ष जाहीर केले आहे. सोबतच पिकांच्या वाढीसाठी लागणारा खत पुरवठा देखील धोक्यात आला आहे, तसे झाले तर जागतिक स्तरावर १५-२०३ अन्न पुरवठा कमी होईल म्हणजेच भूकमारीची वेळ येऊ शकते.

अमेरिकेने सध्या होर्मुझच्या परिसरात प्रत्युत्तर म्हणून नौकाबंदी केली. ज्यामुळे इराणचे जहाज यांच्या संचारावर बंदी आली आहे, याचा परिणाम म्हणजे युद्ध परत पेटायची शक्यता आहे. सगळ्या देशांनी मिळून दोन्ही पक्षांना चर्चेद्वारे मार्ग काढायला लावणे हाच एक पर्याय आहे. तो साध्य होत नाही तोपर्यंत सगळी राष्ट्रे तणावाखाली राहतील.


जागतिक व्यवस्थेचा विचार करून मानवी जीवनाचा आदर करणे आणि रसद पुरवठ्याच्या मार्गांची सुरक्षितता कायम राखणे हा यावर उपाय आहे. चीनसारख्या देशांनी दीर्घकालीन धोरण आखून ३ ते ६ महिन्यांचा साठा तयार केला आणि 'बेल्ट अँड रोड' उपक्रमासारख्या पर्यायी मार्गांमध्ये गुंतवणूक केली आहे, यापासून भारताने धडा घ्यावा आणि पर्यायी मार्ग विकसित करावे.

युद्धविरामानंतर भारताने चाबहर बंदरावर आपले हक्क पुन्हा प्रस्थापित करणे आणि तुर्कमेनिस्तान-अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत गॅस पाईपलाइनसारखे प्रकल्प सक्रिय करणे आवश्यक ठरेल. हे अशा अनिश्चित काळात टिकून राहण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

कधी कधी परस्पर टिकावासाठी शत्रूही सहकार्य करतात.

कारण राजकारणात कोणीही कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतो, तर राष्ट्रहित सर्वतोपरी असते. याचे वेळीच आकलन महत्त्वाचे आहे.

***मराठीत आपण 'अफलातून' हा शब्द भन्नाट, विलक्षण या अर्थाने वापरतो, पण या शब्दाचा प्रवास पाहिला की, त्याच्या उच्चार आणि अर्थामध्ये इतका कमालीचा बदल झाला आहे की, आपला विश्वास बसणं कठीण होतं. तर या 'अफलातून' शब्दाची गोष्टच मुळात अफलातून आहे – प्लेटो या ग्रीक तत्त्ववेत्त्याचं खरं नाव अरिस्टोक्लिस होतं.***





# जाऊ शब्दांच्या गावा

बदल हा कोणत्याही भाषेचा स्वाभाविक गुणधर्म असतो. आपण बोलत असलेल्या भाषेतल्या शब्दांचे अर्थ, त्यांचे उच्चार कधी काळानुसार, तर कधी प्रदेशानुसारही बदलतात. एका भाषेतले शब्द दुसऱ्या भाषेत जातात तेव्हाही त्यांच्या अर्थात आणि उच्चारात फरक झाल्याची असंख्य उदाहरणं पाहायला मिळतात. हे बदल जसे शब्दांचे होतात, तसे व्यक्तिनामांमध्येही होतात. शेवटी नावंसुद्धा शब्दच असतात की!

ग्रीक तत्त्वज्ञान परंपरेत सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल आणि अलेक्झांडर ही गुरु-शिष्य परंपरा प्रसिद्ध आहे. सॉक्रेटिस हा महान तत्त्वज्ञ होता. त्याने स्वतः काही लिहिले नाही, पण त्याच्या विचारांचा प्रसार त्याच्या शिष्याने – प्लेटोने केला. ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा प्रमुख शिष्य होता. ॲरिस्टॉटलने राजा अलेक्झांडरला शिक्षण दिले. त्यामुळे त्याच्या विचारांवर ग्रीक तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला. तर सांगायची गोष्ट अशी की, या चारही ग्रीक तत्त्वज्ञांची नावं अरबी-फार्सी भाषेत अगदी बदलून गेलेली दिसतात.

मराठीत आपण 'अफलातून' हा शब्द भन्नाट, विलक्षण या अर्थाने वापरतो, पण या शब्दाचा प्रवास पाहिला की, त्याच्या उच्चार आणि अर्थामध्ये इतका कमालीचा बदल झाला आहे की, आपला विश्वास बसणं कठीण होतं. तर या 'अफलातून' शब्दाची गोष्टच मुळात अफलातून आहे – प्लेटो या ग्रीक तत्त्ववेत्त्याचं खरं नाव अरिस्टोक्लिस होतं. त्याच्या रुंद खांद्यामुळे किंवा शरीरयष्टीमुळे त्याला 'प्लेटो' हे टोपणनाव मिळालं असं म्हटलं जातं. ग्रीक भाषेत ईल्ले म्हणजे रुंद किंवा विशाल. जेव्हा हे नाव अरबी भाषेत गेलं तेव्हा त्याच्या उच्चारात तर मोठा बदल झालाच, पण त्याचा अर्थही अगदीच बदलून गेला. अरबी भाषेत 'अफलातून' म्हणजे स्वतःला फार शहाणा समजणारा, घमेंडखोर असा अर्थ प्राप्त झाला. प्लेटोसारखी तत्त्वज्ञ व्यक्ती अरबांना अतिशहाणी वाटून त्याचं विशेषणात रूपांतर झालेलं दिसत, पण मराठीत तर अरबीतली अतिशहाणी व्यक्ती विलक्षण, भन्नाट समजली गेली. अर्थ व उच्चार यांचं टोकाचं उदाहरण म्हणून हा शब्द 'अफलातून' लक्षात राहतो.

प्लेटोचा गुरू सॉक्रेटिस. मराठीत आपण याचा उच्चार मूळ ग्रीकप्रमाणेच करतो, पण अरबी भाषेत त्याचा उच्चार होतो – सुकरात. प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल. अरबीत त्याचा उच्चार होतो – अरस्तू. एखाद्या भाषेतला अमुक एक उच्चार दुसऱ्या भाषेत नसेल तर ते भाषिक आपल्या भाषिक लकबीनुसार उच्चार करतात. हे एक प्रकारे भाषेचं सुलभीकरण म्हणता येईल. मराठीतही अलीकडे मुलामुलींची नावं इतकी जोडाक्षरयुक्त असतात की, ती आजी-आजोबांना म्हणता येत नाहीत. मग ते अशा नावांचंही त्यांच्यापुरतं का होईना, सुलभीकरण करून घेतात.

ॲरिस्टॉटलचा शिष्य अलेक्झांडर. त्याने अतिशय लहान वयात राज्यकारभार हाती घेतला आणि फार कमी काळात विशाल साम्राज्य उभं केलं. त्याचं साम्राज्य ग्रीसपासून इजिप्त, इराण आणि भारत एवढ्या मोठ्या प्रदेशात पसरलं होतं. आजच्या पाकिस्तान प्रांतातील झेलम नदीकाठावर अलेक्झांडर आणि राजा पौरस यांच्यात झालेली लढाई प्रसिद्ध आहे. कारण या लढाईत अलेक्झांडर जिंकला, पण पौरसच्या शौर्याने प्रभावित होऊन त्याला पुन्हा राजा म्हणूनच राज्य दिलं. अशा या अलेक्झांडर राजाचे नाव अरबीत 'इस्पंदर' झालं, तर फार्सीत 'सिकन्दर' झाले. भारताच्या वेगवेगळ्या भागांत त्याचे सिंकदर, शिंकदर असे उच्चार होतात.

अलेक्झांडर हा अतिशय धाडसी, महत्त्वाकांक्षी आणि कुशल सेनानी होता. त्याने आपल्या अल्प आयुष्यात जगातील एक मोठे साम्राज्य निर्माण केले. त्यामुळे तो अतिशय भाग्यशाली समजला जातो. यावरून जुन्या मराठीत 'ताळेशिंकदर', 'ताळेबुलन्द', 'दैवाचे ताले' हे शब्दप्रयोग चांगलं दैव, उच्चीचे ग्रह या अर्थाने वापरले जात असत.

उदा. 'दौलतराव बाबा यांचे ताले विचित्र आहेत.' म्हणजे ग्रह विचित्र आहेत. अरबीत 'तालिअ' आणि फार्सीत 'ताले' असे शब्द आहेत. त्यांचा अर्थ होतो दैव किंवा ग्रह. यावरून फार्सीत तालेवार (भाग्यशाली, दैववान), तालेवारी (सुदैव, उत्कर्ष) यांसारखे शब्द तयार झाले आहेत. यापासून तयार झालेला मराठीतील 'तालीवार' शब्द मात्र श्रीमंत, प्रतिष्ठा या अर्थाने वापरला जातो. याच अर्थाने 'शिंकदराचं नशीब लाभणं' असंही म्हटलं जातं.



# ‘या प्रयोग म्हणून केलेल्या सिनेमाकडून फार अपेक्षा नव्हत्या’... पूजा सावंत

ग्लॅमरस ते कणखर महिलेच्या व्यक्तिरेखा असा अभिनेत्री पूजा सावंत हिचा आजवरचा प्रवास होता. याबाबत पूजा सांगते, ‘मला ठरावीक प्रकारच्या भूमिका करायच्या आहेत, हे मी कधीच ठरवले नव्हतं. जे माझ्या वाट्याला आलं, ते मी मनापासून स्वीकारलं, एका कणखर महिलेची भूमिका साकारायची, ही इच्छा मनात कुठेतरी होती. ती ’लपाछपी’ या चित्रपटाच्या अनुभवाबद्दल सांगते, ‘या प्रयोग म्हणून केलेल्या सिनेमाकडून फार अपेक्षा नव्हत्या; पण त्यानंप्रेक्षकांची मनं जिंकली आणि अनेक पुरस्कारही पटकावले. तेव्हाच मला जाणवलं की, प्रत्येक कामाचं स्वतःचं नशीब असतं. २०२५मध्ये ‘सालबर्डी’ बाबत विचारणा आली, तेव्हा मनात एकच विचार आला ’हीच ती वेळ’. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर माझ्याकडे आलेल्या या भूमिकेनं एक वेगळ्या प्रकारे पूर्णत्वाची भावना दिली. ही भूमिका माझ्यासाठी केवळ एक प्रोजेक्ट नव्हता तर अनेक वर्षांच्या प्रतीक्षेचं फल होतं’.मनोरमा प्रधान या महिला पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारताना तिनं केवळ वर्दीचा रुबाब अनुभवला नाही तर त्या मागचं वास्तव समजून घेण्यासाठी स्वतःला झोकून दिलं. या भूमिकेसाठी तिनं मानसिक, शारीरिक आणि सामाजिक अशा तिन्ही स्तरांवर अभ्यास केला. खऱ्या आयुष्यातील पोलिस अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्या कामाची, त्यांच्या भावविश्वाची ओळख करून घेतली.



# अक्षयने तो बंगला विकायला नको होता, ते ‘माझ्या .... हिरोचं घर ’-मुमताज

बॉलिवूड सिनेइंडस्ट्रीचे पहिले सुपरस्टार दिवंगत अभिने राजेश खन्ना आणि लोकप्रिय अभिनेत्री मुमताज यांच्या जोडीनं एकेकाळी रुपेरी पडद्यावर राज्य केले. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत मुमताज यांनी राजेश खन्ना यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसंच त्यांच्या ’आशीर्वाद’ या बंगल्याबद्दल बोलताना त्या भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत मुमताज यांनी त्यांच्या करिअरमधल्या अनेक गोष्टी शेअर केल्या, सहकलाकरांच्या आठवणींतही त्या रमल्या. राजेश खन्ना अर्थात काका यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या ‘आशीर्वाद’ बंगल्याबद्दल अत्यंत भावुक प्रतिक्रिया दिली आहे, जी चर्चेत आली आहे.

खरं तर कार्टर रोडवरील ‘आशीर्वाद’ बंगला हा केवळ राजेश खन्ना यांचं निवासस्थान नव्हतं, तर तो भारतीय चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा होता. २०१६ मध्ये हा बंगला पाडण्यात आला, ज्याबद्दल मुमताज यांनी खंत व्यक्त केली.



त्यांनी म्हटले की, आशीर्वाद बंगला पाडला गेला याचं मला आजही खूप वाईट वाटते. आजही जेव्हा मी त्या रस्त्यावरून जाते, तेव्हा मला वाटतं की ते माझ्या हिरोचं घर होतं. ती एक ऐतिहासिक वास्तू होती.

तसंच मुमताज यांनी अंजू महेंद्रू आणि काकांच्या आदरातिथ्याबद्दलही सांगितलं.मुमताज यांनी राजेश खन्ना आणि त्यांची तत्कालीन जोडीदार अंजू महेंद्रू यांच्यासोबत घालवलेल्या क्षणांची आठवण काढली. अंजू आणि काका माझी खूप काळजी घ्यायचे. जेव्हा अंजू त्यांच्यासोबत होती, तेव्हा ती मला आवर्जून घरी बोलवायची. माझे पती मयुर यांच्याशी लग्न ठरल्यावर मी त्यांनाही तिथं घेऊन गेले होते. काका आणि अंजू आमचं मनापासून स्वागत करायचे, आम्हाला प्रेमाने खाऊ-पिऊ घालायचे. चित्रपटसृष्टीतील माणसे खूप मोठ्या मनाची असतात, असे त्या म्हणाल्या. ‘बंगल्याचे रूपांतर संग्रहालयात व्हायला हवे होते’ राजेश खन्ना यांच्या निधनानंतर त्यांच्या या घराचं संग्रहालयात रूपांतर व्हावे, अशी अनेकांची इच्छा होती. मुमताज यांनीही हीच भावना बोलून दाखवली. अक्षय कुमार (राजेश खन्ना यांचे जावई) यांनी हा बंगला का विकला, याबद्दल त्यांना आश्चर्य वाटते. ’मला असं वाटलं होतं की काकांच्या निधनानंतर तिथं त्यांचे संग्रहालय बनवले जाईल.



# तिहार तुरुंगातील अभिनेत्रीने सांगितले भयानक वास्तव

बॉलिवूड अभिनेत्री आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर गेल्या काही काळापासून तिच्यासंबधीत वादामुळे चर्चेत आहे. काही महिन्यांपूर्वी सुमारे ६ कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात ती अडकली होती. त्यानंतर तिला अटक करण्यात आली. तिने चार महिने तिहार तुरुंगात घालवले. आता नुकतीच ती जामिनावर सुटली असून एका मुलाखतीत तिचा तुरुंगातील अनुभव सांगितला आहे.

संदीपा म्हणाली की, तुम्ही तुरुंगात जाण्यापूर्वीच समाज आणि व्यवस्था तुम्हाला गुन्हेगार म्हणूनच पाहतात. तिथे ’तपासणी’च्या नावाखाली जे काही घडतं, ते कोणत्याही व्यक्तीचा स्वाभिमान धुळीस मिळवण्यासाठी पुरेसं आहे.ज्योत्स्ना बेदीच्या पॉडकास्टमध्ये, संदीपाने तिहार तुरुंगातील बरेच अनुभव शेअर केले. तिने असे काही सत्य उघड केले, जे अनेकदा जनतेपासून लपवून ठेवले जाते. तिने सांगितले की, तुरुंगात जाताना करताना होणारी तपासणी आणि प्रक्रिया इतकी अपमानजनक असते की, व्यक्तीला आपला स्वाभिमान पायदळी तुडवला जातोय असे वाटते. अभिनेत्री म्हणाली, ’ तुरुंगात जाणाऱ्या ज्या महिलांचे स्तन मोठे आहेत किंवा ज्यांची ब्रेस्ट साइज मोठी आहे अशा स्त्रियांच्या स्तनांची उचलून तपासणी केली जाते. जेणेकरुन कोणीही त्याच्या खाली काहीही लपवून कोणी नेऊ नये.अभिनेत्री म्हणाली, ’अनेक लोकांनी मला विचारले आहे की तुरुंगात माझ्यासोबत जे घडले ते मी का उघड करते? मी कोणालाही घाबरत नाही.



# सैफ-करिश्मा कपूरचा सुपरहिट सिनेमा

सैफ-करिश्मा कपूरचा सुपरहिट सिनेमा, त्यावेळी किती वर्षांची होती करीना? २७ वर्षांपूर्वी झालेला रिलीज

अभिनेता सैफ अली खान आणि करीना कपूर ही स्टायलिश जोडी कायम चर्चेत असते. दोघंही एकदम रॉयल अंदाजात दिसतात. सैफ-करीनाने २०१२ साली त्यांनी लग्न केलं. त्यांना तैमूर आणि जेह ही गोंडस मुलंही आहेत. करीना सैफपेक्षा १० वर्षांनी लहान आहे. सैफने करीनाची मोठी बहीण करिश्मा कपूरसोबत अनेक सिनेमे केले.

सैफ-करिश्माच्या एका सुपरहिट सिनेमावेळी करीना अगदीच लहान होती. कोणता होता तो सिनेमा?


९० च्या दशकात आलेला ’हम साथ साथ है’ या मल्टीस्टारर सिनेमाची जादू आजही कायम आहे. अजूनही हा सिनेमा काही चाहते बघत असतात. या सिनेमातली सैफ-करिश्माची जोडी सगळ्यांना आवडते. त्यांची हलकू फुलकी, विनोदी आणि रोमँटिक केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप भावली. हा सिनेमा १९९९ साली रिलीज झाला. त्यावेळी करीना कपूर फक्त १९ वर्षांची होती. ती तेव्हा बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवण्याची तयारी करत होती. लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे २००० साली करीनाने ’रेफ्युजी’ सिनेमातून सिनेविश्वात पदार्पण केलं. यामध्ये ती अभिषेक बच्चनसोबत झळकली. त्याचाही हा पहिलाच सिनेमा होता.

गेल्या काही वर्षात सैफ-करीनानेही एकत्र सिनेमांमध्ये काम केलं. ‘टशन’,’एजंट विनोद’,‘कुर्बान’,‘ओमकारा’ या सिनेमांमध्येही ही जोडी दिसली. २००८ साली आलेल्या ’टशन’ सिनेमाच्या सेटवरच दोघं प्रेमात पडले. काही वर्ष डेट केल्यानंतर २०१२ साली त्यांनी लग्न केलं. सैफ अली खानचं हे दुसरं लग्न होतं. याआधी सैफने वयाच्या २१ व्या वर्षीच अभिनेत्री अमृता सिंहसोबत लग्नगाठ बांधली होती. सैफ अमृताहून १३ वर्षांनी लहान होता. लग्नाच्या वेळी अमृता ३४ वर्षांची होती. त्यांना सारा आणि इब्राहिम ही दोन मुलं झाली. मात्र काही वर्षांनी त्यांच्यात मतभेद झाले आणि २००४ साली त्यांचा घटस्फोट झाला.

# तुझी चाल तुरू तुरू...

बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरा तिच्या फिटनेस आणि बोल्ड अंदाजामुळे विशेष ओळखली जाते. वयाच्या ५२ व्या वर्षीदेखील ती चांगलीच फिट आहे. सोशल मीडियावरही ती तिच्या वर्कआऊटचे फोटो, व्हिडीओ शेअर करत असते. यामध्येच तिचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. परंतु, तिचा हा व्हिडीओ पाहून लोकांनी तिला चांगलंच ट्रोल केलं आहे.

अलिकडेच मलायकाने एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी तिने बॅकलेस शिमरी गाऊन परिधान केला होता.




सोबतच तिने हाय हिल घातल्या होत्या. आणि, डार्क, बोल्ड असा मेकअप केला होता. मात्र, तिचा हा लूक नेटकऱ्यांना फारसा आवडला नाही. परिणामी, नेटकऱ्यांनी तिला ट्रोल करायला सुरुवात केली.‘ही कायम अशीच चालत राहणार, सरळ चालूच शकत नाही का?’,‘या ड्रेसमध्ये तर उठा-बसायलाही जमायचं नाही’,’ जरा जपून बस मलायका, नाही तर ड्रेस फाटायचा’, ‘हिची चाल कधी सुधरायची नाही’, ‘ही अशी बदकासारखी काय चालते?’ असं म्हणत नेटकऱ्यांनी मलायकाला चांगलंच ट्रोल केलं आहे.

# बहुप्रतिक्षित ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक चित्रपट

‘जिओ स्टुडिओज’ आणि ‘मुंबई फिल्म कंपनी’ यांच्या संयुक्त विद्यमाने साकार होणाऱ्या बहुप्रतिक्षित ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक चित्रपटाचे पहिले गाणे, राजा शिवाजी अँथम ’छत्रपती’, आज अधिकृतरीत्या प्रदर्शित झाले आहे. भारतीय इतिहासाचा तेजस्वी वारसा, छत्रपती शि

‘देश म्युझिक’ आणि ’वॉर्नर म्युझिक इंडिया’च्या माध्यमातून समोर आलेले हे गीत प्रेक्षकांना एका अद्वितीय आणि भावपूर्ण संगीतमय अनुभवाची प्रचिती करून देत असून, या गाण्याने शिवप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे.

प्रख्यात संगीतकार जोडी अजय-अतुल यांनी संगीतबद्ध केलेल्या या गाण्याला अजय गोगावले यांच्या पहाडी आणि भावस्पर्शी आवाजाची लाभलेली जोड या गीताची भव्यता द्विगुणित करते. मराठीसह हिंदी भाषेतही साकारलेल्या या गीतातील हिंदी शब्दरचना नामवंत गीतकार मनोज मुंतशिर यांनी केली असून, तब्बल ८० गायकांच्या समूहाने गायलेले हे गीत श्रवणीय भव्यतेचा एक नवा उच्चांक गाठते. स्वराज्याच्या स्वाभिमानाची आणि सामूहिक चेतनेची प्रखर जाणीव करून देणारे हे ’अँथम’ ऐकताना केवळ संगीताचाच नव्हे, तर इतिहासातील एका सुवर्णकाळाचा प्रत्यय येतो, जो श्रोत्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांप्रति असलेला आदर आणि प्रेम अधिकच गडद करतो.



भव्य दृश्यरचना आणि भावनिक गाभा यांचा सुरेख संगम असलेले हे गीत केवळ प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे नसून अंतर्मनाला थेट स्पर्श करणारे आहे. प्रभावी शब्दरचना आणि दमदार तालाच्या जोरावर हे गीत श्रोत्यांच्या मनात स्वराज्याप्रती अभिमानाची प्रखर भावना जागवते. केवळ एका राजाच्या पराक्रमाचा गौरव न करता, स्वराज्याचा उदय, जनमाणसातील जागृती आणि सामूहिक अस्मितेची प्रेरणादायी गाथा या गाण्यातून अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.

रेमो डिसूझाचे नृत्यदिग्दर्शक

प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक रेमो डिसूझा यांनी या गीताचे नृत्यदिग्दर्शन केले असून, त्यांच्या कल्पक हालचालींमुळे गीतातील भावविश्व अधिक उठावदार झाले आहे. संगीत आणि दृश्यांचा हा अद्भुत मेळ प्रेक्षकांसाठी एक जिवंत, ऊर्जावान आणि प्रेरणादायी अनुभव ठरत आहे. गाण्याच्या प्रत्येक फ्रेममध्ये जाणवणारी प्रचंड ऊर्जा, एकता आणि गांभीर्य हे ‘राजा शिवाजी’ चित्रपटाच्या भव्यतेची साक्ष देते, ज्यामुळे हे गीत केवळ एक सादरीकरण न राहता अस्मितेचा सोहळा बनले आहे.

# ‘तो ती आणि फुजी’च्या सेटवर मृण्मयीचा रुद्र अवतार

मराठी चित्रपटसृष्टीतील बहुचर्चित जोडी मृण्मयी गोडबोले आणि ललित प्रभाकर यांची प्रमुख भूमिका असलेला ’तो ती आणि फुजी’ हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. सोनी लिव्हवर प्रदर्शित होत असलेल्या या चित्रपटाच्या निमित्ताने मृण्मयीने शूटिंगदरम्यानचा एक अत्यंत थरारक आणि भावनिक अनुभव शेअर केला आहे. चित्रपटातील एका महत्त्वाच्या प्रसंगासाठी मृण्मयीने इतका टोकाचा अभिनय केला की, शूटिंग पाहणारेच नव्हे तर शेजारी राहणारे नागरिकही भीतीने घटनास्थळी धावून आले होते.

सोनी लिव्हवर प्रदर्शित होत असलेला बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट ’तो ती आणि फुजी’ चर्चेत असताना मुख्य अभिनेत्री मृण्मयी गोडबोले यांनी सेटवरील काही खास गोष्टी शेअर केल्या आहेत. या चित्रपटासाठी दिलेली भावनिक गुंतवणूक किती सखोल होती, याचा उलगडा अभिनेत्रीने केला आहे. हा चित्रपट जरी मराठी आणि जपानी संस्कृतींचा शांत संगम असला तरी त्यातील पात्रांचा कठीण भूतकाळ पडद्यावर साकारण्यासाठी अशा अभिनयाची गरज होती की, जिथे काल्पनिक कथा आणि वास्तव यातील रेषा पुसट झाली होती.

१३ मिनिटांचा ‘वन टेक’ शॉट अन् घबराट!

या भूमिकेतील तीव्रतेबद्दल सांगताना मृण्मयी गोडबोले म्हणाली, ’ललित आणि माझ्यामधील ब्रेक-अपचा सीन हा या चित्रपटातील सर्वात महत्त्वाच्या प्रसंगांपैकी एक होता. तो १३ मिनिटांचा एक सलग ’वन टेक’ शॉट होता. या प्रसंगासाठी इतका टोकाचा राग आणि भावनिक उद्रेक आवश्यक होता की, मला प्रत्यक्ष ट्रेडमिल उलथवून टाकावे लागले.

तो सीन इतका विध्वंसक होता आणि आमचा आवाज इतका मोठा होता की, शूटिंगच्या ठिकाणी शेजारी घाबरून तिथे जमा झाले. त्यांना वाटले की खरोखरंच काहीतरी गंभीर घडत आहे. माझ्या करिअरमधील हा आजवरचा सर्वात शारीरिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या थकवणारा सीन होता.’

मृण्मयी पुढे म्हणाली, ’तुम्ही त्या क्षणात असता, तेव्हा तुम्ही फक्त अभिनय करत नसता, तर तो उद्वेग प्रत्यक्ष जगत असता. पण एक कलाकार म्हणून लोकांची ती घाबरलेली प्रतिक्रिया माझ्या अभिनयाची खरी पावती होती. तो अनुभव खूपच थकवणारा होता, तरीही त्या रात्री मी अत्यंत शांत मनाने घरी गेले, कारण मला माहित होते की आम्ही काहीतरी अतिशय प्रामाणिक आणि वास्तव टिपले आहे.’जपानच्या निसर्गात उलगडणारी प्रेमकहाणी



मोहित टाकळकर दिग्दर्शित चित्रपट ‘तो ती आणि फुजी’ प्रादेशिक सिनेमातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या चित्रपटाचे कथानक मृण्मयी गोडबोले आणि ललित प्रभाकर यांनी साकारलेल्या एका जोडप्याची आहे, ज्यांचे एकेकाळचे उत्कट प्रेम स्वभाव, भिन्नता आणि अवास्तव मागण्यांमुळे एकमेकांसाठी त्रासदायक ठरले होते. सात वर्षांनंतर नशिबाने त्यांना जपानच्या शिस्तबद्ध आणि विलोभनीय निसर्गात पुन्हा एकत्र आणले आहे. आता तुटलेली ही नाती पुन्हा जोडली जाऊ शकतात का? याचा निर्णय घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

